

साप्ताहिक
# माणूस

२६ फेब्रुवारी १९८३
२ रुपये



## 'गांधी'
ॲटनबरांनी
आम्हाला
डुलकी घेताना
पकडलंय!



पोलंडचा
पुरुषोत्तम
# लेक वालेसा

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : सदतीस ३७

¤

२६ फेब्रुवारी १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनिल उपळेकर

## गाढवांना संरक्षण द्या

भारतीय गाढवाना, तेही जंगली गाढवांना संपूर्ण संरक्षण देण्याची आवश्यकता आहे अशी शिफारस झूऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाने सरकारला केली आहे.

जंगली गाढवांचा वंश नष्ट होऊ नये यासाठी कच्छच्या रणात जंगली गाढवांचे जे अभयारण्य आहे, त्याचे व्यवस्थापन योग्य व्हावयास पाहिजे असे झेड एस आय ने म्हटले आहे.

जंगली गाढवाचा वंश सुमारे १०० वर्षांपूर्वी इराणमधून आला आहे. इराणमध्ये आता हा वंश नष्ट झाला आहे; परंतु कच्छच्या रणात मात्र तो अजून तग धरून आहे. स्थानिक लोकांनी गाढवांची जोपासना केली म्हणून या जंगली गाढवांची संख्या १९६९ मधील ३७० वरून ८०० वर पोहोचली, 'सुररा, या साथीच्या रोगापासून गाढवाचे रक्षण होण्यासाठी सरकारने गाढव व घोड्यांना लस टोचण्याचा कार्यक्रम तावडतोब घ्यावा अशी कळकळीची शिफारस झेड एस आय ने राज्यसरकारला केली आहे.

¤

'जगप्रसिद्ध चित्रपटतारका एलिझाबेथ टेलर अलीकडे चित्रपटात दिसत नाही, म्हणून तिचे असंख्य फॅन्स व्यथित झालेत; पण ती मात्र आता आठव्यांदा विवाह करण्यास उतावीळ झाली आहे. तिचे वय पन्नास असून, व्हिक्टर ल्यूना, या मेक्सिकन वकिलाशी तिचा विवाह निश्चित ठरला आहे. हा गौप्यस्फोट, तिच्या नियोजित नवरदेवाच्या मुलीनेच—इरमानेच—केला आहे.

¤

—मलेशियात सिगारेट, बिडी, चिरूट, गांजा, चरस ओढणाऱ्या लोकांना यापुढे कुठल्याही स्वरूपाचे व्याजरहित, मध्यम स्वरूपाचे कर्ज मिळणार नाही. सरकारने अशी अट घालण्याचे कारण असे की, ज्याच्याजवळ सिगारेटवर खर्च करण्याएवढा पैसा आहे त्याला कर्ज न घेता येण्याइतपत सांपत्तिक स्थिती चांगली असली पाहिजे.

## मधमाशांचा विमा

मधमाशांचा विमा उतरण्याचा निर्णय युनायटेड इन्शुअरन्स विमा कंपनीने घेतला आहे. अशा प्रकारचा मधमाशाचा विमा हा आशियातील पहिलाच प्रयोग आहे.

# इथून–तिथून

खादी ग्रामोद्योग आयोगातर्फे तामिळनाडूतील जमना माराथुग जिल्ह्यात सहा मधुमाक्षिकापालनकेंद्र आहेत. या सहा केंद्रांत विम्याचा हा प्रथम प्रयोग होणार आहे. नंतर त्याची सर्वत्र अंमलबजावणी केली जाईल.

## राजकुमार आणि बंगारप्पा

तेलगूदेशमचे संस्थापक एन. टी. रामाराव यांनी, आंध्रप्रदेशात काँग्रेस आयला धूळ चारून सत्तेवर आल्यानंतर, कन्नड चित्रसृष्टीतील एक चिरतरुण हिरो डॉ राजकुमार हेही राजकारणात प्रवेश करण्याच्या बेतात असल्याची बातमी आहे राजकुमार यांनी त्याबद्दल वाच्यता जरी केली नसली तरी त्यांचे जवळचे मित्र याबद्दल बोलताना म्हणतात, ' जर बंगारप्पा क्रांतिरंगाचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यात यशस्वी झाले तर डॉ. राजकुमार आपल्या चाहत्यांसमवेत राजकारणात प्रवेश करतील आणि कर्नाटकातील राजकारणाचे एक वेगळे चित्र दिसेल.

## अमिताभ–राजीव गांधी

प्रत्येक माणसाची आपल्या जवळच्या मित्रांशी, आप्तस्वकीयांशी संवाद साधण्याची वेगवेगळी पद्धत असते. भारतीय चित्रपटसृष्टीतील, सुपरस्टार अमिताभला संवादासाठी, स्वतंत्र वायरलेस सेट हवाय यासाठी, ' युनियन कॅम्युनिकेशन खात्याकडे, त्याने अर्जही केलाय. त्याबाबत त्याने मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, राजीव गांधी यांच्याशी सततचा संपर्क साधण्याचे कारण दिले आहे; पण गंमत अशी की, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा या निर्मात्यांकडे तसे खाजगी वायरलेस सेट्स् नाहीतच.

फक्त राजीव गांधींशी हवा तेव्हा संपर्क साधण्यासाठी वायरलेस सेट्स मिळावा एवढं उद्दिष्ट तर अमिताभचे नसावे ? ☐

## सप्रेम नमस्कार

आपल्या साप्ताहिकात प्रसिद्ध होणारी 'प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची' ही लेखमाला वाचली. त्यामुळे हिमालयात चाललेली जंगलाची बेसुमार तोड वाचून वाईट वाटले; पण तेथील लोकांनीच जागृती दाखवून 'चिपको' आंदोलन सुरू केले हे वाचून आनंदच वाटला. जी स्थिती हिमालयाची तीच आपल्या सह्याद्रीचीसुद्धा आहे. आमचा महाबळेश्वर तालुका कोयनानगर-धरणाच्या पाणलोटक्षेत्रात येतो. पाऊस साधारण २५०/३०० इंच पडतो. कोळश्यासाठी वनखाते ठेकेदारांना पास देते. १० झाडांचा पास असेल तर २० झाडे संगनमताने तोडली जातात. शिवाय खाजगी मालकीच्या जंगलातील तोड होते ती वेगळीच. मुसळधार पावसामुळे जमिनीची धूप होऊन सर्व गाळ धरणातच साठतो. त्यामुळे काही वर्षांतच धरण निकामी होण्याचा धोका संभवतो आहे. या धोक्याची जाणीव कोणालाही नाही. तेव्हा हिमालयातील चिपको आंदोलनासारखे आंदोलन येथे सुरू करावे व लोकांना जंगलाचे महत्त्व आणि फायदे समजावून देण्यासाठी पदयात्रा काढावी.

३ फेब्रुवारी १९८३ — अनिल यादव, महाबळेश्वर

◻ 'माणूस' च्या दि. ५ फेब्रु. च्या अंकातील मेधा राजहंस यांनी लिहिलेला पुण्यातील घोरपडेपेठ प्रकरणावरील लेख वाचला. 'प्रत्यक्ष घटना घडून गेल्यानंतर PUCL सारख्या संघटनेने निषेधाचा ठराव पास केल्याने वा चौकशी समिती नेमल्याने काही होणार नाही' असे त्यात लिहिले आहे. याचे प्रयोजन समजू शकत नाही. 'घटना घडून गेलीच आहे, आता रडून काय उपयोग?' असे म्हणून PUCL ने स्वस्थ बसायला हवे होते काय? म्हणजे तिकडूनही निष्क्रियतेचा आरोप खास पत्रकारी थाटात करायला संधी मिळाली असती! बरे, अशा प्रसंगी काय करावे याचे नक्की उत्तर लेखिकेजवळही नाही. मग इतरांच्या कृतीवर एवढे ठाम मत व्यक्त करण्याची एवढी उतावीळी का? अशा नकारात्मक लिखाणास माणूसने उत्तेजन द्यावे याचा खेद होतो. जे आहे, त्याचा नकार करताना काय असायला हवे हे सांगण्याची थोडी तरी जबाबदारी नको का मानायला?

नागरी स्वातंत्र्याची, एक मानवी मूल्य म्हणून जपणूक करण्यासाठी शक्य ते सर्व करण्याच्या PUCL (लोक स्वतंत्रता संघटना) च्या प्रयत्नात आपणासारख्या पत्रकारांचे सहकार्य आवश्यक आहे. आपण ते द्याल अशी खात्री आहे. आपल्या सूचना व सहकार्याचे स्वागतच आहे.

**डॉ. रत्नाकर महाजन**
सरचिटणीस
लोक स्वतंत्रता संघटना, महाराष्ट्र.

[ घोरपडी पेठेतील गुजर धिंड-प्रकरणानंतर चार सभासदांनी काढलेल्या निषेध-मोर्चात PUCL चे सभासद उपस्थित नव्हते. अध्यक्ष वगैरे मंडळी कुठे होती?

घटना घडून गेल्यानंतर रडण्यात खरोखरच अर्थ नाही. संघटनेजवळ नेमकं काय पाहिजे हे मी माझ्या लेखातच लिहिलं आहे. ते महाजनांच्या माहितीसाठी परत – स्वयंस्फूर्ती आणि लढाऊ वृत्ती!

PUCL ही आमचीच संघटना आहे. तिचं स्वरूप जर असं बदललं तर PUCL ला हवं असलेलं सहकार्य न मागताच मिळेल.

**–मेधा** ]

# सणकीत

## मेंदूला मुंग्या येईपर्यंत . . .

गेल्या आठ–दहा दिवसातलीच गोष्ट. इतिहासाचार्य राजवाडे यांचं 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास' हे पुस्तक वाचत होतो. असली पुस्तकं म्हणजे पेशन्सनीच वाचावी लागतात. संदर्भ व दाखले सुरुंगासारखे पेरलेले असतात. पुढच्या ओळीत आपल्या रूढ कल्पनांना दणकून धक्का बसणार आहे हे आदल्या ओळीतसुद्धा लक्षात येत नाही; पण गुलशन नंदा किंवा बाबा कदम असले 'फॉर्म्युले' वाचण्यापेक्षा हे धक्के परवडतात. तर हे पुस्तक वाचताना मला दोन ओळखीच्याच शब्दांचे नवे अर्थ सापडले. (नवे म्हणजे आपल्यासाठी 'नवे' बाकी ते त्या काळापासून 'जुनेच' किंवा 'मूळ' अर्थ!) ते शब्द म्हणजे युवन् व युवती.

यातला 'युवन्'च पुढे युवक झाला असावा. 'यूथावस्था' नावाचा एक शब्दप्रयोगही या पुस्तकात आढळतो. तर या पुस्तकातल्या पुढील चार ओळी...

अतिप्राचीन आर्यसमाज एके काळी अत्यंत रानटी अशा यूथावस्थेत होता. कन्यादूषणाच्या संबंधाने युवन् व युवती हे दोन जुनाट शब्द लक्ष्य आहेत. यु म्हणजे जुडणे आणि युवन् म्हणजे जुडणारा समागम करणारा.

युवती म्हणजे समागम करणारी. हे वाचल्याबरोबर डोळ्यांची बुब्बुळं मोठी झाली. सहजगत्या वापरणाऱ्या शब्दांचा अर्थ इतका खोलवर आहे हे शोधण्याचं कधी मनातही आलं नाही. शिवाय काही शब्द त्यांच्या अर्थांचा विचार न करताच स्वीकारलेले असतात. उदा. आई, बाबा, काका इ. असो; पण गंमत अशी की, 'युवती' या शब्दाचा अर्थ कळण्याआधी समागम या शब्दाच्या अचूक अर्थाचे आगमन यूथावस्थेत येण्याआधीच आले!

युवती, युवन् किंवा युवक या शब्दांचा मूळ अर्थ इतका भोगवादी असेल असं केव्हाच वाटलं नव्हतं. कारण–

युवक / युवती म्हणजे उसळत्या–सळसळत्या तारुण्याचा खळाळ.

युवक–युवती म्हणजे साहस, धडपड, स्टडी किंवा चक्क भंकस.
युवक–युवती म्हणजे कॉलेजची रंगीबेरंगी आवारं, त्यातली आवारगी.
पिरियड बंकिंग, कॅन्टीनमधला अर्धा चहा, कुणा सुंदरीवरली भित्ती–कविता.
शिट्ट्या, कॉमेन्टस्, फिशपॉंडमध्ये बुचकळून काढलेली गॅदरिंगज्, गेट टू गेदर्स
डोरे टाकत टाकत अॅंजॉय केलेल्या पिकनिक. गावस्कर, अमिताभ, नासिरुद्दीन, स्मिता, रेखा वगैरे होण्याच्या स्वप्नांचे स्वामी.
युवक–युवती म्हणजे मौज, मजा, मस्ती. या अवस्थेत इंप्रेशन मारण्याचा जोरदार प्रयत्न करतो आपण; पण तेवढा ' भोगवादी ' नसतो. असलाच तर स्वप्निल तरल, गुलाबी प्रणय वगैरे.

या पुस्तकातल्या त्या अर्थाला घेऊन मेंदू जो जो पुढे जाऊ लागला तसा त्याचा पुरता साठे क्रॅकर बिस्किट पुडा झाला.
मेंदू मला म्हणाला, भोग काय फक्त शरीराचे असतात ? तुम्ही, तुझे मित्रमैत्रिणी भोगवादीच आहात.
तुम्ही भोगताहात इथली सुरक्षित चौकट आपल्या स्थिरस्थावर आईबापाची स्थावर–जंगम मालमत्ता.
तुम्ही भोगताहात तारुण्याची मस्ती आंबट–गोड गॅदरिंग, पिकनिकच्या जमलेल्या किंवा जमवलेल्या गर्दीत.
तुम्ही भोगताहात वेळ सकाळ–संध्याकाळ रेस्टॉरंटच्या पडिक खुर्च्यांतून आणि पिचकारता वेळ पानाच्या ठेल्यावरून. रेग्युलर पिरियड बंक करून क्लासेसच्या पायऱ्या–पायऱ्यांवर तुम्ही भोगता आपल्या आईवडिलांची पे–स्लिप.
तुम्ही भोगता निसर्ग कन्सेशन रेटमध्ये स्टडीटूर, पिकनिकला.
तुम्ही भोगता इथले ' सांस्कृतिक ' बंद थिएटरातून एअर कंडिशन्ड नाट्यगृहात सुखासीन शाली पांघरून. तुम्ही भोगता सकाळ, दुपार, सध्याकाळ सदासर्वकाळ.
मेंदूने माझ्या भोगवादाचा असा पाढा वाचल्यावर मी त्याला विचारले या निमित्ताने तू मला बौद्धिक भोगून घेतोयस काय ?
मेंदू त्याच्या सर्व सुरकुत्यांनिशी हसला आणि म्हणाला ... तुला काय भोगायचं ? तुम्ही भोगताहात इथल्या खळाळ, मौज, मजा; पण काहींच्या वाटेला मात्र ' भोग ' आहेत नुस्ते. तेही तुमच्यासारखेच यूथावस्थेत तारुण्य'त वगैरे. तुमच्या तारुण्याला सळसळत्या ध्येय-धुंद गुलाबी भावनांचं सर्टिफिकेट आहे.
त्याना मात्र एक लाचार, लावारीस जिंदगीचं देणं आहे.
ग्रामीण / अशिक्षित / भूमिहीन / मागास असे सरकारी रबरी शिक्क्यासारखे क्लासिफिकेशन आहे.
त्यांच्या ' न ' च्या ' ण ' ला तुम्ही सोडग्यासारखे फसफसून हसता. सदरा, टोपी घालून ' काय भाऊ ' अशी डायलॉगबाजी करून तुम्ही त्यांची नक्कल करून सर्वोत्कृष्ट अभिनयाचं पारितोषिक मिळवणार.
दुष्काळात शेवटचं हत्यार म्हणून शहराच्या रस्त्यावर स्वत:ला विकणाऱ्या तरण्याबाड दलित स्त्री, आर्ट फिल्मसाठी सॉलिड स्टोरी आहे ना ? दुष्काळ / बेरोजगार / सामाजिक मागासपण इ. अंधारात चाचपडणारे, धडपडणारे युवक-युवती भोगताहेत फक्त व्यवस्थेचा अंधार.
यूथावस्था फोडतेय खडी रोजगार हमी योजनेवर आणि संध्याकाळी तीच पदरात बांधून घेऊन जातेय. यूथावस्था भोगतेय वेठबिगारी वर्षानुवर्षाची १०० / २०० रु. च्या कर्जासाठी.
युवक राबतोय आठ तास / बारा तास वेल नोन ट्रेडमार्कसाठी. तुम्हाला फक्त दिसतो त्याच्या कुपनवर मिळणारा स्वस्त चहा, जेवण आणि कंपनीबसची टूर.
यूथावस्था घेतेय तुमच्या ऑर्डर्स, वडा-सांबर, कांदा-उत्ताप्पा. पुसतेय टेबल. देतेय पाणी–ग्लास सांडलाच तर चाखतेय तुमच्या हातचं पाणी.
युवक गाळतोय दारू, फाडतोय मटक्याच्या चिठ्ठ्या. कुणाच्या तरी दुष्मनीसाठी कुणाच्या तरी पोटात सुरा भोसकून फोडतोय खडी.
युवती राबतेय शेतात.
दाणेदार कणसासारखं कोवळं शरीर जमीनदार-सावकारासमोर पसरताना तिच्या डोळ्यात असतो पोटातला खड्डा. विडीकारखान्यात, शहरांच्या इंडस्ट्रिअल इस्टेटमध्ये युवती पिळतेय आपलं यौवन शहरांच्या रात्री जागवताना
डोळ्याच्या पाण्याला रोखून धरणारं काजळ आणि गावाकडं आधीच चुरगळलेले ओठ लिपस्टिकने रंगवताना ती नुस्तीच रंगरंगोटी नसते. तर तथाकथित उच्चभ्रूंची इभ्रत झाकून ठेवत असते.

तुंबलेल्या पाण्यासारखं साचलेलं, साखळलेलं हे यौवन, यूथावस्था कसले भोग भोगतेय ? तुम्ही-आम्ही निर्माण केलेल्या वर्गवर्ण व्यवस्थेचे हे अनौरस संतान तेही आता यूथावस्थेत आहे.

हे यौवन सळाळलं तर ? एकांकिका/आर्टफिल्ममधली दबलेली माणसं-पोरं-बाया खरोखर जिवंत झाली तर.
दारू गाळणाऱ्या पोरानं दारूच्या मसाल्यात तुम्हा-आम्हाला टाकलं तर ? मटकाअड्ड्यावरल्या पोरानं आपल्या वडिलांची पेस्लिप पळवली तर ? पाकिटमारानं आपली ' लायसेन्स ' पळविली तर ? गल्लीतल्या दादानं तुमची बहीण शहराला रात्रीसाठी अर्पण केली तर ?

तुमच्या-आमच्यासारखं शरीर, मेंदू असलेली ही पब्लिक असं मांडवातून बाहेर का ? त्यांचा विचार माझ्या मनाला शिवत का नाही ? विचारतंद्रीत असतानाच मेंदूने मला चिमटा काढला. म्हणाला कसा शिवणार ? तुम्हीच तुमची मनं शिवून घेतलीत. तुम्ही शिकलात, तुम्हाला आवश्यक इतकेच शब्द त्यातले रूढ अर्थ घेऊनच.
तुम्ही भोगता आयुष्य, तुमच्या आईवडिलानी सुरक्षिततेची चौकट घालून दिलेलं. तुम्ही गिरवता अक्षरं. शब्द, वाक्य, प्रसंगी परिच्छेद. क–कमळातला, ब–बदकातला. तुमच्या आजोबाच्या वेळचा भैरू तुमच्याही पुस्तकात औत जोडत असतो. तेव्हा वर्तमानपत्राच्या जाहिरातीत ' ट्रॅक्टर ' येऊन वर्षे झालेली असतात.
आगगाडीच्या प्रवासात येणाऱ्या बोगद्यांसारखे तुमच्या आयुष्यातले काही पोकळ अंधारी दिवस सोडलेत तर तुम्ही आकंठ भोगता आयुष्य सकाळ, संध्याकाळ, सदासर्वकाळ.

मेंदूला मुंग्या येईपर्यंत हे सर्व चाललं, बधिरावस्थेतून शुद्धीवर येताना युवक–युवती म्हणजे, समागम, तारुण्याचा खळाळ यापुढे किंवा यापेक्षाही अधिक काही आहे, याची जाणीव होत गेली आणि मनाशी म्हटलं, असे सुरुंग मनाला, विचाराला लागत राहिलेच पाहिजेत...
मग मेंदूच्या चिंधड्या झाल्या तरी बेहत्तर !

— संजय पवार

# राम कोणाचा कोण?

फिरोज रानडे

इमारतीचे तीन जिने चढता चढता श्यामला धाप लागली; पण त्याला काही इलाज नव्हता. मराठी ग्रंथ-संग्रहालयाचे नायगाव-परळचे ते सभागृह जर तिसऱ्या मजल्यावर होते तर तेव्हढे जिने चढणे भागच होते.

अेखाद्या इमारतीची जागा कधीकधी अगदी विचार वगैरे करून ठरवली जाते, तर कधी कधी तशी जागा अगदी योगायोगाने पक्की होते; पण मजेची गोष्ट अशी की, अशा विचारपूर्वक वसाहत केलेल्या इमारती-पेक्षा योगायोगाने जागा मिळालेल्या इमारती जास्त चपलख् नसतात.

आता मुंबईतल्या नव्या मंत्रालयाच्या व विधानसभेच्या इमारतीचेच पहा ना. ह्या नरीमन पॉइंट विभागाची रचना कोणी शहर-विशारदानी विचार-विनिमय करून, नकाशे बनवून ह्या दोन अतिमहत्त्वाच्या इमारतींच्या जागा पक्क्या केल्या असतील; पण बघा मंत्रालयाचे तोंड कुठे तर विधान-सभेचे कुठे ! त्या दोघा इमारतीत काही संबंध नाही, काही ताळमेळ नाही. नाही एकातून दुसऱ्यात जाण्याची सुविधा. जणू काही एक आहे बजाज इलेक्ट्रिक कंपनीची इमारत व एक आहे मेकर भरत !

कदाचित् मंत्रालयाच्या कामाचा विधान-सभेच्या कामाशी काही संबंध नाही हेच तर शहर-विशारदाला दाखवायचे नसेल? असो.

उलट मराठी ग्रंथ-संग्रहालयाची नायगाव रस्त्यावरची इमारत पहा. ती अशीच काही-तरी २०-२५ वर्षांपूर्वी उभारली गेली. त्याची जागा पक्की करताना शहर-विशारदांनी काही फार मोठा विचार केला असेल असे वाटत नाही; पण ती बसली आहे किती चपखल, आणि किती योगायोगाने !

म. ग्रं. सं. चे हे सभागृह आहे परळ व दादर ह्याच्या सीमारेषेवर. येथे गिरणगाव संपतो व दादरचा मध्यम आणि उच्च मध्यम-वर्गाच्या वसाहतीची सुरुवात होते. ह्या इमारतीची पाठ परळ लालबाग भागाकडे आहे तर तोंड आहे हिंदु कॉलनी-शिवाजी-पार्क विभागाकडे.

ह्या विशिष्ट स्थळाचा ह्या सभागृहातच होणाऱ्या कार्यक्रमावर फार मोठा परिणाम झाला आहे. कामगार, दलित, शोषित ह्याच्या प्रश्नांचा पाठपुरावा येथे होत असतो; पण तसा पाठ-पुरावा करणारी तोडे मात्र अस-तात शिवाजीपार्क व हिंदु कॉलनीतली !

अेवढे विचार व धाप मनाशी धरून श्याम तिसऱ्या मजल्यावर पोहोचला. प्रवेशदारा-शीच एक टेबल टाकून पुस्तके विकायला ठेवली होती. ही तर नेहमीची गोष्ट झाली. वेगळेपण जाणवले ते ह्या गोष्टीचे की, तेथे अेकपण सुदृढ व बॉबवाली दिसली नाही ! पण आता श्यामला तेथे घुटमळायला बिल-कुल वेळ नव्हता. सभागृहाच्या सगळ्या खुर्च्या भरलेल्या दिसत होत्या व अजुनी कित्येक लोक येत होते.

कितीही गर्दी असली तरी पुढच्या रांगे-तल्या एक-दोन खुर्च्या मोकळ्या असतात असा श्यामचा अनुभव. तेव्हा तो मागे न रेंगाळता तडक पुढे गेला. त्याच्या अंदाजा-प्रमाणे एक खुर्ची रिकामी होती. श्याम तीवर जाऊन बसला. आता त्याची धाप थोडी कमी झाली होती. त्यात इकडे तिकडे पहा-यला थोडी उसंत मिळाली. अजुनी लोक येतच होते व खुर्च्या भरल्यामुळे पॅसेजमध्ये सुद्धा माणसे उभी राहू लागली होती.

तेथे लोक येत होते. पॅसेजमध्ये उभे रहात होते वगैरे म्हटलं पण ते तितकेसे बरोबर नाही. ती सगळी १८ ते २० वर्षं गटातली तरुण मंडळी होती. त्याच्या तेथे जमा होण्यात काही तरी वेगळेपणा होता. आपण ह्या सभेला आलो आहोत हेच काही तरी वेगळे करतो आहोत अशी त्यांची भावना होती.

अशा भावनेचा श्यामला जुना असल तरी स्वानुभव होता. ३५-४० वर्षांपूर्वी तो राष्ट्रसेवा दलाचा सैनिक होता. त्या वेळचा त्याचा अनुभव. त्या वेळी कोणताही कार्य-क्रम असला, कोणतीही सभा असली की तो व त्याचे साथी एवढ्याच आत्मीयतेने जमत असत. सहा वाजताचा कार्यक्रम असला तर ५॥ पासूनच सैनिक जमायला सुरुवात होत असे. बाकीच्या कार्यक्रमाप्रमाणेच सभाना हजर रहाणे हे आपले कर्तव्य आहे. आपल्या लढ्याचा तो एक मार्ग आहे ह्या भावनेने व जाणिवेने ते जमत. आजचा तो मेळावा तशाच भावनेने जमलेल्या तरुणांचा होता. त्यामुळे श्याम त्यांच्याशी मानसिक समरस झाला.

आता आपण पूर्वीसारखे तरुण राहिलो नाही ह्याची चुटपूट त्याला आजकाल बऱ्याच वेळा लागत असे. आताही तशीच लागली.

कार्यक्रमाला सुरुवात झाली. कोणा दलित पँथरच्या तरुणाने थोडे प्रास्तविक बोलून डॉ. बाबा आढाव सभेचे अध्यक्षपद स्वीकारतील म्हणून सांगितले. मंचावर विजय तेंडुलकर, डॉ. बाबा आढाव, स शि. भावे मंडळी बसली होती. दया पवार थोड्याच वेळात येऊन दाखल झाले.

श्यामला विजय तेंडुलकर, दया पवार चांगलेच माहीत होते. भावे वाचून माहीत होते. आढावाचे त्याने काही वाचले नव्हते, त्याना पूर्वी पाहिले नव्हते? पण त्यांच्याबद्दल ऐकले मात्र खूप होते. ते दलित तरुणांचे बिनीचे कार्यकर्ते आहेत हे त्याला माहीत होते.

पण त्यांच्या उंच, गोऱ्या, लांब तरतरीत नाकाच्या व लाब केसांमुळे आढाव श्यामला बिनीच्या कार्यकर्त्यापेक्षा उर्दू-शायरासारखे वाटले.

'उर्दू-शायर' बोलायले उठले. त्यांनी माझ्या भावानो, म्हणून श्रोत्यांना संबोधताच श्यामला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटली. बंधू-भगिनीनो, मित्र हो, साथी हो वगैरेपेक्षा हे माझ्या भावानो हे किती तद्दन मराठी वाटते नाही ?

'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' या प्रा. अरुण काबळेंच्या पुस्तकावर निकोप चर्चा व्हावी, सिद्धांतिक चर्चा व्हावी असे म्हणून आढाव पुढे म्हणाले, रामायण व महाभारत

हे ग्रंथ पवित्र का मानावयाचे ? तर ते ब्राह्मणांनी रचले आहेत म्हणूनच ना ? ह्या पुस्तकाला खूप विरोध होणार आहे. त्याच्या वर बंदी आणावी अशी मागणी पण होईल. हा विरोध कोण करतील वा बंदीची मागणी कोण करतील ? तर ज्यांचे हितसंबंध ह्या मुळे छेदले जाणार आहेत ते !

'राम' आजकाल फार महत्त्वाचा व चर्चेचा होत चालला आहे. आज कांबळयांचा 'राम' अडकला जाण्याचा संभव आहे. पूर्वी तेंडुलकरांचा 'राम' म्हणजे घाशीरामही असाच अडकला होता. असा अगदी जुजबी विनोदही आढावांनी केला. अडकलेल्या 'रामा'ची गोष्ट निघाली आहे तर आढाव जगजीवन रामांचा उल्लेख करतील असे श्यामला वाटले होते कारण सध्या सग– ळयात जास्त 'अडकलेला' राम तोच आहे; पण आढाव तरी किती 'रामां'चा उल्लेख करतील ?

हा घाशीरामाचा विनोद अगदी जुजबी असला तरी मंडळीत खूप हशा पिकला. ह्याच वेळी नाही पुढेसुद्धा वक्त्यांच्या अगदी साध्या बोलण्याला सुद्धा खूप हशा पिकत होता. आज काही तरी चमचमीत ऐकायला मिळणार अशी तर ह्या जमलेल्या मंडळींची अपेक्षा नव्हती ?

'हा नुसता राम-रावणामधला संघर्ष नव्हता. रावण हा बुद्ध होता, ह्या कांबळेंच्या म्हणण्यावर चर्चा व्हावयास पाहिजे !' असे सांगून आढावांनी रामायणातल्या काही भाकड-कथा सांगितल्या. लहान मुलगी अस- ताना जर ते धनुष्य सीतेला उचलता आले तर मोठ्या रावणाला ते कसे आले नाही ? आणि त्याच रावणाने त्याच सीतेला उचलून पळवले !

'हे सगळे खरे असेल हो; पण हे सगळे तुम्ही आत्ता काढता कशाला ? उगाच लोकांची मनं दुखवता कशाला ? असे लोक विचारतात. आम्ही हे सगळे काढतो ह्याचे कारण ह्या ग्रंथांमुळे आमच्यावर जो अन्याय झाला आहे तो तसाच चालू रहातो–आम्ही दलित ते दलित व मागास ते मागासच रहातो.' आढाव फार तळमळीने पण त्याच वेळी मोठ्या संयमाने बोलत होते. त्यांच्या भाषणात कोणाची टवाळी नव्हती.




स. शि. भाव्यांचे कोणा साप्ताहिकातले एक सदर श्यामने मोठ्या नियमितपणे वाचले होते. त्यांचे समतोल विचार व स्पष्ट लिखाण त्याला बऱ्याच वेळा समजले नाही तरी एकंदरीत आवडले होते. 'प्रा. अरुण कांबळे हा माझा विद्यार्थी. पुस्तक प्रसिद्ध होण्याआधी मी ते वाचले आहे. त्यात कोणा- चीही मनं दुखावतील असे काही नाही. अरुणच्या मनात तसा काही विचारच नव्हता. ह्या पुस्तकाबाबत लढाई झाली पाहिजे; पण ती विचारांची व विचारांच्या पातळीवरच व्हायला पाहिजे ! लोक अशी पुस्तके वाचून चिडतात का ? माणूस अंध- श्रद्धेच्या छत्रीखाली सुखाने रहात असतो, ते छत्रच हिरावल्यासारखे होते म्हणून !' हे पुस्तक जप्त होण्याचा फार संभव आहे, हे पण भावे यांनी सांगितले.

'विचार करा, स्वतंत्रपणे विचार करा' असे आगरकर सांगत असत व आता आम्ही विचार करतो आहोत, तर त्याला विरोध होतो !' दया पवार आपले विचार मांडत होते, 'राजवाड्यांनी पण वेदावर वगैरे टीका केली आहेच की !'

मग राजवाड्यांवर नुसती टीकेची झोड उठली नव्हती तर त्यांचा छापखानाही जाळला गेला होताच की ! आगरकरांना पण कृष्णाला जार म्हटल्याबद्दल निंदेला पात्र व्हावे लागले होते की ! श्यामच्या मनात विचार आला. टीकाकार ब्राह्मण असो की, दलित असो, प्रस्थापित कल्पनांना कोणी धक्का दिला की माणूस चिडतो हेच खरे !

हे तरी आपल्या राम-कृष्णांबाबत तरी आहे. श्यामला आठवले. दिल्लीच्या पु. ना. ओकांनी ताजमहाल हा मोगलांनी बांधला नसून हिंदूंनी बांधला आहे म्हटल्यावर श्यामला किती राग आला होता ! जसं काही ताजमहाल श्यामच्या तीर्थरूपांनी बांधला होता व ओक आपल्या वडिलांनी बांधला आहे असे म्हणत होते.

'हिंदुधर्म मोठा मजेशीर आहे. इकडे भोगवादी कृष्णाचे जेवढे कौतुक तेव्हढेच कौतुक त्यागमूर्ती रामाचे. नागांचे निसंतान करण्याकरता जाळल्या गेलेल्या खांडववन- दहनाचा कोणी निषेध का करत नाही ?

पृष्ठ २५ वर

मुंबई वार्ता

# कविता ! दगड–मातीतल्या.

मुंबईच्या जहागीर आर्ट गॅलरीमध्ये ८ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीच्या दरम्यान, 'इंडियन स्कल्पचर टुडे' या शीर्षकाखाली एक शिल्पकलाप्रदर्शन भरलं होतं ८६ कलाकृतीनी नटलेल्या या प्रदर्शनात जवळपास १९३० पासून ते अगदी आजतागायत–१९८२ पर्यंतच्या निवडक कलाकृतीचा समावेश होता. ब्रॉन्झ, तांबं, चांदी अशा धातूपासून ते दगड, चिनी माती, लाकूड यासारख्या अनेकविध माध्यमांचा वापर करणारी ही शिल्पं म्हणजे मूर्त स्वरूपात बद्ध केलेल्या कविताच !

एकूण कलाप्रकारामध्ये चित्रकला ही समुदायापर्यंत कमी पोचणारी असं म्हटलं तर शिल्पकला ही त्याहूनही कमी पोचणारी असं म्हणायला हवं. शिल्पकला म्हणजे काय? एक तर चौकातून बसवलेले पुतळे किंवा 'कला' म्हणूनच म्हणायचं झालं, तर प्राचीन खोदकामं, लेणी इत्यादि, इतपतच शिल्पकलेविषयीच्या सर्वसामान्य कल्पना असतात; पण यापुढे जाऊन नवशिल्पकलेविषयीचं अज्ञान आणि गैरसमज थेट आधुनिक चित्रकलेसारखेच अगदी त्याच दुर्बोधतेच्या आरोपापासून सुरू होणारे. अखेर कलाप्रक्रियेतली एक महत्त्वाची पायरी म्हणजे निर्मित कलेचं संप्रेषण–कम्युनिकेशन. जी कल्पना कलाकारानं केवळ आपल्या मनःचक्षूनी पाहिलेली असते, जाणलेली असते, ती कल्पना त्यानं मूर्त स्वरूपात उतरवणं आणि रसिकानं–आस्वादकानं ती जाणून घेणं, समजून घेणं या प्रक्रियेत जर कुठे बाध येत असेल, तर कलाकाराच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यात किंवा आस्वादकाच्या जाणून घेण्यात काही तरी उणीव असते, म्हणूनच मग कलाकाराचा आणि आस्वादकांचा संवाद साधत नाही.

शिल्पकार शिल्पातून काय सांगत असतो? किंवा निराळ्या शब्दात, आस्वादकानं काय अपेक्षा घेऊन शिल्पाकडे जायचं असतं आणि त्यातल्या कशाचा आस्वाद घ्यायचा असतो? याचं उत्तर अर्थातच काळाप्रमाणे आणि शिल्पकारानुसार आणि आस्वादकानुसार बदलत जाईल. जेव्हा शिल्प एखाद्या व्यक्तीचं असतं, तेव्हा शिल्पकारानं गाठलेलं त्या व्यक्तीशी साधर्म्य आणि त्या व्यक्तीचा 'मूड' चित्रित करण्यात त्याला आलेलं यश, हा आस्वादाचा विषय असतो. उदाहरणार्थ अश्वारूढ शिवाजीमहाराजांचा पुतळा असेल, तर तो शिवाजीमहाराजासारखा दिसतो आहे की नाही, त्याच्या चेहऱ्यावर महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाशी आपण जोडलेले उमदेपणा, करारीपणा इत्यादि भाव आहेत का, घोड्याची फेक आणि गतिशील स्थिती जाणवते का इत्यादि गोष्टीचा विचार होईल. याउलट नक्षीकाम असणाऱ्या शिल्पामधून जाणवतात ते भौमितिक आकार, त्यांच्या लयबद्ध रचना, त्यांचा सूक्ष्मपणा, नाजूकपणा आणि त्यांना घडवण्यात कारागिराचा कुशलतेनं चाललेला हात.

पण आधुनिक काळातली शिल्पकला असं जिला म्हणता येईल, तिचं प्रातिनिधिक वैशिष्ट्य म्हणजे शिल्पातून शिल्पकारानं मांडलेला विचार किंवा खरं म्हणजे कल्पना. काही कल्पना कवितेतून मांडल्या जातात, काही चित्रातून, तर काही शिल्पामधून मांडणं शक्य असतं. प्रत्येक कलेचे कल्पना मांडण्याचे मार्ग वेगवेगळे असतात. कारण त्याची माध्यमं वेगवेगळी असतात. शिल्पाच्या माध्यमाचा एक गैरफायदा म्हणजे हे माध्यम शब्द किंवा रंगासारखं तरळ नसतं, ते बोजड असतं आणि दुसरं म्हणजे त्यात रंगाचं वैविध्य–चित्रकलेच्या तुलनेनं कमी असतं; पण मुळातच त्रिमितीचं परिमाण असणारं ते माध्यम आहे आणि हा त्याचा मोठा फायदा म्हणायला हवा. कारण ते सघन वास्तवाशी जवळीक साधणारं आहे.

शिवाय शिल्प किंवा चित्र याचा एक फायदा असा की, ते समग्रपणे एकाच वेळी आस्वादकासमोर मांडता येतं. कविता पायरी–पायरीनं, शब्दा–शब्दानं आणि एकापुढे एक अशा क्रमानं रचली जाते आणि वाचली जाते. मात्र शिल्प सगळं एकदमच दिसतं, त्याचे बारकावे तुम्ही हवे तर पहा क्रमाक्रमानं, पण समग्रपणाचा परिणाम शिल्प अधिक समर्थपणे देऊ शकतं. या जाणिवा भान घेऊन जर शिल्पं पाहिली तर तो एक वैचारिक भावनिक अनुभव ठरतो.

प्रदर्शनातल्या काही शिल्पांची ही उदाहरणं–राम किंकर बैज याचं शिल्प 'प्राम्ब्युलेटर' (प्राम्ब्युलेटर म्हणजे बाबागाडी) माध्यम धातू. रंग बराच मातकट.या शिल्पामध्ये स्त्रीसारखी दिसणारी मानवी आकृती आहे. तिच्या समोर खोलगट, कंसासारखा आकार आहे आणि त्यामध्ये एक मूल आहे. शिल्पामध्ये चेहेरे किंवा नाकडोळे इत्यादी अवयव स्पष्ट नाहीत, चेहऱ्यांवर भाव नाहीत; पण झुकलेल्या स्त्रीच्या शरिरात मार्दव आहे, त्या बाबागाडीवर झुकून ती ज्या प्रकारे छत्र धरण्याचा प्रयत्न करते आहे. ते सुंदर आहे. आणखीही एक कल्पना आहे. हे शिल्प अखंड आहे आणि आई, बाबागाडी आणि मूल या गोष्टी एकमेकांपासून अलग केलेल्या नाहीत. त्यामुळे बाबागाडी आणि मूल हा आईचाच एक भाग आहे असंही या शिल्पामधून जाणवतं.

प्रदोषदास गुप्ता यांचं 'आफ्टर द होली डीप' हे शिल्प आणि भावेश सन्याल यांचं 'विंटर' हे शिल्प. हीही अशीच मर्यादित रेषा–आकार यांचा वापर करून अधिक सुचवणारी. 'विंटर'मध्ये काळपट मानवी आकृतीनं स्वतःभोवती पांघरूण लपेटून घेतलं आहे, असं वाटतं तर 'आफ्टर द होली डीप' मध्येही, नुकतंच पाण्यातून बाहेर येऊन शरीराभोवती वस्त्र गुंडाळलं आहे, त्यामध्ये थंडीपासून बचाव, लज्जारक्षण असा भाग आहे, या अनुभवाला शिल्पकारानं मूर्त केलं आहे चकचकीत पिवळ्याधमक ब्रॉन्झच्या वापरानं ही माणसं होली डीपनं अगदी पवित्र होऊन चकाकताहेत, असंही वाटतं !

ही शिल्पं म्हणजे केवळ छोटया–छोटया कल्पना होत्या. त्या साकार करताना समर्थ कवीनं चांगले शब्द वापरले असते किंवा कदाचित त्यांच्यातल्या काही शब्दांच्या माध्यमात पकडताना हरवूनही गेल्या असत्या, कारण त्रिमितीतल्या दृश्य माध्यमातच कलाकारानं त्यांची कल्पना केलेली आहे.

रोजवुडमधलं 'टॉर्सो' हे ए. एम. डेवियखाला यांचं शिल्प हा आणखी एक प्रकार. लाकडाच्या ओंडक्यावर, फारशी कामगिरी

न करता, फक्त त्याला पॉलिश करून शिल्पकारानं पेश केलं आहे आणि झाडाच्या या ओंडक्याचं स्वरूप मानवी धडाशी बरंच मिळतं-जुळतं आहे.

## गेटस् ऑफ हेवन

अजित चक्रवर्तींचं 'गरुड कॅरिंग होली-स्टोन' हे शिल्प म्हटलं तर मिस्किल, म्हटलं तर धक्कादायक, क्रांतिकारी. यातला गरुड व्यवस्थित गरुडासारखा, धारदार चोच, तरतरीतपणा, उडण्याची बळकट पोज इत्यादी. त्याच्यावरचा होली-स्टोन म्हणजे विष्णु आणि विष्णूसाठी फक्त दगड वापरला आहे. त्याला रूपरंग नाही. एका बाजूला चक्र इत्यादी खुणा आहेत म्हणून त्याला विष्णु म्हणायचं. बाकी तो पूजेतल्या शाळिग्रामासारखा नुसता गुळगुळीत लाबोडका दगड आहे आणि या कानापासून त्या कानापर्यंत पसरलेलं तोंड तेवढं त्याला आहे, कदाचित मालक–नोकर सबंधावर, त्यातल्या तणावावर प्रकाश टाकणारं शिल्प तर चक्रवर्तींना उभं करायचं नसावं ?

तशीच अर्थपूर्ण आहेत सर्वरी रॉयचौधरी यांची तीन शिल्पं– 'गेटस् ऑफ हेवन–नं. १', 'नं. २' आणि 'नं. ३' ही स्वर्गाची दारं म्हणजे मोठमोठ्या कमानी आहेत आणि त्यांच्यातल्या फटी म्हणजे ही दारं; पण एकापासून ते तिसऱ्यापर्यंत जाताना ही दारं क्रमाक्रमानं लहान होत जातात. त्यांच्या भोवतीच्या कमानी जाडजूड आणि वेड्यावाकड्या होत जातात आणि शेवटचं दार तर कमानींच्या वळणावळणामधून कसंबसं शोधून काढावं लागतं. ही कल्पना पुरेशी बोलकी आहे.

माणूस आणि त्याची अवस्था, त्याची उत्क्रांती आणि स्थिती हेही कलाकाराचे आवडीचे विषय आहेत. माणसाचा समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, काळाच्या संदर्भात, विज्ञानाच्या संदर्भात विचार करणारी किती तरी अर्थपूर्ण शिल्पं या प्रदर्शनात होती.

सतीश गुजराल यांचं 'क्रुसिफिक्सेशन' हे शिल्प. मध्यम ब्रन्ट वुड. काळ्या फळ्याच्या तुकड्यांनी एक चौकट तयार केलेली. त्याच्या मधोमध एक मानवी आकृतीसारखी आकृती पक्की केलेली. तिचं स्वरूप बरंच सांगाड्यासारखं. आकृती बनवण्यासाठी घोड्याचे लगाम, पट्टे इत्यादींचा सढळ वापर. काळ्या लाकडी पट्ट्याच्या रंगानं एकूण विषयातला भीषणपणा जाणवतो. लगामाच्या वापरानं एकूण परिस्थितीचं अ–मानवीपण जाणवतं. त्यामधला अटळपणा जाणवतो तो त्या शिल्पाच्या अभेद्य रचनेतून.

'ट्रॅप्ड' आणि 'एक्झिक्युशन' ही पिलू पोचखानवालांची अतिशय सुंदर अशी दोन शिल्पं. सिरॅमिक आणि स्टोनं घडवलेल्या या दोन्ही शिल्पांत लांब असे मानवी चेहरे आहेत. त्यांचा रंग काळसर तांबूस आहे आणि त्याच्या चेहऱ्यांवर जीर्णशीर्ण कळा आहे. ते जिवत मानवी चेहरे मुळी वाटतच नाहीत आणि तरीही त्याच्या चेहऱ्यांवरचा भकासपणा, दुःख अगदी ठळकपणे जिवत मानवी वाटतो. नाक–डोळे इत्यादि काहीही स्पष्टपणे दाखवले नसले तरीही ! 'ट्रॅप्ड' शिल्पामधला मानवी चेहरा एका चौकटीत अडकला आहे; पण ही चौकट दोन्ही बाजूनी उघडीच आहे. तरीही अशा उघड्या चौकटीत तो अडकला आहे. हे सारंच फार अर्थपूर्ण आहे.

वेद नायर यांची दोन शिल्पं आहेत– 'मॅनकाइन्ड–२१०३' आणि 'मॅनकाइन्ड–२११०'. ती दोन्हीही एकमेकांच्या सदर्भात पहायला हवीत. आजच माणूस माणसाशी फटकून रहातो आहे. समाजाचं एकजिनसीपण आणि घट्ट वीण विरळ होत चालली आहे तर २१०३ आणि २११० साली ते कसं असेल ? पृथ्वीचं स्वरूप काय असेल ? ब्रांझ आणि लाकडाची ही दोन्ही शिल्पं आहेत. २१०३ सालच्या शिल्पामध्ये एका अरुंद लाकडी फळीवर 'मॅनकाइन्ड'ची प्रतिनिधी म्हणून एक स्त्री उभी आहे. तिच्या या अरुंद फळीवरून खाली पायऱ्या उतरून जातात, त्या शेतांमध्ये. या स्त्रीच्या अंगावर कपडे नाहीत; पण डोक्यावर मुकुट आहे. मानेभोवती एक दागिना आहे. एकूण चित्राच्या भव्य पसाऱ्यात मानवी जातीचीही प्रतिनिधी अगदीच छोटीशी दिसते आहे; पण ती ज्या उमेंट डौलात उभी आहे, त्यानं ती नगण्य मात्र वाटत नाही. २११० सालच्या शिल्पात परिस्थिती वेगळी आहे. इथे पूर्वीप्रमाणे एखादाच माणूस नाही, सात-आठजण आहेत; पण इथे गवत–माती–शेतांचा स्पर्श नाही. त्याहूनही भयंकर म्हणजे ही माणसं पिरॅमिडमध्ये रहाताहेत आणि त्याचा जगाशी सपर्क नाही हेही सर्व नग्न आहेत आणि त्यांच्यातल्या ठळकपणे नजरेत भरणाऱ्या गोष्टी म्हणजे त्यांचे मुकुट, त्यांचे पंख आणि त्यांचे लैंगिक अवयव. भविष्यकालीन मानवी जीवनातले ठळक घटक कोणते असतील यांचं हे बोलकं दर्शन आहे.

एम. एफ. हुसेन हे प्रसिद्ध चित्रकार त्यांनी तयार केलेलं 'दॅट ऑब्स्क्युअर ऑब्जेक्ट ऑफ डिझायर' हे एक वैशिष्ट्यपूर्ण शिल्प या प्रदर्शनात आहे. खरं म्हणजे हुसेन यानी एक नवाच कलाप्रकार निर्माण केला आहे असं म्हणायला हवं. कारण ही कलाकृती चित्र आणि शिल्प याच्या सीमारेषेवरली आहे. या शिल्पात पाढरे लाकडी चौरस चौकोन एकमेकांवर रचून ठेवले आहेत. हे चौकोन पोकळ आहेत आणि त्याची एकूण रचना पत्त्याच्या बंगल्यासारखी वाटते. या चौकोनात सर्व बाजूनी काळ्या रंगानं मानवी रेखाचित्रं काढली आहेत. या चित्राना सर्वच अवयव आहेत असं नाही. मानवी जीवनातले विविध व्यवहार करताना या आकृती दिसतात. एकूण रचनेभोवती विटा, वाळू, दगड, माती पसरली आहे आणि त्यामध्ये सिगरेटची थोटकं, काचाचे तुकडे इत्यादि कचराही आहे. या शिल्पामधला 'अभिलाषेचा विषय' म्हणजे अर्थातच पत्त्याच्या बंगल्यासारखी दिसणारी चौकोनी घरं. आणि त्या घरांमधून होणारे विविध मानवी व्यवहार.

ए. एम. डेवियरवाला यांचं 'मॅन विथ हुक' हे शिल्प लोखंडी भंगारापासून तयार केलेलं आहे. त्याला थोडा यंत्रमानवाचा आभास आहे. त्याच्या दिसण्यात भौमितिक वेडेवाकडेपणा आहे. आणि त्याच्या हातात हुक असला तरी स्वतःच अडकल्यासारखा निर्जीव, निर्बुद्ध भाव त्याच्या चेहऱ्यावर आहे.

जीर्णशीर्णपणा चित्रित करणारं पिलू पोचखानवालाचं 'टाइम पास्ट,' वैश्विक उलथापालथ दाखवणारं त्यांचंच 'सनब्लास्ट–२' धातूमधला कोमल वळणदारपणा दाखवणारी शिव सिंग यांची 'ॲंग्युलर फॉर्म', 'ब्रास फॉर्म', 'फॉर्मेशन' ही शिल्पं. जणू काय सूर्याचं झाडच आहे, अशा प्रकारे रचना केलेली, बालन नाम्बियार यांची 'स्कल्पचर–१' 'स्कल्पचर–२' ही ॲबस्ट्रॅक्ट शिल्पं–ही या प्रदर्शनातली आणखी अर्थपूर्ण, सुदर शिल्पं.

इतकं सुदर, वैविध्यपूर्ण प्रदर्शन भरवल्याबद्दल जहांगीर आर्ट गॅलरीचे आभार मानायला हवेत !

– ललिता बर्वे

कामगार वृत्त

# मर्फी : टाळेबंदी आणि दोन युनियन्स

ठाणे येथील 'मर्फी इंडिया' या रेडिओ कंपनीतील १६०० कामगार गेल्या १६ महिन्यांपासून कंपनी बंद असल्याने बेकार आहेत ! काहीही करून कंपनीने टाळेबंदी उठवावी म्हणून ते चहूबाजूंस हातपाय पसरत आहेत; पण अद्याप त्यांच्या हालअपेष्ठा संपलेल्या नाहीत !

डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या मर्फीतील कामगारांनी बोनसच्या प्रश्नावरून कंपनीच्या आवारात आंदोलन सुरू केल्याने कंपनीने २३ ऑक्टोबर १९८१ पासून कारखान्यात टाळेबंदी पुकारली. टाळेबंदी पुकारल्यानंतर झालेल्या एका जाहीर सभेत डॉ. सामंतांनी टाळेबंदीच्या काळाचा पगार आणि मागणी केलेला बोनस मिळाल्याखेरीज कंपनीत कोणाही कामगाराने पाऊल टाकावयाचे नाही अशी घोषणा केली. डॉ. सामंतांच्या सांगण्यानुसार व्यवस्थापकच शरणागती स्वीकारून आपल्याकडे येतील, या गोष्टीवर विश्वास ठेवून कामगार गप्प बसून राहिले. कामगार सहा महिने असे गप्प बसून राहिले; पण कै. रामभाऊ म्हाळगी यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या लोकसभेच्या जागेसाठी जेव्हा डॉ. सामंतांनी निवडणूक-रिंगणात पाऊल टाकलं तेव्हा कामगारांनी इतरत्र हालचाल करण्यास सुरुवात केली.

डॉ. सामंतांकडून कंपनी पुन्हा उघडणे कठीण असल्याचे जाणून त्यांनी भारतीय मजदूर संघ या कामगार संघटनेचे नेतृत्व स्वीकारण्याचे ठरविले. बहुसंख्य कामगारांनी भा. म. संघाचे नेतृत्व स्वीकारावे म्हणून त्यांनी सह्या गोळा करण्याची मोहीम सुरू केली. ह्या सह्या ६०० ते ८०० जमा झाल्या असा दावा भा. म. संघ करत असतानाच डॉ. सामंतांच्या अनुयायांनी सह्या २०० देखील नाहीत असे सांगण्यास सुरुवात केली!

आपल्याकडे पुरेशा सह्या आहेत हे भा. म. संघाने अप्पर कामगार आयुक्त पी. जे. ओवीद यांना दाखवून दिले. आता व्यवस्थापकांना टाळेबंदी उठवण्यास आपण भाग पाडा अशी जोराची मागणी भा. म. संघाने ओवीद यांच्याकडे केली. ओविदांनी कंपनीच्या श्री. राव आणि माथन या दोन उच्च अधिकाऱ्यांना वाटाघाटीसाठी बोलावले. हा महिना ऑगस्ट १९८२ चा होता ! कंपनी चार-आठ दिवसांत चालू होईल असे वातावरण सर्वत्र तयार झाले होते.

याच अनुषंगाने मी १९ जून ८२ च्या 'माणूस'मध्ये "भा. म. संघाच्या प्रयत्नामुळे 'मर्फी' पुन्हा सुरू होण्याच्या मार्गावर" हा लेख लिहिला होता. त्या वेळी वातावरणच तसे होते.

या लेखानंतर दीड महिन्याच्या आतच—म्हणजे ५ ऑगस्ट ८२ रोजी अप्पर कामगार आयुक्त ओवीद यांनी आपल्या कार्यालयात कंपनीच्या राव व माथन या दोन अधिकाऱ्यांना बोलावून घेतले होते. भा. म. संघाचे नेतेही या वेळी उपस्थित होते. काही तरी निर्णय लागणार व टाळेबंदी उठणार असे वाटत असतानाच डॉ. सामंतांच्या महाराष्ट्र जनरल कामगार युनियनने ठाणे औद्योगिक न्यायालयातून एक मनाई हुकूम आणला. त्यात चार कारणे होती —

१) टाळेबंदी लागलीच उठवावी.

२) ऑक्टोबर ८१ चा थकलेला पगार व टाळेबंदी नोटिसांचा १४ दिवसांचा पगार मिळावा.

३) महाराष्ट्र जनरल कामगार युनियन सोडून इतर कोणत्याही संघटनेशी करार करू नये.

४) टाळेबंदीनंतर झालेल्या कोणत्याही कराराची अंमलबजावणी न होणे.

टाळेबंदी उठविण्याबाबत बोलणी सुरू असतानाच डॉ. सामंतांनी हा मनाई हुकूम आणल्याने सर्वांवर पाणी पडले. न्यायालयात सुनावणी सुरू झाली. भा. म. संघाने यात आपली बाजू मांडण्यासाठी स्वतःला गोवून घेतले. १३ सप्टें. ८२ रोजी न्यायालयाने मनाई हुकुमातील ३ आणि ४ कलम रद्द केले. ऑक्टोबर ८१ चा पगार देण्यास न्यायालयाने व्यवस्थापकांस भाग पाडले; पण टाळेबंदी उठवण्याबाबतची सुनावणी तशीच पुढे चालू राहिली !

अखेर १७ जानेवारी १९८३ रोजी सौ. एन. ए. कदम यांच्या न्यायालयाने डॉ. सामंतांचा हा अर्ज फेटाळून लावला. या निकालाविरुद्ध डॉ. दत्ता सामंतांची युनियन आता उच्च न्यायालयात गेली आहे.

गेल्या १६ महिन्यांचा हा इतिहास पाहिला तर फक्त हेच दिसून येते की, दोन युनियनच्या नेतृत्वाच्या वादात बिचारे कामगार फरफटत आहेत ! कामगारांना आज फक्त टाळेबंदी लवकरात लवकर उघडणारा नेता आणि युनियन हवी आहे. त्यासाठी ते कोणाच्याही पाठीशी जाण्यास तयार असल्याचे दिसते. कधी डॉ. सामंतांचा जोर दिसला तर कामगार त्यांच्या युनियनला सह्या देतात, तर कधी भा. म. संघाचा जोर दिसला तर ते त्यांनाही सह्या देतात. हे करण्यापाठीमागे एकच कारण— कंपनी लागलीच सुरू व्हावी ! नेमक्या ह्याच गोष्टीमुळे कंपनीचे व्यवस्थापक टाळेबंदी उठविण्याबाबत उदासीन असल्याचे दिसतात. टाळेबंदी उठवल्यानंतर कामगार पुन्हा काही करणार नाहीत या गोष्टीवर त्यांचा विश्वास नाही. अशा परिस्थितीत कंपनी उघडणे शहाणपणाचे नसल्याचे जाणून ते दोन युनियनमध्ये सह्या गोळा करण्याबाबत चाललेल्या शर्यतीचा तमाशा पहात आहेत ! हे माहिती असूनदेखील कामगार-आयुक्त आणि अप्पर कामगार-आयुक्त गप्प आहेत. त्यांनी हे मौन सोडावयास हवे आणि टाळे-

बंदी उठवण्यास कंपनीस भाग पाडले पाहिजे ! कामगार शिस्तीने काम करण्याबाबतची हमीपत्रे देण्यास तयार असल्याने सरकारने कंपनीवर दबाव आणून ही टाळेबंदी उठवली पाहिजे. श्री. वसंतरदादा पाटील सरकारकडून कामगार याच गोष्टीची वाट पाहात आहेत !

### श्री. मंगेशकर : मुलाखत

डॉ. सामंतांच्या महाराष्ट्र जनरल कामगार युनियनच्या मर्फी युनिटचे सेक्रेटरी गणेश दिनकर मंगेशकर हे आहेत. यांनीच पुढाकार घेऊन डॉ. सामंतांची युनियन मर्फीत आणल्याने कामगाराचे ते नेतृत्व करीत आहेत. दोन युनियनच्या नेतृत्ववादात बिचारे कामगार होरपळत आहेत; अशा वेळी तुमचे म्हणणे काय आहे हे जाणून घेण्यासाठी मंगेशकरांची त्यांच्या ठाणा येथील कार्यालयात भेट घेतली. त्यांच्याशी ज्या गप्पा झाल्या त्या अशा—

प्र : डॉ. सामंत भारतीय मजदूर संघावर संपफोडेगिरीचा आरोप करतात. मर्फीत भा. म. संघ घुसला का ?

उ. नाही ! येथे भारतीय मजदूर सं स्वत: घुसला नाही. आमच्यातीलच काही कामगारांनी त्याच्याशी बोलणी केली व कंपनी सुरू होण्याबाबत प्रयत्न करण्यास सांगितले.

प्र : भारतीय मजदूर संघाच्या प्रयत्नाने कंपनीतील टाळेबंदी उठण्याची शक्यता दिसत असतानाच मनाईहुकूम तुम्ही का आणला ? टाळेबंदी उठू नये असे तुम्हास वाटत होते का ?

उ. मुळीच नाही ! टाळेबंदी उठावी; पण त्याने कामगाराचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही मनाई हुकूम आणला.

भा. म. सघाने, ९०० कामगाराच्या सह्या आम्हास दिल्या आहेत, असे अप्पर कामगार आयुक्त ओविद आम्हास म्हणाले. आम्ही सह्या दाखवा असे म्हणताच ओविदांनी हा आकडा ८०० वर आणला आणि प्रत्यक्ष आम्ही जेव्हा सह्या पाहिल्या तेव्हा त्या ५४७ इतक्याच होत्या ! त्यातही पुन्हा २१२ सह्या खोटया व ५६ सह्या दोनदा केलेल्या होत्या. यावरून भा. म. सघाकडे कामगार बहुसख्येने नाहीत हे सिद्ध झाले होते. अशा वेळी कामगाराच्या फायद्याचा करार त्यांच्यामार्फत होऊच शकणार नाही, म्हणून सर्वांच्या भल्यासाठी आम्ही न्यायालयातून मनाई हुकूम आणला.

प्र : तुमचा अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. टाळेबंदी उठण्याबाबत तुमच्यासारखाच भा. म. संघ पुन्हा प्रयत्न करीत आहे. त्यांच्याकडे कामगार स्वेच्छेने जात असतील तर तुमचे धोरण काय राहील ?

उ जेथे बहुसंख्य कामगार तेथे आम्ही हे आमचे तत्त्व आहे. मर्फीतील बहुसंख्य कामगारांनी भा. म. संघाचे नेतृत्व स्वीकारण्याचे ठरविले तर डॉ. सामंतांचे झेंडे त्याच्याच कार्यालयात टाकून आम्ही पण भा. म. संघाचे नेतृत्व स्वीकारू. मर्फीच्या कामगाराची ही जागा, सर्व मालमत्ता आम्ही भा. म. संघाच्या ताब्यात देऊ ! भा. म. सघच काय कोणीही पुढाकार घेऊन कपनी सुरू केली तर आम्ही कामगाराना कामावर जाण्यास सांगू कंपनीने आम्हास कामावर नाही घेतले तर आम्ही बाहेर राहू; पण कामगारांना कामावर जाण्यास सांगू. त्यासाठी हमीपत्रे देण्याची कंपनीची कोणतीही अट आम्ही मान्य करू.

प्र : प्रथम तुम्ही टाळेबंदीच्या काळचा पगार, मागितलेला बोनस घेतल्याखेरीज कामावर न जाण्याचा निश्चय घेतला होता. आज हा आपला पराभवच आहे असे तुम्हास वाटत नाही का ?

उ. होय ! हा आमचा पराभवच आहे, कोणतीही कंपनी ६–८ महिने बंद राहिली तर मालक आपण होऊन वाटाघाटीस तयार होतात व अशा वेळी त्याला हवे तसे नम्र करता येते, हे डॉ. सामंतांचे तत्र मर्फीतही यशस्वी होईल असे वाटल्यानेच आम्ही प्रथम तसे बोललो होतो; पण आज सहा महिने उलटून गेलेत. मालकाचे काहीही नुकसान झालेले नाही ! कत्राटपद्धतीवर काम करवून घेण्याने त्यांचे काम जोरात सुरू आहे. बिचाऱ्या कामगारांची उपासमार होत आहे. म्हणून त्यांच्या भल्यासाठी आम्ही या निर्णयाप्रत आलो आहे.

प्र : पण भा म. संघ यात यशस्वी होईल असे आपणास वाटते का ?

उ. मुळीच नाही ! मुळात कामगारच त्याच्या पाठीशी नाहीत. डॉ. सामत हा विकला जाणारा माणूस नाही आणि त्यांची संघटना मजबूत आहे हेच मालकाना नको असल्याने ते टाळेबंदीचा कालावधी लाववत आहेत. आज टाळेबंदी उठवण्यासाठी कदाचित कामगार भा. मं. संघाकडे जातीलही पण त्याचा 'अमर डाय केम' झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठीच आपण तूर्तास गप्प बसा, प्रथम आम्हास टाळेबंदी उठवू द्या असे मी भा. म. संघाच्या नेत्या जयाबेन नाईक याना सांगितले होते. ते काहीही असले तरी डॉ. सामंतच मर्फी कामगाराचे कल्याण करू शकतात व टाळेबंदीही आम्हीच उठवू शकतो हे लवकरच दिसून येईल.

### श्रीमती नाईक

मर्फी इंडियामध्ये एका बाजूला डॉ. सामंतांची युनियन आहे तर दुसऱ्या बाजूला भारतीय मजदूर संघाची ! डॉ. सामंताच्या वतीने डॉ. सामंत खुद्द व मंगेशकर लढत आहेत तर दुसऱ्या बाजूला श्रीमती जयाबेन नाईक आणि प्रभाकर ओक ! जयाबेन नाईक या तशा वयाने कललेल्या पण कार्य तिशीतल्या तरुणासारखे ! डॉ. सामत चहूबाजूस लखलखत असतानाच शिवाजी पार्कवर झालेल्या सभेत त्याच्यावर त्यांच्या कामगारांसमोर तोफ डागण्याचे काम जयाबेन नाइकांनी केलेलं ! मर्फीत भा. म. संघातर्फे त्याच मैदानात आहेत. त्यांची भेट घेतली असता झालेल्या गप्पा—

प्र : ऑगस्ट १९८२ मध्ये डॉ. सामंतांनी आणलेल्या मनाईहुकुमाबाबत आपले काय मत आहे ?

उ. सामंतांची ही कृती कामगारात दुफळी माजविणारी आहे. बहुसंख्य कामगार आमच्याकडे आले असताना आणि टाळेबंदी उठण्याची चिन्हे दिसत असतानाच हा मनाई हुकूम आणून डॉ. सामतानी कामगारांची एकी तोडली. यामुळेच टाळेबंदी उठण्यास विलंब लागला !

प्र : मर्फीसाठी गेल्या वर्षीपासून इतके परिश्रम घेऊनही अद्याप आपणाला यश आलेलं नाही. आपण या डावपेचात कमी पडला असे आपणास वाटत नाही का ?

उ. प्रकरण न्यायालयात गेल्याने आम्ही काहीच करू शकत नव्हतो; पण न्यायालयाने आता डॉ. सामंताचा अर्ज फेटाळून लावला आहे. आम्ही पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत. १ फेब्रुवारी १९८३ रोजी हुतात्माचौकात धरणे धरण्याचा आम्ही कार्यक्रम केला. ७ फेब्रुवारी ८३ पासून मंत्रालयासमोर चक्री उपोषणाचाही आम्ही कार्यक्रम केला. अप्पर कामगार आयुक्ताना आम्ही ६०० कामगाराच्या सह्याचे निवेदन ९ फेब्रुवारी रोजी दिले आहे शिस्तीने काम करण्याचे हमीपत्र कामगारानी दिले आहे आता ओवीदानी व्यवस्थापकांना टाळेबंदी उठवण्यास भाग पाडले पाहिजे तसे नाही झाले तर कंपनीच्या हेडऑफिसमोर आम्ही आमरण उपोषण सुरू करणार आहोत !

— मोहन शं. कुलकर्णी

# दोन पत्रकार

मुकुंद सोमणी

## भारतीय : खुशवंतसिंगच्या चष्म्यातून

खुशवंतसिंगइतका वादग्रस्त संपादक व लेखक भारतीय साहित्य-सृष्टीत झाला नसावा. मराठीत अत्रे असे होते म्हणा; पण टीका झेलण्याची खिलाडूवृत्ती अत्र्यांकडे नव्हती. बऱ्याच लोकांना खुशवंतसिंग त्याच्या फर्ड्या इंग्रजीसाठी वाचावासा वाटतो, तर खुशवंतसिंग या नावाचीच काहींना ॲलर्जी आहे. त्याचे मुख्य कारण त्याचे गांधी-घराण्याबद्दलचे प्रेम. इतर बाबतीत चिकित्सकपणा व काही वेळा विवेकीपणा वगैरे दाखवणारा खुशवंतसिंग, इंदिरा गांधी म्हटल्या की, फेटयासह नतमस्तक होतो. इंदिरा गांधीबद्दलचे खुशवंतसिंगचे प्रेम हे 'इररॅशनल' सदरात मोडणारे आहे. हे एकदा मान्य केले की, त्याचे इंदिराप्रेम हे विनोदी वाटू लागते व पुढचे वाचन मजदार होऊ शकते.

संजय गांधीलाही तो थोर मानतो. गांधी घराण्याशी जे कोणी थोडेफार पत्रकार एकनिष्ठ आहेत त्यात खुशवंतसिंग अग्रेसर आहे. त्यामुळेच काहीजण त्याला खुशामतसिंगही म्हणतात; पण खुशवंतसिंग हे सगळं मजेनं घेऊ शकतो. एकदा तर संजय गांधीबरोबर असताना एका पार्टीत स्वतःची ओळख 'संजय गांधीचा चमचा' अशी करून दिली होती. ( कारण खुशवंतसिंगाचे त्या वेळचे ते व्यवच्छेदक लक्षण असायचे ).

लाहोर व लंडन इथे पदवी-शिक्षण घेऊन काही काळ या गृहस्थाने वकिलीही केली. अमेरिकेत व्याख्याता म्हणून राहिला. भारतीय विदेशसेवेत चाकरी केली. 'योजना' या नियोजनमंडळाच्या मासिकापासून नॅशनल हेरल्ड, इलस्ट्रेटेड विकली आणि अलीकडे हिंदुस्थान टाइम्स या तीन वृत्तपत्रात संपादकगिरी केली. मध्यतरी मनेकाच्या 'सूर्य' वरसुद्धा झळकायचा; पण इलस्ट्रेटेड विकलीची कारकीर्द सर्वांत गाजवली! त्याने विकली सोडल्यावर तिची जी वाताहत झाली ती अद्यापही चालूच आहे! विकली लोकप्रिय करण्यासाठी त्याने नियमित नग्नचित्रंही छापली. रिकाम्या बल्बमध्ये पुस्तकाच्या ढिगाऱ्यात बाटलीसह 'तावातावा 'नं लिहिणाऱ्या सरदारजीची प्रतिमा आजही त्याच्या हिंदुस्थान टाइम्समधल्या लोकप्रिय सदरावर चमकत असते. संडे ऑब्झर्वर, आनंदबझार पत्रिकासारखी प्रतिष्ठित पत्रे हे सदर दर आठवड्याला पुनर्मुद्रित करतात. यावरून खुशवंतसिंगची लोकप्रियता लक्षात यावी. गेल्या २६ जानेवारीला बिर्लांनी खुशवंतसिंगाची उचलबांगडी केली तेव्हा त्याच्या काही मित्रांना वाटले आता हा रिटायर होणार! त्यावर तो मिस्किलपणे म्हणाला, 'मी रिटायर होईन तो फक्त निगमबोध घाटावर किंवा चंदनवाडीत जाईन तेव्हाच!'

तर खुशवंतसिंग हे एक अजब रसायन आहे. त्याचा लिहिण्याचा आवाका व झपाटा, विषयाचं वैविध्य पाहिलं की, माणूस अवाक् होतो. त्याच्या स्तंभलेखनाकडे वळून पाहिलं तर ज्या बारीकसारीक विषयावर तो ज्या तपशिलात लिहितो ते आठवलं तरी थक्क व्हायला होतं! अर्थात काही वेळा भर्ताडही लिहितो म्हणा. खुशवंतसिंगाचं वाचन चतुरस्र आहे. तो कायम स्वतःच्या, सरकारच्या किंवा अन्य कुणाच्या तरी खर्चाने देश-विदेश भटकत असतो. त्याचा व्यवहार प्रचंड असतो. त्याचा लोकसंग्रह अफाट आहे. लेखकपण विसरून रस्त्यावरच्या गर्दीत मिसळून जाण्याचं कसब त्याला अवगत आहे. तो शीख असूनही कडवा नाही. त्याला स्त्रीस्वातंत्र्याची चाड आहे. त्याची स्त्रियांची वर्णनं नेहमीच सविस्तर व पारदर्शी असतात. काही लोक त्याला चावट म्हणतात, 'बाई म्हटली की, तिच्यामागे आंबट-चिंबट बोलण्यापेक्षा तिच्या सौंदर्याला खुल्लमखुल्ला दाद देणं आपल्याला आवडतं' असं त्याचं म्हणणं. त्याच्या तिखट व बेधडक लिहिण्यामुळं काहीजण सकारण दुखविले गेले आहेत. अलीकडे त्याने बाबुराव पटेल, रजनी पटेल, लाला श्रीराम यांच्यावर मृत्युटीपा लिहून प्रचंड वादळ उठवले. 'मरणान्तानि वैराणि' हे त्याला झूट वाटतं. 'मेलेल्या माणसाबद्दल तो केवळ मेलाय् म्हणून आदर वाटत नाही. एखादा माणूस संशयास्पद वाटला तर त्याला मेल्यावर फैलावर घ्यावा. कारण तो काही तुम्हाला कोर्टात खेचू शकत नाही' इति खुशवंतसिंग!

चौसष्ट वर्षांच्या या 'जंटलमन सरदारजी' ने संपादकगिरी-बरोबरच अनेक पुस्तकंही लिहिली आहेत. 'हिस्टरी ऑफ द सिख्स', 'द सिख्स' हे त्याचे शिखासंबंधीचे ग्रंथ अजूनही त्या विषयावरचे प्रमाण मानले जातात. 'ट्रेन टु पाकिस्तान' ही फाळणीच्या पार्श्व-भूमीवर लिहिलेली त्याची कादंबरी, त्या वेळच्या तंग वातावरणाच्या व रांगड्या पंजाबी जीवनाच्या समर्थ चित्रणामुळे फारच गाजली. भारतीय लेखकांनी लिहिलेल्या इंग्रजी कादंबऱ्यातली ती एक खरो-खरच चांगली व मनोरंजक कादंबरी आहे. 'द मार्क ऑफ विष्णु', 'आय शॅल नॉट् सिंग टु द नाइटिंगल' हे त्याचे कथासंग्रह. याशिवाय अनेक चरित्रग्रंथ लिहिले, कथासग्रह संपादित केले. अनुवाद हा तर त्याचा खास आवडता प्रांत. त्याच्या लेखन/व्यक्तिमत्त्वावर आधारित दोन पुस्तकेही राहुलसिंग यांनी संपादित केली आहेत.

'वी इंडियन्स' हे खुशवंतसिंगचे अलीकडचे पुस्तक. खास खुशवंत-सिंगचे—त्याच्या चष्म्यातून केलेली तीरमार. अर्थात—नायपॉलच्या 'इंडिया : अ वुंडेड सिव्हिलिझेशन' ची सर त्याला नाही. आपल्या-समोर आरसा धरून आपले विद्रूप दाखवून देणारी पुस्तकं अशी अधूनमधून यायला हवीत. अशा पुस्तकांमुळे आपली तथाकथित संस्कृती कधीही धोक्यात येत नसते, हे संस्कृतिरक्षकांनी लक्षात घ्यावे. 'काय घ्यायचं, काय टाकायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं!'

या पुस्तकात आपल्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनां-वर खुशवंतसिंगानं त्याच्या नेहमीच्या विनोदगर्भ, खमंग व निर्भीड शैलीत कोरडे ओढले आहेत व अनेक अपप्रवृत्तींची फेडाफेड करून

सोडली आहे. विद्रूप भारतीय, मी भारतीय का ? धर्म : सामान्यांची अफूची गोळी, हिंदू हा हिंदू कसा ? भारतीय स्त्री, भारतीयांचा सेक्स, आपण भ्रष्ट आहोत का ? आपली धर्मेंडखोरवृत्ती, दारूबंदी, इंग्रजी भाषा, ब्रिटिश लोक व भारत–अमेरिका–संबंध अशी एकूण १४ प्रकरणे आहेत. सगळयाच प्रकरणांचा आढावा घेता येणं कठीण असल्याने काही ठळक गोष्टींचा उल्लेख व्हायला हवा.

भारतीय जीवनात धर्म व जातींनी कसा धुमाकूळ घातला आहे याचा पहिल्या प्रकरणात सेतिहास परामर्ष घेतला आहे. इथे प्रत्येक धर्म दुसऱ्या धर्मावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात असतो. एखाद्या देवळाच्या उत्खननात एखादा तारेचा तुकडा सापडला तर हिंदु म्हणणार आमच्याकडे पूर्वी टेलिफोन होता, म्हंजे पहा आम्ही किती प्रगत. तर मशिदीखाली काही सापडले नाही तरी उलेमाचा तुरा वरच. तो म्हणणार, आम्ही तर तुमच्याही पुढे होतो. कारण आमच्याकडे वायरलेस टेलीपथी होती ! या सगळया धार्मिक कर्कशतेतून आजच्या फुटीरवादी चळवळी उभारल्या आहेत. त्यामुळे दुसरीकडे उद्योग, तंत्रज्ञान, साक्षरता या सगळया प्रांतातली प्रगती काळया बाजूने ग्रासली आहे.

## सुशिक्षित जनावर

भारतीयांच्या विद्रूपतेचे कारण मूळ हिंदूधर्मातच असल्याचा लेखकाचा दावा आहे. ज्यू, क्रिस्टियन व मुस्लिमधर्म हे व्यक्ती-व्यक्तीतील परस्परसंबंधावर भर देतात, तर हिंदूधर्म (यात शीख, बौद्ध व जैनांचाही समावेश) अंतरात्म्याच्या विकासावर भर देतो. थोडक्यात हिंदु अधिक आत्मकेंद्री व स्वार्थी आणि बाह्य अवडंबरात ईश्वरसेवेचा आनंद मानतात. या सगळयातून द्वेष, संकुचितपणा, अहंमन्यता, सहकार्य न करण्याची वृत्ती व एकत्रितपणे झटण्याची अनिच्छा हे दुर्गुण उद्‌भवतात. आपण स्वतःला नम्र व सभ्य म्हणवतो व त्याच वेळी अफाट आत्मस्तुती करीत असतो. उगवत्या सूर्याला नमस्कार करण्यात आम्ही धन्यता मानतो. मंत्र्याचं सहा महिन्याचं पोर अंगावर मुतलं तरी तो आम्ही कृपाप्रसाद समजतो ! बडया लोकांशी आपलं कसं संधान आहे ते दाखवण्याचा आपला हास्यास्पद प्रयत्न कायम चालू असतो. सर्वज्ञपणाचा आव, चारित्र्यहनन, कामचुकारपणा, धनलोभ, सत्ताभिलाषा, भांडखोरपणा, ऊठसूठ कोर्टात जायची भाषा हे विद्रूप भारतीयाचे आणखी काही गुणविशेष.

सर्वसामान्य भारतीय माणूस देव-देव करण्यात आयुष्याचा बराच भाग व्यर्थ घालवतो. तोच भाग तो दुसऱ्याची सेवा करण्यात का घालवत नाही ? पूर, वादळ अशा आपत्तीप्रसंगी धार्मिक कार्यकर्ते कुठे गायब असतात ? निष्काम कर्म ही फक्त आस्तिकाचीच मक्तेदारी आहे का ? समाधी व मादक द्रव्यसेवनात फरक काय ? धर्म माणसाला चांगला माणूस बनवू शकतो का ? असे अनेक प्रश्न उभे करून त्यांची यथाशक्ती उत्तरे लेखकाने धर्मासंबंधीच्या चर्चेत केली आहेत, ती मुळातच वाचण्यासारखी आहेत. १७६१ च्या पानिपतच्या युद्धात भाऊसाहेब ज्योतिषी आणि भटाभिक्षुकांशी सल्लामसलत जास्त करीत. शेवटी दाणादाण मराठयांचीच झाली. याउलट एकाही ज्योतिषाला हात न दाखवता इंग्रजांनी भारतीयाचा सर्वत्र पाडाव केला हे दैवाधीनतेच्या बाबतीत दिलेले उदाहरण चपखल आहे.

ऋग्वेदकालापर्यंत ज्या भारतीय स्त्रीने पुरुषाइतकीच स्वातंत्र्ये (अगदी चार–पाच भ्रतार करण्याचेही) उपभोगली त्याच स्त्रियांना पुढे 'पुरुषस्य दासः' व्हायची पाळी आली ! पुरुषाने तिची पार पिठाची गिरणी करून टाकली ! स्त्रियांचा प्रश्न म्हटला की, प्रातिनिधिक भारतीय माणूस मूग गिळून वाळूत फक्त रेघोटया मारण्याचे काम इमानाने करणार !

'भारतीय माणूस व सेक्स' या प्रकरणात लेखकाने त्याच्या एका प्रवासातली घटना सांगितली आहे. एका स्टेशनावर एक नवीनच लग्न झालेलं जोडपं चढतं. त्यांचं लग्न वर्तमानपत्रातल्या जाहिरातीतून जुळलेलं. दोघंही एकमेकांना अनोळखीच. नवरा प्रोफेसर तर ही शिक्षिका. थोडयाशा बोलाचालीनंतर प्रोफेसरसाहेबांनी दिवे घालवून पटकन् मुद्दयालाच हात घातला आणि चार फुटांच्या जागेत डब्यातल्या सर्व प्रवाशांदेखत आपली पहिली रात्र सुरू केली ! बाईने मध्येच 'हाय राम' केलं आणि – लेखक म्हणतो – लग्नाचं सार्थक झालं ! 'हाय राम' चे असे तीन राउंड होतात. शेवटी त्यांचं स्टेशन येतं तेव्हा गप्पकन लागलेल्या दिव्यांच्या प्रकाशात ढुंगण उघडं ठेवून प्राध्यापक बायकोवर ढाराढूर झोपलेले ! 'चालायचंच पहिली रात्र होती त्यांची' अशी सहप्रवाशांची मखलाशी !

ज्या देशात कामसूत्रासारखा ग्रंथराज निर्माण होतो, तिथलीच ही सुशिक्षित जनावरं !

भ्रष्टाचाराची आपल्याकडची परंपरा रामराज्यापासूनची. त्याविरुद्ध आपण कायदे करतो, कमिशनं नेमतो तरीसुद्धा वशिलेबाजी, काळा बाजार, भेसळ ही भ्रष्टाचाराची सगळी रूपे सर्वकाळ थैमान घालत असतात! याला कारण आपला कायदा कमी पडतो व भ्रष्टाचार करणारे अमाप मांजलेत. यासाठी सामाजिक मूल्येच उखडून भ्रष्टाचाराविरुद्ध लोकयुद्ध सुरू करायला हवे. शाळा सुरू व्हायच्या आधी 'जनगणमन' ची तबकडी वाजवण्याऐवजी मुलांच्या मनावर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठसवायला हवी.

मी तुझ्यापेक्षा मोठा कसा हे सिद्ध करण्याची आपली अहमहमिका लागलेली असते. त्यासाठी पुढील गुण अंगी बाणवावे. मंत्र्यांसारखा उशीर करीत जाणे, मोठया लोकांचं अनुकरण करावं (उदा. जिनांची कॅप, नेहरूंचं जाकिट, सादिकभाईंचा गॉगल (रात्रीसुद्धा !), तारकेश्वरी सिन्हांच्या बटा इ) गाडयांचे नंबर, गाडीवर झेंडा या व्ही. आय. पी. पणाच्या बाबीवर विशेष लक्ष पुरवा, आपल्या अवती–भवती चमच्यांचा समुदाय बाळगा, घराचा पत्ता आकर्षक असावा, लोकांशी बेफिकिरीने वागा इ. इ.

दारूबंदीसारख्या ढोंगावर खुशवंतसिंग सर्वशक्तीनिशी हल्ला चढवतो. विषारी दारूचे दुष्परिणाम टाळायचे असतील तर दारूची किंमत कमी केली पाहिजे व मुक्तपणे विकली जायला हवी. (आपण दहा–बारा रुपयांना जी बियरची बाटली एखाद्या रेस्तरांमध्ये घेतो तिचा उत्पादनखर्च फक्त ५० पैसे इतका असतो.) तसेच दुसऱ्याच्या पैशाने दारू पिण्याची सवय घालवली पाहिजे अशी कोपरखळीही तो देऊन जातो. आपल्या शेतकऱ्यांना द्राक्षापासून स्वस्त पडणारी वाइन बनवायचं शिक्षण द्यायला हवं.

इंग्रजीचा दुस्वास करणाऱ्यांनी इंग्रजीला बनारसी शालू नेसवून तिचा परदेशी सुनेसारखा स्वीकार करावा असा व्यवहार्य सल्ला इथे मिळतो.

सर्वसामान्य सुशिक्षितांनाही या गोष्टी कळतात, तो सगळया

व्यवस्थेला शिव्याही देतो; पण इथली ओढ त्याला सोडत नाही. खुशवंतसिंग एके ठिकाणी म्हणतो, 'माझी बुद्धी व पोट मला सांगत परदेशीच जा; पण माझं मन म्हणतं इथंच बरायस तू. जेव्हा जेव्हा मी परदेशातून येतो आणि सांताक्रूझ विमानतळावरून घरी परतत असतो तेव्हा रस्त्याच्या कडेला बसलेले लोक पाहून माझ्या मनात विचार येतो, हा माझाच देश का ? दुर्गंधी असह्य होत असली तरी मी ओरडतो 'हो हो, ही माझी जन्मभूमी आहे. ती मला आवडत नाही तरी तिच्याबद्दल मला प्रेम आहे!' ¤

## गोरवालांचे ओपीनियन

'ओपीनियन' म्हणजे ए. डी. गोरवाला व गोरवाला म्हणजे 'ओपीनियन' हे समीकरण गेली २३ वर्षे पक्के होते; पण या वर्षाच्या २७ जानेवारीच्या अंकापासून गोरवालांनी 'ओपीनियन'च्या संपादनाची जबाबदारी 'सिग्नेचर' चे संपादक जहागीर पटेल याच्यावर सोपवली आहे व 'ओपीनियन'ची सडेतोड परंपरा नवे संपादक पुढे चालू ठेवतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. संपादकपदी राहाणार नसले तरी 'ओपीनियन' मधून अधूनमधून लिहिणार आहेत. सत्त्याऐंशी वर्षांचे गोरवाला गेले वर्षभर अंथरुणाला खिळून आहेत.

१९४० ते ५० च्या दरम्यान गोरवालाचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विषयांवरचे स्टेट्स्मन, टाइम्स ऑफ इंडिया व इंडियन एक्स्प्रेसमधले लेख वाचून नेहरूंचा गुलाबी चेहरा लालबुंद व्हायचा! फ्रॅंक मोरॅसने आपल्या टाइम्स व एक्स्प्रेसमधल्या संपादकीय कारकीर्दीत गोरवालाना मुक्त वाव दिला; पण या वृत्तपत्रांच्या मालकाच्या ते मर्जीविरुद्ध असल्याने या पत्रामधले स्तंभ गोरवालांना बंद करावे लागले. १९६० मध्ये 'ओपीनियन' हे अगदी छोट्या आकाराचे चार पानी साप्ताहिक त्यांनी सुरू करून स्वतःच्या विचारांना स्वतंत्र माध्यम दिले. पन्नास वर्गणीदार मिळाले. वर्षाची वर्गणी फक्त दोन रुपये. आपल्या विचारांमध्ये ज्यांना रस वाटू शकेल अशा सार्वजनिक व्यक्तींना, तसेच महाविद्यालये व सार्वजनिक वाचनालये व भेटेल त्याला ते 'ओपीनियन' देत. आज 'ओपीनियन' चे ६००० वर्गणीदार आहेत. आजतागायत वर्गणीच्या दरात त्यांनी एका पैशाचीही वाढ केली नाही! एवढेच नाही तर, १९७३ पासून वर्गणीदारांना 'ओपीनियन' जवळजवळ विनामूल्य मिळत आहे. कारण दोन रुपये वर्गणी आठवणीने पाठवणारे फार थोडे!

एखाद्या राजकीय किंवा सामाजिक घटनेवरचे गोरवालाचे सडेतोड व अगदी वेगळे असे भाष्य हे 'ओपीनियन'चे वैशिष्ट्य. (अलीकडे मराठी वाचकाना माहीत असलेल्या गौरी देशपांडे यांचे प्रवासवर्णनात्मक लेखही 'ओपीनियन' मधून येत असतात.) बहुतेक मोठी वृत्तपत्रे सरकारवर हल्ला करताना या ना त्या कारणाने हातचे राखून टीका करतात. त्यामुळे गोरवालाची कठोर व निर्भय टीका वाचायला वाचक उत्सुक असत. संसदेत विरोधीपक्ष जे कार्य करतो तेच कार्य 'ओपीनियन'ने कुठलीही भीडभाड न ठेवता इमानाने केले. 'ओपीनियन' चा हा सारा उद्योग त्यांनी स्वतःच्या खिशातले पैसे घालून व एकहातीच केला. 'मला स्वतःला मोटर नसेना का, 'ओपीनियन' आहे ना!' असे ते म्हणतात. ते स्वतः अविवाहित असून एकटेच राहातात!

गोरवालांनी आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची व निर्भीड लेखणीची छाप जिथे गेले तिथे उमटवली! धान्यावरील सरकारचे नियंत्रण काढून घेण्याच्या विरोधात ते होते. धान्यावर सरकारी नियंत्रण नसेल तर किंमती वाढून गरिबाचे हाल होतील असे त्यांचे मत होते; पण जेव्हा त्यांचे हे मत अग्राह्य ठरवले गेले तेव्हा त्यांनी १९४७ मध्ये कमॉडिटी प्राइसेस बोर्डाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्यपूर्व काळात सिंध प्रांताचे असि. कलेक्टर असताना गोरवाला गावोगावी जाऊन जनता न्यायालये भरवीत व जागच्या जागी न्याय देत. 'गोरवालांचा न्याय' त्या वेळी प्रसिद्ध होता. त्यांच्या जनता न्यायालयांमुळे स्थानिक जमीनदार व लोकप्रतिनिधी त्यांच्यावर दात-ओठ खाऊन असत.

आणीबाणीचा फटका 'ओपीनियन' सारख्या लढाऊ पत्राला बसणे साहजिकच होते. या काळात त्यांना अनेक छापखाने बदलावे तर लागलेच; पण अंक जप्त होण्याची आफतही आली. पुढे मिसाचा रणगाडा फिरू लागला व त्याखाली 'ओपीनियन' जास्तच रगडले गेले. प्रत्येक लेख सेन्सॉरच्या स्वाधीन करायचा गोरवालांना वैताग आला होता. कारण प्रत्येक लेखात काही ना काही 'आक्षेपार्ह' हमखास सापडायचे! शेवटी तुर्कमान-गेट प्रकरणावरील एका पुनर्मुद्रित लेखाने वाक्प्रचारातल्या उंटाची पाठ मोडली. मग गोरवालांनी चक्रमुद्रांकित पद्धतीने वाचकांना बंद-पाकिटातून पत्रे पाठवायला सुरुवात केली, तीही वेगवेगळ्या पोस्ट-ऑफिसांमधून

'स्पष्ट भाष्य व सडेतोड टीका' हे आपले लेखनब्रीद कोणी तरी चालू ठेवावे या एकाच हेतूने त्यांनी परिस्थिती बिकट असूनही 'ओपीनियन' बंद न करता ते नव्या संपादकांच्या स्वाधीन करणे पसंत केले आहे. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.




# पोलंडचा पुरुषोत्तम
# लेक वालेसा

मध्यरात्र केव्हाच उलटून गेली होती. हिवाळ्यातले थंडगार वारे गडॅन्स्कच्या रस्त्यारस्त्यातून उनाड पोरांसारखे भन्नाटपणे भटकत होते. सारं शहर निद्रेच्या उबदार कुशीत विसावलं होतं. धुक्याच्या पडद्यातून डोकावणारे रस्त्यावरील विजेचे दिवे आपल्यापरीनं प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत होते. रस्ते उजळण्यात ते थोडेफार यशस्वी झाले तरी लोकांच्या मनातील अंधार नाहीसा करण्यास ते असमर्थ ठरले होते. गडॅन्स्कमधील लोकांच्याच नव्हे तर साऱ्या पोलंडवासियांच्या मनातच हा अंधार भरून राहिला होता. सतत भेडसावणारी भीषण भवितव्याची भीती काळोखाप्रमाणं साऱ्यांच्या मनात दाटून राहिली होती. अनिश्चिततेचं वादळ देशभर घोंगावत होतं. राजकीय अस्थिरतेच्या प्रचंड लाटा पोलंडची नौका बुडवून टाकतील की काय अशी साधार भीती साऱ्यांच्या मनात निर्माण झाली होती. अशा वेळी एक व्यक्ती मात्र दीपस्तंभासारखी लोकांना आशेचा किरण दाखवत होती. या क्षणी ती व्यक्ती आपल्या फ्लॅटच्या शय्यागृहात शांतपणे झोपी गेली होती. त्या व्यक्तीचं नाव लेक वालेमा, जगाच्या कुतूहलाचा आणि कौतुकाचा विषय बनलेला हा माणूस !

वालेसाच्या शेजारी त्याची पत्नी दानुता झोपली होती; पण तिची झोप मात्र अस्वस्थ होती. ती सारखी चाळवाचाळव करत होती, या कुशीवरून त्या कुशीवर होत होती. कुणालाही वाटलं असतं, पोटात वाढणाऱ्या सात महिन्यांच्या गर्भाच्या ओझ्यामुळंच तिला शांत झोप लागत नसावी; पण ही तिची का पहिली वेळ होती ? तिला सातव्यांदा दिवस गेले होते. सहा मुलांना जन्म देऊन ती आता सातव्यांदा माता बनण्याच्या मार्गावर होती. तिला गरोदरपणाचं काय कौतुक ? त्याची तर आता तिला सवयच झाली होती. तिच्या अस्वस्थपणाचं कारण निराळंच होतं. शेजारी शांतपणे झोपी गेलेल्या आपल्या नवऱ्याच्या भवितव्यात काय वाढून ठेवलंय हा विचार रात्रंदिवस तिचा पाठपुरावा करत होता. दररोज रात्री झोपताना ती परमेश्वराची प्रार्थना करायची, ' परमेश्वरा, माझ्या पतीला सुखी ठेव. शत्रूपासून त्याचं संरक्षण कर ! ' पण शत्रू इतका बलाढ्य होता, इतका सर्वसमर्थ होता की, मनात आणलं तर त्यानं केव्हाच वालेसाची वाट लावून टाकली असती; पण वालेसाचं सामर्थ्यही असंच अफाट होतं, तुल्यबल होतं. ना त्याच्याजवळ सैनिक होते, ना रणगाडे ! तरीही लोकप्रियतेचं विलक्षण वलय त्याला अदृश्य असं संरक्षण देत होतं. त्याला हात लावणं म्हणजे साऱ्या देशाचाच काय परंतु साऱ्या जगाचा रोष आपण ओढवून घेणं आहे याची रास्त जाणीव पोलंडच्या सरकारला होती.

तरीदेखील ते धाडस करून पाहण्याचं सरकारनं ठरवलं असावं. त्याशिवाय त्यांना पर्याय तरी काय होता म्हणा ! सॉलिडॅरिटीनं सरकारला इतकं मागं रेटलं होतं की, सरकारच्या पाठीला सोव्हिएट संगिनी टोचू लागल्या होत्या. मागं वाघ आणि अन् पुढं सिंह अशी सरकारची अवस्था झाली होती, म्हणूनच नाइलाजानं तो निर्णय घेण्यात आला ..

पहाटेचे तीन वाजले होते. गडॅन्स्कच्या निर्मनुष्य रस्त्यावर जिकडे तिकडे सैनिकांची वर्दळ सुरू झाली. लष्करी वाहनांचा खडखडाट सुरू झाला आणि वालेसाच्या दारावर थाप पडली ! अर्धवट झोपेत असलेल्या दानुताला चटकन् जाग आली. तिला वाटलं आपण स्वप्नातच हा आवाज ऐकला असावा; पण परत एकदा दारावर थाप पडली अन् फ्लॅटमधली घंटा कर्णकर्कशपणे किंचाळली. तिच्या छातीत धस्स झालं ! तिनं चटकन् शेजारचं बटण दाबलं. खोली प्रकाशानं उजळून निघाली. वालेसा अजूनही गाढ झोपेत होता. मध्यंतरी येऊन गेलेल्या सौम्य हृद्रोगाच्या झटक्यामुळं तो झोपण्यापूर्वी काही गोळ्या घेत असे. मुळातच त्याला शांत झोप लागायची, त्यात या गोळ्या घेतल्यामुळं त्याची झोप आणखीनच गाढ व्हायची. त्याच्या शांत चेहऱ्याकडं पाहून त्याला जागं करण्याचं तिला धाडसच होईना. बाहेर कोण आलं असणार याची थोडीशी कल्पना तिला आली होती. तिची भीती खोटी ठरावी अशी तिची मनोमन इच्छा होती. ' देवा, दाराशी मित्र असू देत ! ' असं मनाशी म्हणत बिछान्यावरून उठून तिनं अंगावर नाइटगाउन चढवला. दार उघडावं की नको या

**लेक वालेसा — सॉलिडॅरिटी या दोन शब्दांनी पोलंडमध्ये खळबळ उडवून दिली. लोकांना आपल्याबरोबर बांधून ठेवण्याचं कोणतं सामर्थ्य त्याच्यात आहे ? एक-एक लाखाच्या जमावाला तो कोणत्या शक्तीनं भारावून टाकतो ? एका बाजूने रशियन रणगाडे झेपावत असताना कोणत्या जीवनमूल्यांना आवाहन करून त्यानं पोलिश जनतेचा लढा उभा केला ? या अंकापासून खास वाचावी अशी प्रदीर्घ लेखमाला**

**लेखांक पहिला : लेखक : श्रीकांत मुंदरगी**

विचारात असतानाच परत बेल वाजली अन् पाठोपाठ दारावर थापा पडू लागल्या.

दानुतानं चटकन पुढं होऊन नवऱ्याला हळुवारपणे हलवून जागं केलं. त्यान डोळे उघडले. दिव्याचा प्रखर प्रकाश पाहून त्याला वाटलं, उजाडून खूप वेळ झालाय; पण डोळे तर विलक्षण चुरचुरत होते. प्रयत्न करूनही त्याला डोळे उघडे ठेवणं जमेना. त्याला कळेना असं का होतय !

त्यानं बायकोला विचारलं, 'वाजलेत तरी किती ? माझी झोप कशी पुरी झाली नाही ?'

'पहाटेचे तीन वाजून गेलेत.' दानुता उत्तरली.

'मग एवढ्या अवेळी मला कशाला उठवलंस ? तुला काही त्रास होतोयं का ?' थोडंसं त्रासिकपणे पण काळजीच्या सुरात त्यानं विचारलं.

ती काही तरी बोलायला तोंड उघडणार तोच परत एकदा बेल वाजली अन् पाठोपाठ दार वाजलं.. ते ऐकताच वालेसाला काय प्रकार आहे हे लक्षात आलं. त्यान अंगावरची चादर फेकली अन् तो उठून उभा राहिला.

वालेसाच्या अंगावर चड्डीशिवाय दुसरा कपडा नव्हता. त्यानं कपाटातले कपडे काढले अन् शांतपणे अंगावर चढविण्यास सुरुवात केली. त्यानं चक्क सूट चढविलेला पाहून दानुता चकित होऊन त्याच्याकडं पाहू लागली. कसल्या तरी विचित्र शकेनं तिच्या मनात घर केलं अन् ती विचारती झाली, 'नाइटगाउन चढविला असता तर चाललं नसतं का ?'

'मला तसं वाटत नाही; पण घाबरू नकोस वेडे ! तसं काही भयंकर घडणार नाही !' तिला धीर देण्याच्या उद्देशानं वालेसा म्हणाला.

'तुमचे कोणी मित्रदेखील असू शकतील बाहेर. त्यांच्यापैकी कोणी तरी अडचणीत असेल किंवा कोणी आजारी असेल. अचानक तुमची मदतीची गरज भासली असेल त्यांना म्हणून आले असतील इतक्या अवेळी.' दानुता जणू स्वतःचं समाधान करू पहात होती.

### मला काही म्हणायचं नाही

वालेसा तिच्याकडं पाहून हसला. तो वळला अन् तिच्या खांद्यावर हात ठेवून हळुवार आवाजात म्हणाला, 'कशाला स्वत.ची फसवणूक करतेस ? तुला ठाऊक आहे बाहेर कोण आल असेल ते. गेल्या वर्षभरात एक तरी मित्र आलाय का आपल्याकडं अशा अवेळी ? अडचणीत असलेले कामगार तर रात्री-बेरात्री यायचे केव्हाच बंद झालेत. माणूस फार मोठा झाला की, त्याचे आप्तेष्ट, त्याचे मित्र, हितचिंतक सारेजण अतर ठेवून वागायला लागतात. मोठेपणाला माणस इतकी का बिचकतात हेच कळत नाही मला. दोन वर्षांपूर्वी आलेला तो सुश्लित्साव आठवतो का तुला ? त्याच्या वडिलाना हार्ट-ॲटॅक आला म्हणून सरकारी हार्ट इन्स्टिटयूटमध्ये त्याना दाखल करायचं होतं; पण माझ्या चिठ्ठीविना हे काम होण्याजोगं नव्हतं, म्हणून आला होता तो. त्यानतर मात्र कुणीही अशा वेळी आल्याच आठवत नाही मला !'

'उगाच तुमच आपल काही तरी...मित्र नसेल, अडचणीत सापडलेला कामगार नसेल. सॉलिडॅरिटीचे कुणी कार्यकर्ते आले असतील. महत्त्वाचा एखादा निर्णय तातडीन घ्यायचा असेल त्याना !' दानुता कापऱ्या आवाजात बोलत असतानाच परत एकदा बेल वाजली.

वालेसानं तिला चटकन् खिडकीकडं नेलं अन् पडदा बाजूला सारत तो म्हणाला, 'वाईट गोष्टी कधी खोट्या ठरत नाहीत !'

रस्त्यावर तीन-चार लष्करी जीप्स अन् एक मोठा ट्रक उभा होता. त्यांच्या इमारतीसमोर अनेक सैनिक उभे असलेले पाहून दानुताचे डोळे भरून आले. कधी तरी हे घडणारच होतं हे ती जाणून होती; पण प्रत्यक्ष ती वेळ येताच तिच्या हातापायातलं बळ गेलं!

वालेसानं दार उघडलं. समोर लष्करी गणवेषातले तीन-चार अधिकारी उभे होते. त्यातील एकजण म्हणाला, 'तुम्हाला लागलीच आमच्याबरोबर यावं लागेल. सरकारी हुकुमानुसार तुम्हाला कैद करण्यात येत आहे. तुमच काही म्हणणं असल्यास ते वरिष्ठासमोर मांडावं लागेल !' गंभीर चेहऱ्यानं बोलणाऱ्या त्या अधिकाऱ्याला



**वालेसा, दानुता आणि त्यांची सहा मुलं !**

थांबवत वालेसा म्हणाला, 'पण मला काही म्हणायचंच नाहीय !' अन् तो मिस्किलपणे हसून म्हणाला, 'बायको-मुलांचा निरोप घ्यायला अन् परमेश्वराची प्रार्थना करायला मला दोन मिनिटांचा अवधी द्याल ना ?'

ते अधिकारी एकमेकांकडं गोंधळून पाहू लागले. त्याला काय उत्तर द्यावं हेच त्यांना समजेना. काही क्षण विचार करून त्यातला एकजण म्हणाला, 'वास्तविक यासाठी आम्हाला वरिष्ठांशी सल्लामसलत करावी लागेल...' त्याला थांबवत दुसरा म्हणाला,

'पण त्यात दहा मिनिटं जातील. त्यापेक्षा वालेसांना आपण दोन मिनिटांची सवलत देऊ.'

'तुम्ही सारे आत येऊन बसा ना. आलोच मी !' असं म्हणून वालेसा आत गेला. त्याच्या स्टडीरूममधल्या जीझसच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन त्यानं प्रार्थना केली. त्यानंतर तो मुलांच्या बेडरूममध्ये गेला. त्याची मुलं गाढ झोपेत होती. त्यानं नाइटलॅम्पच्या अंधुक प्रकाशात मुलांच्याकडं निरखून पाहिलं. कदाचित आपण घरी कधीच परतू शकणार नाही असं त्याच्या मनात आलं म्हणून त्यानं डोळेभरून पाहण्यासाठी दिव्याच्या बटणाकडं हात नेला. त्याच वेळी मोठ्या दिव्याच्या प्रकाशानं खोली उजळल्याचं त्याच्या लक्षात आलं. दानुता खोलीत केव्हा आली हे त्याच्या लक्षातच आलं नाही. तिनंच दिवा लावला होता. त्यानं जवळ जाऊन साऱ्या बाळांना न्याहाळून घेतलं अन् तो दानुताकडं वळला. त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्याचं तिच्या लक्षात आलं. त्यानं पसरलेल्या बाहूत दानुता शिरली अन् त्याच्या छातीवर मस्तक ठेवून मुसमुसू लागली. तिच्या पाठीवर थोपटत तो तिला धीर देऊ लागला, 'सारं काही ठीक होईल. काळजी करू नकोस! अंतिम विजय आपलाच आहे. मुलांना सांभाळ! ...' तिचं ओझरतं चुंबन घेऊन तो गर्रकन वळला अन् म्हणाला, 'शेनसिबोझे' ( God Bless You. ).....

दानुता खिडकीतून पहात होती...त्या जीप्स लेकला घेऊन धुक्याच्या पडद्यात नाहीशा झाल्या अन् आतापर्यंत अडवून ठेवलेला संयम तिच्या डोळ्यांतून ओसंडून वाहू लागला.

## मार्शल लॉ जारी

सकाळचे सहा वाजले होते. मायकोत्सावानं रेडिओचं बटण फिरवलं अन् रेडिओ सुरू केला. रेडिओतून आलेले शब्द ऐकताच ती दचकली अन् कान देऊन ऐकू लागली, 'एक साधा सैनिक आणि पोलिश सरकारचा प्रमुख म्हणून मी बोलतो आहे. देशात निर्माण झालेल्या अस्थिर राजकीय परिस्थितीमुळं देशावर लष्करी कायदा लागू करण्यावाचून मला गत्यंतर राहिलेलं नाही. देशाचं भवितव्य धोक्यात आलंय म्हणून नाइलाजानं मला आणि माझ्या सरकारला हा कटू निर्णय घ्यावा लागत आहे! ...' पुढचे शब्द ऐकायला मायकोत्सावा तिथं थांबलीच नाही. धावत धावत ती बेडरूममध्ये गेली अन् घोरत पडलेल्या नवऱ्याला गदागदा हलवून तिनं जागं केलं.

'उठा, उठा ! असे झोपताय काय ? सरकारनं मार्शल लॉ जारी केलाय !' खडबडून जाग्या झालेल्या ॲन्थेव्हला ती कापऱ्या आवाजात सांगू लागली.

'कुणी सांगितलं तुला ?' बिछान्यावर उठून बसत ॲन्थेव्हनं तिला शांतपणे विचारलं.

'मी आत्ताच रेडिओवर ऐकलं. यारुझेस्की स्वतःच बोलत होते.'

'ठीक आहे. त्यामुळं आपल्यासारख्या सामान्य नागरिकाच्या परिस्थितीत असा काय फारसा फरक पडणाराय ? गेली चार वर्षं कलर टेलिव्हिजन घेण्यासाठी पैसे जमवतोय आपण. मार्शल लॉ आला म्हणून आपल्याला थोडाच तो कमी किंमतीत मिळणाराय ?' ॲन्थेव्हनं त्रयस्थ सुरात बायकोला प्रश्न केला.

'अहो, तेच तर म्हणतेय मी. मार्शल लॉ आला म्हणजे किंमती कमी कशाला होतायत ! मला तर बाई वाटतं उलट त्या वाढतीलच. म्हणजे या वर्षी तर ख्रिसमसमध्ये घरी टी. व्ही. येईल असं मला काही वाटत नाही !' ती वैतागून बोलली.

'टी. व्ही. नसला तरी चालेल एक वेळ; पण पाव आणि धान्यासाठी रांगा लावायला नकोत बघ मार्शल लॉमुळं या रांगा लहान झाल्या, मटण स्वस्तात मिळू लागलं तर मी त्याचं स्वागत करेन !' ॲन्थेव्ह तिला समजावू लागला, 'या सॉलिडॅरिटीनं तर देशात गोंधळ माजवून टाकलाय नुसता. कशाला हवेत हे संप, हे दंगे-धोपे, हे मोर्चे अन् ही निदर्शनं ?'

'म्हणजे सरकारी लोकांनी स्वतःची पोटं फुटेपर्यंत भरावीत अन् जनतेला मात्र उपास काढायला लावावा हे तुम्हाला मान्य आहे तर ?'

'प्रश्न त्याचा नाही. मोर्चे आणि संपामुळं अन्नधान्याचे प्रश्न सुटणार का आहेत ? उलट या सॉलिडॅरिटीच्या पुढाऱ्यांचं प्रस्थ उगाचच वाढत चाललंय. त्या लेक वालेसानं तर सगळ्यांना खुळं करून सोडलंय !'

'लोकांना खुळं करायची लेक वालेसाला काय गरज पडलीय ? उलट तो त्यांना शहाणं करायचाच प्रयत्न करतोय.' मायकोत्सावा जोरदार शब्दात लेकची बाजू मांडू लागली.

'भ्रम आहे तुझा हा ! लोक शहाणे होताहेत का खुळे याची त्याला फिकीर नाही. त्याला फिकीर आहे आपल्या मोठेपणाची, त्याला काळजी आहे आपल्या कुटुंब–कबिल्याची. सॉलिडॅरिटीचं नेतृत्व मिळाल्यापासून अगदी गब्बर झालाय तो !' ॲन्थेव्हनंही भांडणाचा पवित्रा घेतला. बिछान्यावरून उठून तो बेसीनच्या आरशासमोर

जाऊन उभा राहिला. समोरच्या हॅंगरवरचा टॉवेल कमरेला गुंडाळत तो आरशात पाहू लागला. आरशात त्याला त्याच्या बायकोचं प्रतिबिंब दिसलं. कॉफी करायची सोडून ती त्याच्याकडंच रोखून पहात उभी होती.

'काय हो, गब्बर झालाय म्हणजे काय झालाय ? घरावर काय सोन्याची कौलं घातलीयत त्यानं ? का बायकोच्या गळ्यात हिऱ्यांचा हार घातलाय ?' कमरेवर हात ठेवून पुढं येत तिनं विचारलं.

'घरावर सोन्याची कौलं चढवली म्हणजेच कोणी श्रीमंत झालाय असं समजायचं काय ? श्रीमंत झालं म्हणजे गळ्यात हिऱ्याचे हार घालून फिरावं लागत थोडंच !' ब्रशवर टूथपेस्ट लावत तो आरशातून तिच्याकडं पहात बोलू लागला, 'चाळीतल्या दोन खोल्यात रहात होता तो. पुढारीपणाची माळ गळ्यात पडल्यावर पाच खोल्याचा प्रशस्त फ्लॅट मिळालाय त्याला अन् तोही अगदी बड्या लोकाच्या वस्तीत ! पूर्वी एकुलता एक सूट होता त्याच्याजवळ. आज पहावं तर दररोज वेगळा सूट असतो अंगावर !'

'म्हणजे या गोष्टीचा मत्सर वाटतो तर तुम्हाला !'

'मला कशाला मत्सर वाटेल ? मी काय फडतूस इलेक्ट्रिशियन आहे त्याच्यासारखा ? माझ्यासारख्या इंजिनियरला असल्या गोष्टीची क्षिती वाटायचं काय कारण ?'

'इतकी वर्षं आपण प्रयत्न करतोय; पण साधा कलर टेलिव्हिजन घेणंदेखील जमलं नाही आपल्याला. त्याच्याकडं एक सोडून दोन-दोन टी. व्ही. आहेत म्हणून हेवा वाटतोय तुम्हाला !'

'मूर्ख आहेस अगदी. त्याच्याकडं टी. व्ही. च काय; पण अख्खं टी. व्ही. स्टेशन जरी असलं तरी मला वाईट वाटायचं काय कारण आहे ? मला खेद होतो तो एकाच गोष्टीचा. त्याच्या वेडगळ कल्पनामुळं आपला देश फुकटाफाकट रशियाच्या घशात जाईल. म्हणूनच म्हणतो मी की त्याला देशाच्या भल्याची चिंता नाही. त्याला कदर आहे ती फक्त स्वतःच्या भल्याची. आपण, आपली बायको अन् ती प्रचंड पिल्लावळ, एवढी सुखात असली म्हणजे झालं! मग बाकीच्याच काही का होईना !'

'उगाच काही तरी बोलू नका. तो बिचारा देशाच्या भल्यासाठी झटतोय, इतका त्याग करतोय त्याचं तुम्हाला काहीच नाही. त्याला मिळालेली सुखं तेवढी तुम्हाला दिसतायत. त्याचा फ्लॅट अन् त्याचे सूट तुमच्या डोळ्यात खुपतायत, दुसरं काय ?'

त्याच्या फ्लॅट अन् सुटाशी मला काय करायचंय ? त्याला राजवाडा जरी मिळाला तरी मला त्याचं काही वाटायचं नाही. मला संताप येतो तो एवढ्याच गोष्टीचा, इथं आहे त्या लोकांना खायला मिळेना अन् हा मात्र लोकसंख्या भरमसाठ वाढवतोय ! मुळात अर्धा डझन पोरं आहेतच आणि आता त्यात सातव्याची भर पडणार आहे !' ॲन्थेव्ह उद्वेगानं बोलत होता. मायकोत्सावानं त्याला मध्येच थाबवलं अन् ती म्हणाली, 'म्हणजे तुमचा सारा राग आहे तो त्याच्या पोरांवर. लोकांना मागूनसुद्धा पोरं मिळत नाहीत. त्याला होतायत तर होईनात का बिचारी !' तिनं त्याच्या वर्मावर अचूक बोट ठेवलं.

बारा वर्षं उलटून गेली त्याच्या लग्नाला तरी त्याना मूलबाळ काहीच नव्हतं. म्हणावं तर तसा काही दोषही नव्हता दोघांच्यात. अनेक डॉक्टरी उपाय करून झाले होते तरी त्याचा काहीच उपयोग झाला नव्हता. त्यामुळंच ती जे बोलली ते याला फार झोबलं. त्यानं हातातला टूथब्रश बेसीनवर ठेवला अन् गर्रकन् वळून फाडकन् तिच्या थोबाडीत मारली

'महामूर्ख आहेस तू. तो लेक वालेसा, अन् त्याची पोरं गेली खड्डयात ! त्याच्यावरून तुला माझ्याशी भांडायचं कारणच काय ?' आपण संतापाच्या भरात तिला थोबाडीत मारली याचं वाईट वाटून तो म्हणाला. इतक्या वर्षांत त्याचं अनेकवार भांडण झालं होतं; पण इतकं विकोपाला जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

'जाऊ दे मला माफ कर. रागाच्या भरात घडून गेली ही गोष्ट !' ॲन्थेव्ह दिलगिरीच्या स्वरात म्हणाला.

'माझही चुकलंच. नको त्या गोष्टीकडं चर्चेचा ओघ वळला.' तीही क्षमायाचनेच्या सुरात म्हणाली, 'देशात मार्शल लॉ जारी झालाय अन् इकडं आपल्या घरात वादळ उठलं !' यावर दोघही हसली अन् कॉफीच्या तयारीला लागली.

¤

जनरल वायझॅक् यारुझेल्स्की मायक्रोफोनसमोर उभे होते. तो मायक्रोफोन नेहमीचा साधासुधा मायक्रोफोन नव्हता. जनरलसाहेबाना म्हणूनच विलक्षण अस्वस्थता वाटत होती. एरवी शेकडोच नव्हे तर हजारो वेळा ते मायक्रोफोनसमोर उभे राहिले असतील. लष्करी जवानासमोर त्यांनी कित्येक वेळा भाषणं केली होती. अनेक सत्कार अन् समारोपाच्या समारंभात त्याना बोलावं लागलं होतं. राज्यसत्ता हाती आल्यानंतर काही नागरी मेळाव्यासमोरही ते बोलले होते; पण आजचा प्रसंगच वेगळा होता ! समोरच्या मायक्रोफोनवर होता वार्सा रेडिओस्टेशनचा मायक्रोफोन. त्या मायक्रोफोनवर जनरलसाहेब जे काही बोलणार होते ते वार्सातल्याच नागरिकांना नव्हे तर साऱ्या पोलंडवासियाना ऐकायला मिळणार होतं. एवढंच नव्हे तर चोवीस तास बारा महिने कान टवकारून बसलेल्या 'बी. बी. सी.' आणि 'व्हॉइस ऑफ अमेरिकेलाही' हे भाषण ऐकू येणार होतं अन् त्यांच्यामुळं साऱ्या जगाला समजणार होतं.

नव्यानं बांधलेल्या एखाद्या धरणाचं पाणी खाली पात्रात सोडण्याच्या निमित्तानं वा एखाद्या ट्रॅक्टरकारखान्यातील दशलक्षावा ट्रॅक्टर विक्रीसाठी बाहेर काढण्याच्या समारंभात काही तरी गोडधोड बोलणं जनरलसाहेबांना निश्चित आवडलं असतं कारण त्यामुळं जनमानसातील त्याची प्रतिमा आणखीनच उजळली असती; पण आज त्याना जे भाषण करावं लागणार होतं त्यानं त्याची प्रतिमा पूर्ण काळवंडून जाणार होती. मनातून नको असतानाही त्याना ते बोलावच लागणार होतं. ते कटु शब्द आपल्या देशबांधवाना ऐकवण्यासाठी सारा धीर त्यांना एकवटावा लागला होता.

त्यानी समोर भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडं पाहिलं. अजूनही एक मिनिटाचा अवधी होता. त्यांच्या मनात विचार आला, 'आपण

**तें जे बोलणार होते, त्यानं त्यांची प्रतिमा पूर्ण काळवंडून जाणार होती !**



वालेसा–दुसऱ्या महायुद्धातील हुतात्मा पोलिश सैनिकांच्या स्मारकाला अभिवादन करताना

¤

इथून नाहीसंच झालो तर बरं होईल !' पळून जाण्याचा तर प्रश्नच नव्हता. खोलीच्या बाहेर शेकडो सैनिक सशस्त्र उभे होते. त्यांच्या मंत्रिमंडळातले अनेक सहकारी उत्कंठेनं बाहेर थांबले होते. या साऱ्यांच्या समोरून पळून जाणं एक वेळ शक्य होतं. तशीच वेळ आली असती तर कमरेचं पिस्तूल स्वतःच्या मस्तकावर झाडून घेता आलं असतं. त्यांच्या देशबांधवांनी त्यांच्या 'भ्याडपणाला' देशप्रेमाचं सर्वांत मोठं कृत्य मानून उदार हृदयानं त्यांना क्षमा केली असती; पण बाहेरच्या समुदायात आणखीही काही लोक होते. त्यांना मात्र हा भ्याडपणा मानवण्याजोगा नव्हता. ते लोक होते सोव्हिएट युनियनचे पोलंडला पाठविण्यात आलेले खास सल्लागार. जनरल यारूझेल्स्कींनी आपल्या कर्तव्यात थोडीही कसूर केली असं दिसून आलं तर तत्क्षणीच त्यांना बडतर्फ करण्यात आलं असतं. त्यांची रवानगी 'खास पाहुणे' म्हणून रशियातल्या सैबेरिया प्रांतात करण्यात आली असती. जन्मभर त्यांना रशियात राजकीय कैदी म्हणून खितपत पडावं लागलं असतं. जनरलना हे सारं एक वेळ चाललं असतं; पण रशियन रणगाड्यांनी पोलिशसरहद्दी ओलांडून साऱ्या देशाला बंदीवान करावं हे मात्र त्यांना मान्य होण्याजोगं नव्हतं. कारण काही झालं तरी ते एक ज्वलंत देशभक्त होते. मातृभूमीवर त्यांचं नितांत प्रेम होतं, अपार निष्ठा होती. म्हणूनच आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांनी खूण करताच त्यांनी बोलायला सुरुवात केली,

'एक निष्ठावंत सैनिक आणि पोलंड सरकारचा प्रमुख या नात्यानं मी साऱ्या राष्ट्राला हे जाहीर करू इच्छितो की, या क्षणापासून पोलंडवर मार्शल लॉ– लष्करी कायदा जारी करण्यात आला आहे !' जनरलसाहेबांचा आवाज संथ असला तरी शांत वाटत नव्हता. त्यांच्या मनात चाललेली खळबळ जरी त्यांच्या आवाजात प्रतीत होत नव्हती तरी त्यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांना तिची चाहूल लागत होती.

## भीतीचं साम्राज्य

सॉलिडॅरिटीनं आमच्या सौजन्याचा नको इतका फायदा उठवला. त्यांना जास्तीत जास्त सवलती देण्यात आम्ही बिलकुल कंजूषपणा दाखविला नाही; पण त्यामुळंच त्यांचा आमच्याविषयी गैरसमज झाला असावा. समजूतदारपणा अन् सौजन्य ही त्यांच्या दृष्टीनं दुबळेपणाची लक्षणं ठरली. त्यांच्या मागण्यांनी आक्रमकता धारण केली रबर तुटेपर्यंत ताणू नये हे त्यांच्या लक्षातच आलं नाही. देश आर्थिक संकटात सापडलेला असताना आमच्याशी सहकार्य करायचं सोडून सॉलिडॅरिटीनं आमच्याशी असहकार पुकारला. ते एवढ्यावरच थांबले असते तरी देशावर आजची पाळी आली नसती. त्यांनी सत्तेशी वैमनस्य पुकारलं अन् उघडउघड झगडा सुरू केला. देशात यादवी सुरू करून देशाला अस्थिरतेच्या कड्यावर नेऊन ठेवलं. म्हणून अत्यंत खेदानं अन् नाइलाजानं देशात लष्करी कायदा पुकारण्याचा दुःखद निर्णय आम्हाला घ्यावा लागला! ' असं सांगत असतानाच जनरलसाहेबांच्या डोळ्यांसमोर आठवड्यापूर्वी घडलेला तो प्रसंग क्षणभर तरळून गेला...

जनरल यारूझेल्स्की आपल्या ऑफिसात एकटेच बसले होते. त्यांच्या समोर निरनिराळ्या फायली पसरल्या होत्या. त्या चाळण्यासाठी त्यांचे खाजगी सचीव काही मिनिटांतच तेथे येणार होते. त्या अतिगुप्त फायलीतले महत्त्वाचे मुद्दे सचीव जनरलसाहेबांच्या कानांवर घालणार होते. त्यानंतर तासाभरात त्यांची भेट गेला महिनाभर राजधानीत मुक्काम ठोकून राहिलेल्या रशियाच्या खास दूताशी- मार्शल व्हिक्टर कुलीकाव्ह–यांच्याशी व्हायची होती. ही भेट अगदी अचानकच ठरविण्यात आली होती. वास्तविक अशा भेटी कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळीच होत असत; पण आज पहाटे त्यांना त्यांच्या सचिवानं या विशेष भेटीची कल्पना दिली. या भेटीसाठी जनरलसाहेबांच्या सोईसवडीचीही चौकशी करण्यात आली नव्हती. या तातडीच्या भेटीमागं क्रेमलिनचा काही विशेष हेतू असणार हे जनरलसाहेबांनी ओळखलं होतं. म्हणूनच त्यांनी इतर सर्व कार्यक्रम रद्द करून या महत्त्वाच्या 'मोस्ट कॉन्फिडेन्शियल' फायली मागविल्या होत्या. चिटणिसांच्या सहाय्यानं त्यांनी तासाभरात सर्व महत्त्वाची माहिती घेतली.

त्यानंतर काही मिनिटांतच मार्शल कुलीकाव्ह ऑफिसमध्ये आले. आल्याआल्याच त्यांनी जनरलसाहेबांच्या मदतनिसांना बाहेर जाण्यास सांगितलं. कसलेही उपचार न पाळता त्यांनी मुद्द्यालाच हात घातला,

'जनरल यारूझेल्स्की, आपल्या निर्णयाची क्रेमलिन उत्सुकतेनं प्रतीक्षा करतंय. आपल्याकडून उत्तर येण्यास विलंब लागतोय याची प्रेसीडियमला चिंता वाटून राहिली आहे.'

'मला विचार करायला, माझ्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत करायला आणखी थोडा अवधी हवा आहे.' जनरलसाहेब खालच्या आवाजात बोलले.

'क्रेमलिन यापुढं वाट पहायला मुळीच तयार नाही. परिस्थिती हाताबाहेर जात आहे. तुम्ही सात दिवसांच्या आत लष्करी कायदा देशात लागू केला नाही तर नाइलाजानं रशियाला निर्णायक हालचाल करावी लागेल. बराय, येतो मी !' असं धारदार आवाजात

सांगून जनरलसाहेबाना बोलण्याची संधीही न देता कुलिकान्ह ताडकन् उठून निघून गेले

' लष्करी कायदा बेमुदत काळासाठी लागू करण्यात आला नाही याची खात्री असू द्या ! ' पोलिश जनतेला बरं वाटावं म्हणून ते असं बोलत नव्हते, त्याची मनापासून तशी इच्छा होती. ते पुढं म्हणाले, ' सॉलिडॅरिटीनं सुरू केलेली सरकारविरोधी चळवळ ज्या वेळी योग्य मार्गावर येईल त्या वेळी लष्करी कायदा माग घेण्यात येईल ! '

जनरलसाहेबाचं हे आश्वासन त्यानी जरी मनापासून दिलं असलं तरी जनतेला ते मुळीच पटलं नाही. गेले कित्येक महिने चाललेला पोलिश जनतेचा लढा असा अकस्मात संपुष्टात आला होता. स्वातंत्र्य आणि स्वयंनिर्णयासाठी गेलं वर्षभर नेटानं चालविण्यात आलेली ही चळवळ लष्करी कायद्यानं क्षणार्धात बंद पाडली होती. लोकाच्या इच्छा–आकांक्षाना मूठमाती मिळाली होती. आता सुरू होणार होतं लष्कराच राज्य......आता सुरू होणार होतं भीतीचं साम्राज्य ! ......

## अदृश्य संगिनी

काही तासांनतर जनरलसाहेबानी हेच भाषण टेलिव्हिजनच्या कॅमेऱ्यासमोर केल. रेडिओवरून प्रसृत करण्यात आलेल भाषण हजारो पोलिश लोकानी ऐकलं होतं. कारण बहुसंख्य लोक त्या वेळी साखरझोपेत होते; पण ही बातमी आगीच्या वणव्यासारखी साऱ्या देशभर पसरली आणि सारी जनता खडबडून जागी झाली. घराघरातून रेडिओ वा टेलिव्हिजन सुरू करण्यात आले होते. टेलिव्हिजनवर काय दिसणार आहे या भीतियुक्त उत्कंठेन सारेजण पडद्याकडं नजर लावून बसले होते .....

संपूर्ण लष्करी गणवेषात डोळ्यावर काळा चष्मा चढविलेले जनरल यारूझेल्स्की रुबाबदारपणे उभे होते. गेली कित्येक वर्षं ते काळा चष्मा वापरत होते; पण आज त्याना त्याचा खरा उपयोग झाला होता त्याच्या डोळ्यातून बाहेर पडू पाहणारा भावनोद्रेक त्या चष्म्यामुळंच लपवण त्यांना शक्य झालं होतं. जनतेच्या डोळ्याला डोळा देणं आज तरी त्याना शक्य नव्हतं. राज्यशकट हाती घेताना त्यानी स्पष्ट आश्वासन दिलं होतं, ' माझ्या लोकांवर गोळ्या झाडायला मला कुणीही सागू नये परमेश्वरानं जरी आज्ञा दिली तरी माझे सैनिक माझ्या लोकावर चालून जाणार नाहीत! ' हे वचन आज त्यांना मोडाव लागत होत. परमेश्वराची आज्ञा मोडणं एक वेळ सोपं; पण सोव्हिएट सत्ताधीशाची आज्ञा मोडण म्हणजे स्वतःचं मरण आपणहून ओढवून घेतल्यासारख आहे हे ते जाणून होते.

जनरलसाहेबांच्या ताठ दिसणाऱ्या मूर्तीमागं पोलडचं मानचिन्ह असणारा पांढराशुभ्र गरुड लावण्यात आला होता. त्या चित्रात जीव असता तर त्या गरुडाची मानदेखील खाली झुकली असती. अन्याय आणि जुलुमजबरदस्ती याविरुद्ध शतकाहून अधिक काळ सातत्यानं लढा देणाऱ्या पोलिश जनतेचं ते प्रतीक होतं; पण या गरुडाचे पंखच कापण्यात येत आहेत असं साऱ्याना वाटत होतं.

पोलडचे सर्वसत्ताधीश म्हणून जनरल यारूझेल्स्की उभे असले तरी जनतेच्या दृष्टीनं ते आज खलनायक रले होते. पोलडच्या राजकीय रंगपटावर यापुढं आपल्याला खलनायकाचीच भूमिका वठवावी लागणार आहे याची त्यानाही रास्त जाणीव असावी. नायकाचा मान मात्र एका वेगळ्याच व्यक्तीकड गेला होता. त्या व्यक्तीला ना सत्तेचं पाठबळ होतं ना पैशाच. त्याच्याकडं ना रणगाडे होते ना विमानं. त्याच्याकडं होती एकच गोष्ट......पोलिश जनतेचं उदंड प्रेम ! या एका गोष्टीमुळंच तो जनमानसाचा सर्वसत्ताधीश बनला होता......लोकनायक बनला होता.

म्हणूनच जनरल यारूझेल्स्कीनी मंत्रिमंडळापुढं लष्करी कायदा लागू करण्याचा ठराव माडला अन् तो मंजूर होताच त्यानी पहिला हुकूम सोडला तो लेक वालेसाच्या अटकेचा ! कारण या लोकनायकाला गजाआड घातल्याशिवाय लष्करी कायदादेखील यशस्वी होऊ शकला नसता या एका माणसाच्या शब्दावर एक कोटी कामगार लष्करी सत्तेविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले असते. एवढंच काय, पण सारी पोलिश जनता त्याच्या एका शब्दासाठी आपले जीव कुर्बान करण्यास तयार झाली असती. म्हणूनच त्याचा बुलंद आवाज बंद करण्यावाचून जनरलसाहेबांना दुसरा पर्यायच राहिला नव्हता.

लष्करी कायदा ही पोलंडमध्ये गेलं वर्षभर घडत असलेल्या घटनाची अपरिहार्य परिणती होती. लष्करी कायद्याशिवाय या देशाला दुसरा तरणोपाय नाही हे जनरल यारूझेल्स्की जाणून होते, तसच लेक वालेसाही जाणून होता जगातील अनेक विचारवंतसुद्धा हे मान्य करीत होते. सॉलिडॅरिटीनं यारूझेल्स्की सरकारला रेटत-रेटत मागं नेऊन भिंतीला टेकवलं होतं. त्या भिंतीमागं उभ्या असलेल्या अदृश्य रशियन संगिनी सरकारच्या पाठीला टोचत होत्या. मागं दरी अन् पुढं कडा अशी त्याची अवस्था झाली होती. कडा चढायला अतिशय अवघड असला तरी अशक्य नव्हता. दरीत पडणं म्हणजे मात्र देशाला पारतंत्र्याच्या खाईत लोटण्यासारखं होतं. (क्रमशः)


**NEW TITLES RECEIVED**

१. झफरी–लेखिका : बापट ललिता ( कादंबरी)
२. वैदिक गणित–भाग पहिला ( गुणाकार )
ब. गं. बापट / दिलीप कुलकर्णी
३. गगनभेदी– ( नाटक ) : लेखक–वसन्त कानेटकर
४. साप्ताहिकी–( विनोदी कथा ) : लेखक–रमेश मंत्री
५. अवती–भवती–(लेखसंग्रह) : लेखिका–विजया राजाध्यक्ष
1. **The Totem : Morrell David–( Thriller )**
2. **O. R.** : Evans Barrie ( medical non-fiction )
3. **My Life : Fonda, Henry–**
( Bestseller, autobiography )
4. **Psycho II** : Block Robert–Sequel
5. **The year of the Grey–Lag Goose–**
( Ethology )–Lorenz Konrad

**The Phoenix Library**
727, opp. Sadashiv Post, Pune–30.

## पुस्तके

# 'जडवाद' क्रांतीचे तत्त्वज्ञान

**ग्रंथवर्णन :** बंगालच्या फाळणीमुळे पेटून उठून वयाच्या बाराव्या वर्षी क्रांतिकारी राजकारणात उडी घेणारे नरेंद्रनाथ भट्टाचार्य (६–२–१८९३ ते २५–१–१९६२) पुढे नवमानवतावादी मानवेंद्रनाथ रॉय म्हणून प्रसिद्ध झाले. मानवी इतिहासाचा अभ्यास करून त्यांनी तीस–पस्तीस विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले. ' Materialism–An outline of history of scientific thought या ग्रंथाच्या १९५१ साली प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या आवृत्तीचा मराठी अनुवाद–जडवाद.

**आशय :** आजच्या बौद्धिक अराजकतेत मानवाला स्वतःवरची श्रद्धा पुनः मिळवून देण्याचे सामर्थ्य संस्कृतीच्या उषःकालापासून विकसित होत आलेल्या जडवादात आहे. आदिमानवाने अज्ञानामुळे निसर्गशक्तींना देवत्व बहाल केले; पण या निसर्गधर्मात सर्वच घटनांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. तेव्हा मानव निसर्गघटनांची कारणे निसर्गातच शोधू लागला. ' मानवजातीच्या सर्वांत प्रगत अशा गटाने निसर्गघटनांच्या भीतीतून स्वतःची मुक्तता करून घेतली. निसर्गाचे धीटपणाने निरीक्षण करण्याचे धाडस केले. निसर्गावरचा गूढतेचा बुरखा त्याने फाडून टाकला आणि पौराणिक देवांना बाजूला सारले. त्याला निसर्गघटनांची कारणे समजून घ्यावयाची होती आणि त्याने ती खुद्द निसर्गातच शोधण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे तत्त्वज्ञानाचा जन्म झाला. (पृ. ७१) तत्त्वज्ञान म्हणजेच जडवाद. अस्तित्वात असलेल्या सर्वांचा उगम जडद्रव्यात असतो. जुन्या भ्रामक समजुती बाजूला सारून दृश्यघटनांचा उगम खुद्द निसर्गातच शोधण्याचा प्रारंभ थेल्स या ग्रीक तत्त्वज्ञाने केला. पुढे डिमॉक्रिटसने अणुसिद्धांताच्या आधाराने जडवादाला व्यापक पद्धतीचे रूप दिले. अनेक शतकांनंतर एपिक्युरसने तिचा बराच विस्तार केला.

निसर्गधर्माचे संरक्षक आणि असहाय मानव व सामर्थ्यशाली देव यांच्यामधील मध्यस्थ म्हणून वावरणाऱ्या पुरोहितवर्गाने जडवादाला सर्वत्र विरोध केला; पण आर्थिक आणि सामाजिक कारणांमुळे ग्रीक तत्त्वज्ञान तगून राहिले. कल्पनांना वस्तुनिष्ठता आणि वस्तूंना केवळ छायेचे अस्तित्व देऊन प्लेटोने चित्वादाचा पाया घातला. त्याचाच शिष्य ॲरिस्टॉटलने कल्पनांचे वस्तुनिष्ठ अस्तित्व नाकारून चित्वादाचा मूळ पायाच उखडून काढला. सामाजिक आणि राजकीय कारणांमुळे संशयवाद, सोफीवाद, नीतिशास्त्र आणि सत्ताशास्त्र यांच्यात प्रदीर्घ संघर्ष झाला. ग्रीकराज्याच्या अवनतीनंतर रोम आणि ख्रिस्ती चर्च ही तत्त्वज्ञानाची संघर्षस्थाने बनली.

वैदिक निसर्गधर्माच्या असमाधानकारकतेतून भारतात जडवादी चिंतन उदयाला आले. वेदकालापासून बौद्धधर्माचा ऱ्हास होईपर्यंत एक हजार वर्षे जडवादाचा विचारप्रवाह प्राचीन भारतात वाहात होता; पण तो उपलब्ध नाही. सनातनी विरोधकांच्या ग्रंथांतून जडवादी विचारप्रवाहाचा सर्वसाधारण भावार्थ अनुमानता येतो. कणाद, कपिल, बृहस्पती, वैशेषिक, बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञांनी वैदिक पुरोहितशाहीच्या वर्चस्वातून भारतीय समाज मुक्त करण्याचा प्रयत्न केला; पण स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था, समुद्रप्रयाणबंदी, अध्यात्माची व ज्ञानाची मक्तेदारी स्वतःकडे ठेवल्याने इतर वर्गांवर ब्राह्मणवर्गाचे असलेले वर्चस्व आणि जग हे बंधनकारक असून आत्मनिग्रह आणि सर्वसंगपरित्याग हाच मुक्तिमार्ग ही जीवनदृष्टी, अशा अनेक कारणांमुळे प्राचीन काळी तसेच मध्ययुगातही पितृसत्ताक पुरोहितशाहीच्या स्थानाला आणि सत्तेला आव्हान देणारा समाज भारतात निर्माण झाला नाही. शंकराचार्यांनी जग हे माया म्हणून बाजूला सारले. भौतिक प्रगतीची मुस्कटदाबी केली.

रोमसाम्राज्य संपुष्टात आल्याने गलितगात्र झालेल्या युरोपला अरब आणि ज्यू पंडितांनी आणलेला ग्रीक तत्त्वज्ञानाचा वारसा लाभला. प्रायोगिक विज्ञानाला चिंतनशील विज्ञानाची स्वामिनी मानणाऱ्या बेकनने अनुभवजन्य ज्ञानाचा मार्ग मोकळा केला. तत्त्वज्ञानाला जखडणाऱ्या रोमच्या धार्मिक वर्चस्वाच्या आणि ॲरिस्टॉटलच्या शृंखला तोडून ओकॅम आधुनिक जडवादाचा प्रवर्तक बनला. ' विश्व अनंत असून पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी नाही. असंख्य ग्रहांपैकी एक आहे.' असे घोषित करून ब्रूनोने ॲरिस्टॉटलचे प्रस्थापित मत खोडून काढले. ब्रूनोला जिवंत जाळण्यात आले; पण त्याच्या विचारांनी धार्मिक अंधश्रद्धांच्या कागदी किल्ल्याला अग्नी दिला. जुन्या श्रद्धांना आणि पारंपारिक मूल्यांना हादरा बसला. प्रबोधनाचा विजय झाला.

देकार्तने नव्या पद्धतीच्या तत्त्वज्ञानाचा प्रारंभ केला. त्याला स्पिनोत्सा, लायब्नीज आणि सर्वांत सुसंगत भाष्यकार बर्कलेप्रणीत चित्वाद व हॉब्ज, लॉक आणि कोंदियाकप्रणीत जडवाद, असे दोन फाटे फुटले. कांट हा अतीत चित्वादाचा संस्थापक खरा; पण जडवादाच्या विकासाला त्याने बराच हातभार लावला. हेगेलने चित्वादाला त्याच्या तार्किक निष्कर्षापर्यंत नेऊन त्याचा विकास केला, आणि त्याचे विसर्जन करून टाकले. अद्वैतवादाची स्थापना केली. हा अद्वैतवाद विश्वात्मक देववादी किंवा जडवादी होता.

हेगेलनंतर शेलिंगने प्रत्यक्ष चित्वादाचे, हार्टमनने अज्ञेयवादाचे आणि आउगुस्त कोंतने प्रत्यक्षार्थवादाचे प्रतिपादन केले. मिल्ल, स्पेन्सर आणि हक्सले यांच्या प्रत्यक्षार्थवादाने जडवादी स्पष्टीकरणाला पुष्टी दिली. लामार्क ओकेन आणि डार्विन यांनी धार्मिक पूर्वग्रहांना थारा दिला नाही. हेकेल आणि हक्सले यांनी सर्वांत कनिष्ठ जीवाच्या प्राथमिक रूपाचा शोध लावला. उत्स्फूर्त जननाचे गृहीतकृत्य जडवादी तत्त्वज्ञानाचा आधारस्तंभ बनला. फायरबाख, मार्क्स आणि एंगेलसच्या जडवादी समीक्षेने संस्कृतीचे धार्मिक मंदिर उध्वस्त केले.

विसाव्या शतकातील वास्तवशास्त्राने आणि विज्ञानाने जडवादाला प्रत्यक्षज्ञानाचा भक्कम पाया मिळवून दिला आहे. वस्तुमान, गती, गुरुत्वाकर्षण, शक्ती, ऊर्जा, दिक्काल आणि अवकाश यांच्या ज्ञानमीमांसेने जडवादाला काही काल संभ्रमात टाकले होते. आता विज्ञानाचे संशयातीतपणे सिद्ध केले आहे की

भौतिक जग केवळ जडात्मक वस्तूने बनले आहे. जडाचे अस्तित्व तर्कदृष्ट्या किंवा अनुभवदृष्ट्याही नाकारता येत नाही. जडवादाला भौतिक वस्तुवाद (Physical Realism) हे नाव उचित आहे.

जडवाद हे क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे. जगाचे ज्ञान मिळवण्याची आणि त्याची पुनर्रचना करण्याची प्रेरणा जडवादातून मिळते. जडवादी हा व्यवहारी ध्येयवादी असतो. निसर्गबाह्य गृहीतकांवर आधारलेला धर्म, अंधश्रद्धा अहंकार, स्वार्थ आणि सृष्टिविषयक निव्वळ उपयुक्ततावाद जोपासतो. जडवाद्याला निसर्ग स्वतःसिद्ध असतो. विश्वाच्या भव्य योजनेतील एक अतिसूक्ष्मकण असे जडवाद्याचे स्वतःबद्दल संकल्पन असल्यामुळे अहंकाराला तेथे जागा नसते.

**अभिव्यक्ती** : तत्त्वज्ञानातील जडवादी प्रवृत्तीचा प्रारंभापासून आधुनिक काळापर्यंत आढावा घेऊन मानवेंद्रनाथ रॉय 'जडवाद हेच अंतिम तत्त्वज्ञान आहे' या निष्कर्षाला येतात. त्यांच्या लेखनात पांडित्य, उदात्त ध्येयवाद आणि चिकित्सक प्रतिभाशक्ती आढळतात. शक्य तेथे ते राजकीय, सामाजिक आणि वैचारिक पार्श्वभूमींचा खुलासा करतात. पहा, संशयवाद आणि सोफीवाद (पृ. ३५-३९) आणि एपिक्यूरियनवाद (पृ. ६५-६७). अनेक ठिकाणी नव्या विषयाच्या आरंभी सूत्रमय वाक्यात विषय मांडून वाचकाचे मन तयार करतात. तदनंतर तो विषय विस्ताराने हाताळतात. पहा, जडवाद आणि व्यवहारी ध्येयवाद (पृ. २२०). त्यांचे विचार प्रगल्भ आहेत तरी भाषा सहजसुंदर आणि ओघवती आहे. उपमा-अलंकारांनी सजलेली आणि तेवढीच प्रभावीही आहे. दोन तीन उदाहरणे देतो– 'गुलामगिरी संस्थेचे विष नसानसात भिनल्यामुळे विघटन हेच प्राचीन समाजाचे ललाटलिखित होते.' 'आत्मनिग्रह' म्हणजे आनंदमय अज्ञानाच्या अंधाऱ्या समुद्रात बुडी मारणे.' 'स्वर्गाचे हित साधण्यासाठी पृथ्वीला सतत रक्तपाताची आणि भयानक शोकनाट्याची रंगभूमी बनण्याला भाग पाडतो तो भ्रमच होय.' 'सत्ताधारीवर्गाला तत्त्वज्ञान हवे असते ते केवळ देवाच्या मंदिरात स्वतःला भ्रष्ट होऊ देणारी नम्र युवती म्हणूनच.

**काही प्रतिक्रिया** : मानवाने स्वतःवर तरी विश्वास ठेवला पाहिजे किंवा देवावर. मानवी विचारांचा इतिहास हा चित्वाद आणि जडवाद, धर्म आणि विज्ञान यांच्या झगड्याचा इतिहास आहे. येथे मधला मार्ग नाही. जडवाद हीच मानवेंद्रनाथ रॉयची जीवननिष्ठा असल्यामुळे ते एका टोकाची भूमिका स्वीकारतात. मोठ्या त्वेषाने विरुद्ध मतावर तुटून पडतात. चित्वाद आणि जडवाद या दोहोमधील सुवर्णमध्य कठीण साध्य असेल पण असाध्य नाही. कारण केवल मानवकेन्द्रित जडवाद माणसातील आध्यात्मिक ओढीचे आणि श्रेष्ठतम मूल्यांचे सर्वार्थाने प्रेरणा कारण, साधनसामर्थ्य आणि परम साध्य बन् शकत नाही. स्वयंपूर्ण नसलेला आगंतुक जीवी मानव स्वतःच्याच जीवनाचा, नैतिकतेचा आणि निसर्गाचा मूलस्रोत स्वतःच बन् शकत नाही. सर्व घटनांचे स्पष्टीकरण निसर्ग विज्ञान करू शकेल. पण निसर्गाचे अस्तित्व मात्र स्पष्टीकरणाविना राहील.

अतिप्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत जडवादाचे अस्तित्व रॉयनी पांडित्यपूर्णपणे सिद्ध केले आहे. त्याच वेळी जडवादाचा चित्वादाने वारंवार केलेला पराजयही सिद्ध केला आहे. धार्मिकनेमुळे निर्माण झालेल्या अंधःश्रद्धांच्या आणि प्रयोजनवादाच्या शृंखला तोडण्यात जडवादाचे सामर्थ्य आहे. आध्यात्मिक वास्तवाकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करून भौतिक अस्तित्वातच सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे ही त्याची मर्यादा आहे. जडातून चित्‌ची निर्मिती रॉयना शक्य वाटते. पण चित्‌पासून जडाची अशक्य का वाटावी, समजत नाही.

पाश्चात्य तत्त्वज्ञानांचा प्राचीन काला–पासून आधुनिक कालापर्यंत आढावा घेणारे रॉय पौरस्त्य अभारतीय विचारप्रणालींची आणि शंकराचार्य रामानुजाचार्यांनंतरच्या भारतीय विचारप्रणालींची दखल घेत नाहीत. आधुनिक जडवाद या प्रकरणाचा पहिला परिच्छेद अल्पविरामाने संपतो आणि दुसरा परिच्छेद असंबद्धपणे सुरू होतो. काही तरी चुकल्यासारखे वाटते. बा. रं. सुंठणकरांनी स्वतंत्र कृती वाटावी इतके सहजसुंदर भाषांतर केले आहे, हे आवर्जून सांगावेसे वाटते.

– फादर द्रागो

सेंट व्हिन्सेंट हायस्कूल, पुणे

**जडवाद**

मूळ लेखक : मानवेन्द्रनाथ रॉय
अनुवादक : बा. रं. सुंठणकर
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
पृष्ठसंख्या : २३८
किंमत : वीस रुपये.

---

## फिनिक्स निवड

# Letter From The Underworld

–By F. M. Dostovesky

---

सध्या F. M. (frequency modulation) चे युग आहे. रेडियोबद्दलचे F. M. वगैरे; पण या मानसशास्त्राच्या जनकाचे इनीशिअलसुद्धा F. M. (Fydor Mikhailorich) असतील हे अलिकडेच कळले. थांबा ! पहिले इनीशिअल माहीत होतं. त्याचे दुसरे इनीशिअल क्वचितच लिहिलं जातं; पण हे F. M. च अर्थात सर्व निमॉनिक (mnemonic) आहे हे मी याआधी सांगितलेच आहे !

डॉस्टॉव्हॅस्कीला Master of the morbid psychology असं म्हटलं जातं; पण माणूस म्हणजे morbid नाही का ? बरं मी सांगतो म्हणून विश्वास ठेवू नका. माणूस विकृत नाही ना ? मग एवढ्या प्रचंड प्रमाणात तो अण्वस्त्र का निर्माण करतो ? 'जिम जॉन्स' सारखी प्रकरणं जोन्सटाउनमध्ये का होतात? का होतात, 'शॅटीला' व 'साब्रा' सारखी हत्याकांडे ? 'मायलाय' मॅसॅकरचे काय ? अशा क्रूरतेच्या याद्या केल्या तर हजारो पाने

भरतील. तुम्ही म्हणाल वाईट तेवढेच बघायचे; पण हे सर्व चालले आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करून तरी चालेल का? अशा प्रकाराची संख्या वाढतच जात आहे असंही म्हटलं जातं की, तुम्हाला स्वास्थ्य कळायला रोगाचा अभ्यास करायला लागतो.

फ्रॉइडपेक्षा डॉस्टॉव्हस्की 'मोठा' मानसशास्त्रज्ञ होऊन गेला, असे अनेकाचे म्हणणे आहे सूज्ञ लोकांना ते पटेलही; परंतु ज्या तीन-चार पुस्तकानी जगाची विचारचालनाच बदलून टाकली, त्यात डॉस्टॉव्हस्कीचे नाव नाही; पण फ्रॉइडचे आहे. डार्विनचे आहे.

डॉस्टॉव्हस्कीचे एक दुर्दैव असे की, त्यांनी गंभीर सत्ये जाता जाता सागितली. दारुड्याच्या तोंडातून वदवली. रोगट प्रकृतीच्या माणसानी त्याचे वक्तव्य केले. असलया माणसाची विश्वासार्हता (credibility) फार कमी असते. डॉस्टॉव्हस्कीने कादंबऱ्या न लिहिता फ्रॉइडसारखे 'कॉकेन-पेपर्स' टाइप लेख लिहिले असते तर निश्चित त्याच्याविषयी काही लोकांनी वेगळ्या दृष्टिकोनाने पाहिले असते.

आपण 'फ्रॉइड' वाचायला लागलो की, आपल्याला झोप लागते. आपण 'डॉस्टॉव्हस्की' वाचायला लागलो की, आपली झोप उडते!

मी मघाशी लिहिले आहे की, डॉस्टॉव्हॅस्कीने गंभीर सत्ये जाता जाता सांगितली. म्हणजे मला असे सागावयाचे होते की, डॉस्टॉव्हस्कीची शैली मला तरी बर्लेस्क वाटते (burlesque). म्हणजे अगदीच लोभस बर्लेस्क. *महत्त्व नसलेल्या विषयावर* गंभीरपणे लिहिणे अगर महत्त्वाच्या विषयावर मुद्दाम कुचेष्टेने लिहिणे. तरीपण डॉस्टॉव्हॅस्कीच्या साहित्याला विनोदी प्रहसन किंवा विडंबन म्हणता येणार नाही. डॉस्टॉव्हस्कीची पुस्तके वाचताना आपल्याला त्यातले गांभीर्य जाणवते व बरोबर थोडं थोडं हसूही येतं, हे मी याआधी लिहिलेच आहे. 'मी आहे, माझे अस्तित्व आहे.' निव्वळ या जाणिवेनेच डॉस्टॉव्हस्कीची काही पात्रे गुदमरून जातात असेही मी या आधी म्हटले आहे.

एकदा ललित मासिकात डॉस्टॉव्हस्कीविषयी जोरात वादावादी झाली होती. 'पार्टी ऑफ द फर्स्ट पार्ट' होती डॉ. विद्याधर पुडलीक. 'पार्टी ऑफ द सेकंड पार्ट'चे नाव आता मला आठवत नाही; पण तिने आपली बाजू छानच माडली होती!

सायकॉलॉजिकल रिॲलिझम, इंप्रेशनिस्टिक रिॲलिझम, एथिकल व्हॅल्यूज, एक्झिस्टेन्शिॲलिझम, क्रिश्चानिटी, इव्हिल, ह्युमिलिएशन, डीग्रेडेशन, अल्कोहॉलिझम, क्राइम, व्हायोलन्स, सब्लिमेशन, आयडिॲलिझम, ऑब्सेशन, रिडेंम्शन वगैरे अनेक विषय एफ. एम. नी हाताळले आहेत. 'लेटर्स फ्रॉम अंडरवर्ल्ड' ही डॉस्टॉव्हस्कीची कादंबरी मुद्दाम निवडली. कारण, एक तर ती फार कमी वाजली जाते व दुसरे म्हणजे ह्यात एक वेगळ्या प्रकारची 'सायकॉलॉजिकल इनसाइट' आहे. या कादंबरीत चार मुख्य पात्रे आहेत: (१) नरेटर (२) 'सीमॉनॉव्ह' हा 'नरेटरचा' शाळकरी मित्र. (३) झारकॉव्हरशियन ऑफिसर. (४) लीझा-ही वेश्या असते.

### बोला आता

या पुस्तकात डॉस्टॉव्हस्कीने अब्राहम मास्लॉच्या सायकॉलॉजीचा एक मुद्दा मांडला आहे. सॉरी, मास्लॉनी कदाचित त्याच्या पुस्तकात डॉस्टॉव्हस्कीच्या सायकॉलॉजीचा मुद्दा माडला असेल. कारण मास्लॉच्या आधी डॉस्टॉव्हस्की होऊन गेला. अन्डरवर्ल्ड या पुस्तकात नरेटर असं म्हणतो की, मानवजात सर्जन करण्यासाठी जन्मली आहे. मानवाला ह्या गोष्टीचं भान आहे. प्रत्येक वैयक्तिक मानव त्याला individuate (वेगळा) करण्यासाठी perverse होतो! कदाचित परिपूर्णतेइतकी दुसरी कोणतीच भीती मानवाला सतावत नाही. जीवन व जीवनाचं सारं मर्म हे प्रयत्न करण्यात असतं. ध्येय गाठण्यात नाही. माणसाची उद्दिष्टे साध्य झाली की, सर्व चार्मच निघून जातो. त्यामुळे त्याने अशी उद्दिष्टे ठेवावीत की, जी कधी साध्यच होणार नाहीत! एक प्रकारचा 'conscious inertia' ही सर्वांत उत्कृष्ट अवस्था होय असे नरेटर पुढे म्हणतो.

आणि लगेच पुढे F. M. डॉस्टॉव्हस्कियन वाक्य फेकतो!! 'माझा स्वतःचा (म्हणजे नरेटरचा) या सिद्धातावर अजिबात विश्वास नाही. मी हे सर्व लिहिले कारण छापील शब्दाला एक प्रकारची डिग्निटी आहे!' बोला आता!

या संदर्भात मॉस्लॉचे म्हणणे बघा.

'We fear our highest possibilities (as well as our lowest ones). We are generally afraid to become that, which we can glimpse in our most perfect moments, under the most perfect conditions, under conditions of greatest courage. We enjoy and even thrill to the godlike possibilities we see in ourselves in such peak moments And yet we simultaneously shiver with weakness, awe and fear before these very possibilities.'

मी ह्या आधीसुद्धा मॉस्लॉचे कोटेशन दिले होते; परंतु डॉस्टॉव्हस्कीशी ते किती मिळते-जुळते आहे हे दाखवायला इथे पुन्हा दिले आहे.

हा नरेटर डॉस्टॉव्हस्कीच्या इतर अनेक पात्रासारखा 'फनी' होता. एका क्षणी तो 'vain' होत असे, तर दुसऱ्या क्षणी त्याला स्वत.बद्दल किळस वाटे! तो हुषार दिसायचा सतत प्रयत्न करी. (इथे मला ब्रिटनच्या पतप्रधान मॅकमिलनची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. He spent half his energies in looking not clever! असं त्याच्याबद्दल कुणी तरी म्हणाले होते.)

नरेटरला स्वत च्या विक्षिप्तपणाबद्दल फारच भय वाटत असे. आणि डॉस्टॉव्हस्कीच्या मीपणाच्या ज्वलत जाणिवेमुळे तो अगदी एकटा-एकटा असे. तरी पण त्याला इतरापेक्षा सुपीरिअर वाटे!! शेवटी तो अगदी एकान्तवासी (recluse) होतो व रस्त्यावर रात्री भटकायला लागतो. माणसाचं मन म्हणजे खोलातल्या खोल महासागरापेक्षा खोल! त्यात काय चालले आहे याचे अनेक लोकाना कुतूहल असते. डॉस्टॉव्हस्कीइतकं कोणीही आत शिरलं नसेल एखाद्या विजेच्या कल्लोळाने भयंकर अधाऱ्या रात्री काही वस्तू क्षणार्धासाठी चमकून दिपून जाव्यात तसे माणसाच्या मनाविषयीचे अंतर्ज्ञान डॉस्टॉव्हस्कीला होत असे.

फ्रॉइडला पण असे अतर्ज्ञान होत असे. पण डॉस्टॉव्हस्कीसारखे ब्रिलयंट फ्लॅशेस त्याच्या बाबतीत न होता एक प्रकारचा क्लिनिकल इनसाईट त्याला होता. फ्रॉइडने जेव्हा The interpretation of dreams लिहिले तेव्हा तो स्वतःच म्हणाला होता, Insight such as this but comes

once in a life time !

डॉस्टॉव्हस्कीने Psyche च्या अनेक काळ्या कपारीत प्रवेश केला. वास्तवता रूपी काद्याच्या अनेक साली काढल्या. पण शेवटी त्याचं साहित्य म्हणजे एक प्रचंड संघर्षांचा डोंगरच आहे असे मला तरी वाटते. ते साहित्य एक रणांगणच आहे. इथे ईश्वरवाद व नास्तिकतेची धुमश्चक्री, धर्ममर्यादेचा पुरस्कार व नकार, बड पुकारणे व संघटित काम याचा आविष्कार, आमूलाग्र बदल व स्टेटस क्वॉ बद्दल गरगर फिरणारी मते, विकृती, पाप, यातना हे जरी त्याला अटळ वाटत असे तरी त्याच्या साहित्यात आदर्शवादाची नस सापडते.

मी शाळा-कॉलेजमध्ये असताना डॉस्टॉव्हस्कीचं पुस्तक हातात आले की, सारं जगच (माझ्यासुद्धा) विसरून जात असे. पण ह्या जगात ट्रॅजेडया काय कमी ? त्या वेळेला डॉस्टॉव्हस्कीने लिहिलेल्या अनेक गोष्टी कळल्या नव्हत्या. एका झपाटलेल्या अवस्थेत ती पुस्तके वाचली गेली. आता जर डॉस्टॉव्हस्की वाचला तर त्या वेळेला अनेक न कळलेल्या गोष्टी कळतील. पण ते शक्य तरी आहे का ?

भाषांतर करणाऱ्यांना नेहमीच कमी लेखले जाते. डॉस्टॉव्हेस्कीच्या पुस्तकाचे अनेक लेखकांनी भाषांतर केले आहे हॉगर्थ-कॉन्सटन्स गारनेट डेव्हिड मॅगारशॅक, जॉर्ज-बर्ड, अशी काही नावे आठवतात. भाषांतकार किती महत्त्वाचा असतो याचा पडताळा घ्यायचा असेल तर डॉस्टॉव्हस्कीचे एकच पुस्तक कॉंसटन्स गारनेटनी केलेलं व इतर कोणत्याही भाषांतरकाराने केलेले वाचून बघावं.

कॉंसटन्स गारनेटनी भाषांतर केलेली पुस्तके वाचणे म्हणजे डॉस्टॉव्हस्की शक्य तेवढा जास्त समजणे होय. इतर भाषांतरकाराची पुस्तके वाचणे म्हणजे डॉस्टॉव्हस्कीला कमी समजणे तर होयच, परंतु त्याच्या साहित्याबद्दल नावडही निर्माण करण्यासारखे होय. रस्त्यावर बसणाऱ्या विक्रेत्याकडून डॉस्टॉव्हस्की कधीही वाचू नका तुम्हाला आठेक रुपायात उत्कृष्ट कागद, सुंदर छपाई व हार्ड कव्हर डॉस्टॉव्हस्की मिळेल हा मोह टाळा व तीस रुपयांचे गार्नेटनी केलेल्या भाषांतराचेच पुस्तक वाचा !

— जे. एन. पोंडा

---

विज्ञानेश्वरी । प्रा. भा. रा. बापट

## □ क्षणभंगुर यौवनात – गणित

प्रणय आणि गणित हे तारुण्यात खेळायचेच खेळ आहेत. म्हातारपणी प्रीतीचे खेळ खेळणारे दुष्यतासारखे नायक एक वेळ आढळतील; पण तिशी किंवा चाळिशी उलटल्यानंतर गणितात नवीन काही करणारी माणसे फारच विरळ ! इंग्लंडच्या रॉयल सोसायटीचे सभासद होणे ही शास्त्रज्ञाच्या श्रेष्ठत्वाची एक खूण मानली जाते. स्थापनेपासून आतापर्यंत शेकडो वैज्ञानिकांना रॉयल सोसायटीने आपले सभासद करून घेतले आहे. सोसायटीचे सदस्यत्व मिळण्याच्या वेळची वये पाहिली तरी गणितज्ञ सभासद सर्वांत तरुण असतात हे दिसून येते. गणितातील संशोधनाचा आणि गणितज्ञाच्या वयाचा संबंध दाखवणारे हे एक जरा अप्रत्यक्ष उदाहरण झाले. तशी अगदी प्रत्यक्ष आणि अधिक ठळक उदाहरणे विपुल आहेत.

सर ऐझॅक न्यूटन (१६४२–१७२७) ची गणना मानवी इतिहासात आजपर्यंत झालेल्या तीन सर्वश्रेष्ठ गणितज्ञात नक्कीच करावी लागेल. न्यूटन दीर्घायु होता. त्याने ५० व्या वर्षी गणित सोडले व टाकसाळीवरचा अधिकारी झाला; परंतु त्याआधी कित्येक वर्षे त्याने गणितात नवे संशोधन मुळीच केलेले नव्हते. गणिताच्या क्षेत्रात न्यूटनचे नाव अजरामर झाले ते मुख्यतः तीन गोष्टीमुळे : गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत, बायनॉमियल सिद्धांत व कलन-गणित. या तिन्ही गोष्टी त्याने १६६६ मध्ये शोधून काढल्या. त्या वेळी न्यूटन फक्त २४ वर्षांचा होता. प्लेगच्या साथीमुळे केम्ब्रिज विद्यापीठ बंद होते म्हणून त्या वेळी न्यूटन आपल्या खेड्यात आलेला होता. तेथील वातावरण जरासुद्धा आभ्यासिक नव्हते; पण 'माझ्या आयुष्यातील सर्जनशीलतेचा तो सर्वांत बहारीचा काळ होता आणि मी सर्वस्वी गणित व भौतिकी यातच गढून गेलेलो होतो' असे न्यूटननेच लिहून ठेवले आहे. उच्च प्रतीचे सशोधन तारुण्यातच केले जाते असे सर्वच विज्ञानाबद्दल म्हणता येईल; पण ही गोष्ट गणिताच्या बाबतीत अधिक प्रकर्षाने दिसून येते. त्या दृष्टीने क्रम लावायचाच झाला तर तो गणित, भौतिकी, रसायनशास्त्र व जीवशास्त्र असा लागेल.

### गॅल्वा–रामानुजन

विशुद्ध गणिताच्या क्षेत्रातील श्रेष्ठ जर्मन गणितज्ञ रीमान फक्त ४० वर्षांचा असताना मृत्यू पावला. त्याने गणिताच्या अनेक शाखांत मूलभूत प्रमेये प्रस्थापित केली आहेत. भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन म्हणजे एक विलक्षण चमत्कार होता त्यांनी उच्च गणिताचे जरासुद्धा शिक्षण घेतले नव्हते. ते एकदम श्रेष्ठ गणितज्ञ झाले. किंबहुना ते जन्मजात गणिती होते. रॉयल सोसायटीचे पदवीधर नसलेले (इतकेच नव्हे तर दोनदा परीक्षेला बसून ते मॅट्रिक झालेले नव्हते !) ते एकमेव सभासद आहेत. ते केवळ ३३ व्या वर्षी मृत्यू पावले. त्यांची गणितातील सर्व प्रमुख कामगिरी विशीतलीच आहे. अॅबेल (१८०२–१८२९) हा नॉर्वेजियन गणिती २७ व्या वर्षीच मृत्यू पावला. गणिती विश्लेषण (Analysis) या विशुद्ध गणिताच्या शाखेत अॅबेलने उच्च कोटीची प्रमेये सिद्ध केली आहेत त्याचे सर्व संशोधनकार्य अर्थातच विशीतलेच आहे. बर्ट्रांड रसेल (१८७३–१९७०) चे नाव आपणाला तत्त्वज्ञ, थोर सामाजिक विचारवंत व जागतिक शांततेचा पुरस्कर्ता म्हणूनच माहीत असते. त्याला वाङ्मयाचे नोबेल पारितोषिकही मिळाले होते; पण मूलतः तो एक गणिती होता. किंबहुना त्याला या शतकाचा एक अत्यंत श्रेष्ठ गणिती मानले जाते. रसेलही न्यूटनप्रमाणेच किंवा अधिकच दीर्घायु होता. मात्र आपले गणितातील सर्व कार्य २७ व्या वर्षीच पूर्ण केले होते असे त्याने आपल्या आत्मवृत्तात लिहिले आहे.

पण तरुण आणि प्रतिभाशाली गणितज्ञाचे सर्वांत ठळक व विस्मयकारक उदाहरण गॅल्वा (Galois, १८११–१८३२) या फ्रेंच संशो-

धकाचे आहे. तो २० वर्षांचा असताना मारला गेला ! त्यामुळे एका दृष्टीने त्याचे मोठेपण त्याच्या काळात मान्यता पावले नाही. त्याने वयाच्या १६ व्या वर्षापासूनच समकालीन श्रेष्ठ गणितज्ञानासुद्धा समजणार नाही असले गणित करायला सुरुवात केली. या २० वर्षांच्या पोऱ्याला आता आधुनिक गणितातील एका शाखेचा जनक समजतात. ती शाखा गॅल्वा–उपपत्ती म्हणूनच प्रसिद्ध आहे. गॅल्वाच्या मृत्यूसंबंधी थोडे गूढ आहे. २० व्या वर्षीच तो तत्कालीन राजकारणात भाग घेत असे. तो काळ फ्रान्समध्ये अत्यंत अस्थिरतेचा होता. क्रांतिवादी आणि राजनिष्ठ यात सत्ता हिंदकळत होती. छुपे हल्ले, द्वंद्वे, पुढाई यांना ऊत आला होता. अशात गॅल्वाचे एका मुलीवर प्रेम बसले. त्याच मुलीवर दुसऱ्या एका लष्करी अधिकाऱ्याचे मन गेले. तत्कालीन मर्दुमकीच्या कल्पनेप्रमाणे त्या अधिकाऱ्याने गॅल्वाला पिस्तुल – द्वंद्वाचे आव्हान दिले... आणि गॅल्वानेही पुढचामागचा विचार न करता तत्क्षणी ते आव्हान स्वीकारले. दुसऱ्याच दिवशी हा उमदा तरुण श्रेष्ठ गणितज्ञ एकाच गोळीत ठार झाला ! कोणी असेही म्हणतात की, तो लष्करी अधिकारी गॅल्वाचा राजकीय विरोधकच होता.

आपण या द्वंद्वात मारले जाणार आहोत याची स्पष्ट कल्पना गॅल्वाला आली होती असे दिसते; पण मृत्यूच्या अशा भीषण दर्शनाने तो २० वर्षांचा तरुण घाबरून गर्भगळित झाला नाही. द्वंद्वाच्या आधीच्या रात्री बसून गॅल्वाने आपली गणितातील सर्व प्रमेये, सर्व सिद्धांत लिहून काढले. अर्थात वेळ फारच थोडा होता. सर्व उपपत्ती सविस्तर लिहून काढणे शक्य नव्हते. जे जसे आठवेल, सुचेल तसे गॅल्वाने भराभर लिहून काढले. त्याचे गणितातले कार्य म्हणजे मृत्यूची चाहूल लागली असताना त्याने खरडून काढलेल्या त्या तीन-चार वह्या !... त्या वह्यांनीच गॅल्वाला गणिताच्या इतिहासात अजरामर केले.

गॅल्वा किंवा रामानुजनसारखी माणसे युगायुगानेच जन्मत असतील; पण अशी रत्ने वाया जाऊ नयेत याची समाजाने काळजी घेतली पाहिजे. तेल, कोळसा, लोखंड, जलप्रपात यांप्रमाणेच अशी माणसे हीसुद्धा नैसर्गिक संपत्ती असते. तिचा मुद्दाम शोध घेतला पाहिजे.

## मानवतेच्या शत्रूसंगे


कर्करोग किंवा कॅन्सर म्हणजे काय ? तो कशाने होतो ? आपल्याला माहीत आहेच की, पृथ्वीवरील सर्वच सजीव पेशींचे बनलेले असतात. मनुष्याचे शरीरही पेशींचेच बनलेले असते. प्रत्येक पेशीचे शरीरातील कार्य ठरलेले असते. तिचा आयुष्यक्रम ठरलेला असतो. पेशींनी केव्हा काय करायचे त्याचा संदेश त्या पेशीच्या केंद्रात असलेल्या गुणसूत्रावरील (chromosome) जीन्समध्ये असतो. काही कारणाने या जीन्समध्ये विघाड होतो. एका प्रकारच्या बिघाडामुळे पेशी भरमसाठ वाढतात, संख्येने आणि आकारानेही. त्या संयम सोडून भरकटतात, उततात, मातवात. शरीरात अशा पेशींच्या गाठी होऊ लागतात. त्यालाच आपण कर्करोग किंवा कॅन्सर असे सामान्य नाव दिले आहे; पण चांगल्या, निरोगी आज्ञाधारक पेशी एकदम कशामुळे भडकतात ? जीन्समध्येच काही तरी दोष निर्माण होत असल्यामुळे कॅन्सर होत असावा असा गेली काही वर्षे शास्त्रज्ञांचा अंदाज होता. या संदर्भात गेली दहा वर्षे खूपच नव्या गोष्टी उजेडात आल्या आहेत. जीन्समधील दोषाचे एक कारण पर्यावरणीय घटक, उदा. तंबाखूचा धूर किंवा किरणोत्सर्जन असणे शक्य आहे.

गेल्या काही वर्षांत जीन्समधील बदल/बिघाड कसे होतात यासंबंधी तीन वेगवेगळ्या क्षेत्रांतील वैज्ञानिकांनी एकत्र येऊन अभ्यास व संशोधन करायला सुरुवात केली आहे. त्यांच्या या सहकार्याला चांगले यशही येऊ लागले आहे. पेशीच्या अनुवंशशास्त्राच्या (Cell Genetics) अभ्यासकांना आता गुणसूत्रातील बदलांचा आणि विशिष्ट प्रकारच्या कॅन्सरचा प्रत्यक्ष संबंध जोडता येऊ लागला आहे. विषाणुशास्त्राच्या (Virology) संशोधकांना जीन्सच्या घटनेत बदल घडवून आणण्यात विषाणूंची (Virus) काय भूमिका असते ते कळू लागले आहे. रेणवीय जीवशास्त्रज्ञांना (Molecular Biology) एखाद्या पेशीमधील सहस्रावधी जीन्सपैकी नेमक्या कोणत्या जीनमध्ये बिघाड झाला आहे हे सांगता येऊ लागले आहे. कारण अशा बिघाडामुळे गाठ होणे व पुढे कॅन्सर होणे संभवते. गेल्या वर्षी शिकागो विद्यापीठात कॅन्सर या विषयावर एक परिसंवाद झाला. त्याला वरील तीन शास्त्रांचे सुमारे ४०० वैज्ञानिक जमले होते. सर्वांनी आपापल्या शास्त्रात काय काय संशोधन झाले व ते कोणत्या निष्कर्षाप्रत आले त्याची माहिती एकमेकांना दिली. त्यावर विस्तृत चर्चा केली. या चर्चासत्राच्या अध्यक्ष श्रीमती जानेट रॉली म्हणाल्या, '१० वर्षांपूर्वी आमच्यापैकी कोणालाच इतक्या वेगाने संशोधन होईल याची कल्पना आली नव्हती.'

या प्रगतीचा पहिला टप्पा विषाणुशास्त्राने गाठला आहे. सुमारे ७० वर्षांपूर्वीच असे कळले होते की, कोंबड्यांच्या शरीरात विषाणू टोचले तर त्यांच्या शरीरात घातक गाठी निर्माण होतात. कोंबडीवरील हे प्रयोग प्रथम १९०८ मध्ये केले गेले. त्यानंतर उंदीर, मांजर, गायी इ. अनेक प्रकारच्या प्राण्यांवर प्रयोग करून विषाणूंमुळे शरीरात गाठी निर्माण होतात हे सिद्ध केले. तरी १९८० पर्यंत मानवी पेशीत कॅन्सर निर्माण करणाऱ्या एखाद्या निश्चित विषाणूचा पत्ता लागलेला नव्हता; पण त्या वर्षी अमेरिकेतील नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूटच्या रॉबर्ट गॅलो यांनी एका विशिष्ट प्रकारचे विषाणू वेगळे करण्यात यश मिळविले. या विषाणूंमुळे मानवी शरीरातील पांढऱ्या पेशी रोगट होऊन T– सेल ल्युकेमिया नावाचा कॅन्सर होतो. त्यानंतर वर्षभरातच जपानमध्ये याच विषाणूमुळे लिंफोमा हा कॅन्सर होतो असे आढळून आले. डॉ. गॅलो यांच्या म्हणण्यानुसार आणखी काही प्रकारच्या कॅन्सरशीही या विषाणूचा संबंध असू शकेल.

### जीन्स काय करतात ?

कॅन्सर–विषाणू निरोगी पेशीमध्ये कसा बदल करतात व त्यांना कसे बिघडवतात हेही संशोधकांना हळूहळू समजू लागले आहे. काही प्रकारच्या विषाणूमध्ये कॅन्सरजनक जीन्स असतात. त्यांना ऑंकोजीन्स (Oncogenes) म्हणतात. हे ऑंकोजीन्स वेगळे करून निरोगी




पेशींत मिसळले की, त्यांच्या प्रक्रियेने निरोगी पेशी बिघडतात. गेल्या दशकात असे १५ प्रकारचे आँकोजीन्स शोधून काढले आहेत.

परंतु कॅन्सर निर्माण करणाऱ्या सर्वच विषाणूंमध्ये आँकोजीन्स असतात असे नाही. मग हे विषाणू कॅन्सर कसा निर्माण करतात ? त्यांचा मार्ग थोडा अप्रत्यक्ष असला पाहिजे. कदाचित असले विषाणू मानवी पेशीत असणाऱ्या जीन्समध्येच काही बदल घडवून आणत असतील. या दिशेने मायकेल बिशप व हॅरॉल्ड व्हर्मस हे दोन सूक्ष्म जीवशास्त्रज्ञ कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागात संशोधन करीत होते, तेव्हा त्यांना एक आश्चर्यकारक गोष्ट दिसून आली. कॅन्सरकारक विषाणूंमध्ये जसे आँकोजीन्स असतात जवळजवळ तसेच जीन्स सर्वच प्राण्यांत—मनुष्यातसुद्धा निसर्गतःच असतात. हे जीन्स निरोगी पेशीतच असतात असे त्या दोघांना दिसून आले. बिशप व व्हर्मस यांची अशी कल्पना आहे की, निसर्गतःच असणारे जीन्स काही तरी किरकोळ कारणांनीच कॅन्सरजनक जीन्समध्ये रूपांतरित होत असावेत. श्री. बिशप तर म्हणतात की, 'त्या दृष्टीने विचार केला तर कॅन्सर हा प्रत्येक पेशीला मिळालेला 'हुंडाच' आहे.'

निरोगी पेशींमध्ये हे उपटसुंभ जीन्स काय करीत असतात हे अजून नीटसे कळलेले नाही; पण, 'इतक्या प्रदीर्घ उत्क्रांतीतून ते टिकून राहिले आहेत ते केवळ शरिरात घातक गाठी निर्माण व्हाव्यात म्हणून नक्कीच नाहीत' असा हॅरॉल्ड व्हर्मस यांचा विश्वास आहे. कदाचित मनुष्य गर्भावस्थेत असताना होणाऱ्या त्याच्या वाढीशी या आगंतुक जीन्सचा संबंध असेल. त्यांचे त्या वेळचे काम संपले की, त्यांना सुप्तावस्था प्राप्त होत असेल. तसे हे जीन्स मुळात साधे, निरोगीच असतात. 'मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'-तील रेणवीय जीवशास्त्रज्ञ रॉबर्ट वाइन्बर्ग यांच्या मते हे साधे, साळसूद जीन्स त्या व्यक्तीच्या आयुष्यात केव्हा तरी भडकतात. त्यांना काही अपाय होतो. मग ते त्या पेशीला अनिर्बंध वाढण्याला प्रवृत्त करतात. श्री. वाइन्बर्ग यांना असे आढळून आले की, या जीन्समध्ये अगदी सूक्ष्म बदल झाला तरी त्या कॅन्सरजनक होऊ शकतात. मानवी मूत्रपिंडाच्या पेशीतील एक जीन सुमारे ६००० रासायनिक घटकांचा बनलेला असतो. मूत्रपिंडाचा कॅन्सर निर्माण करणाऱ्या जीनमध्ये या ६००० पैकी फक्त एका घटकात थोडा बदल असतो! एवढ्या सूक्ष्म फरकामुळेही गाठी निर्माण होतात व त्यांचे पर्यवसान कॅन्सर-मध्ये होते. अशा जीन्सचा शोध घेण्याचे काम आता अमेरिकेतील अनेक संशोधनकेंद्रात सुरू झाले आहे. ल्यूकेमिया व फुप्फुसाचा कॅन्सर निर्माण करणारे जीन्स सापडू लागले आहेत. माणसाला होणाऱ्या कर्करोगाचे सुमारे १०० प्रकार आहेत. यातील प्रत्येक प्रकार कोणत्या जीनमुळे होतो हे लवकरच समजेल असा विश्वास संशोधकांना आता वाटू लागला आहे.

मानवी कॅन्सरसंबंधीचे हे सर्व संशोधन अर्थातच प्रयोगशाळेतील बशीत घेतलेल्या पेशींवरच ( Culture ) चालू आहे. प्रत्यक्ष माण-साच्या शरीरावर हे प्रयोग करणे शक्यच नाही. गेली कित्येक वर्षे शास्त्रज्ञांना एक गोष्ट माहीत आहे ती अशी की, मानवी पेशीत—म्हणजे प्रत्येक पेशीत—गुणसूत्रांच्या २३ जोड्या असतात. ( प्रत्येक सजीवातील पेशीत असलेल्या गुणसूत्रांच्या जोड्यांची संख्या ठराविक असते ) असे दिसून आले आहे की, या गुणसूत्रांतील बदलांचा विशिष्ट प्रकारच्या कॅन्सरशी संबंध असतो. गुणसूत्रातील हा फरक अगदी दृश्य स्वरूपाचा असतो. एक प्रकारचा ल्यूकेमिया झालेल्या पेशीतील ९व्या गुणसूत्राचा एक भाग व २२व्या गुणसूत्रातील एक भाग यांची अदलाबदल झालेली असते. फुप्फुसाचा कॅन्सर असेल तर तिसऱ्या गुणसूत्राचा एक भागच गायब झालेला असतो, अशी अनेक उदाहरणे आहेत. असे बदल किंवा अदलाबदल का होते व ती घडवून आण-ण्यात आँकोजीनसारख्या आगंतुक जीनचे काय कार्य असते हे अजून कळलेले नाही; पण ते लवकरच कळेल असे दिसते. पेशीत जीन्स मुख्यतः प्रोटीन्स तयार करतात. प्रत्येक जीनने कोणते प्रोटीन तयार करायचे, त्याचा गुप्त संदेश ( DNA च्या स्वरूपात ) लिहिलेला असतो. कॅन्सर होतो त्या वेळी जीनकडून तयार व्हावयाच्या प्रोटीन-मध्ये थोडा बदल झालेला असतो. हा बदल कॅन्सर झाल्यानंतर खूप दिवसांनी कळतो. त्या वेळी काही करता येत नाही; परंतु ते अगदी आरंभीच कळले तर कदाचित त्याचा कायमचा बंदोबस्त करता

येईल. तसे झाले तर तो विज्ञानाचा फार मोठा विधायक विजय ठरेल. ( 'टाइम' वरून )

## अवकाशातून अशुभ वार्ता !

कष्टाळू व उद्योगी लोकांना अवकाशात थारा नाही. हुशार, कामचुकार किंवा तद्दन आळशी लोकांना मात्र अवकाश नक्की मानवेल. अमेरिकेच्या कोलंबिया अवकाशयानातून गेलेल्या जॅक लाउसमा व गॉर्डन फुलरटन यांनी आपल्याबरोबर काही कीटक नेले होते. यानातील वजनरहित अवस्थेचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी काही माश्या, काही मधमाश्या व काही पतंग बरोबर घेतले होते. पृथ्वीवर असताना कोणत्याच प्राण्याला वजनरहित अवस्थेचा कधीच अनुभव नसतो म्हणूनच यानातून जाणाऱ्या माणसांना कित्येक दिवस आधीपासून त्या अवस्थेचा सराव करावा लागतो.

अवकाशयानात माणसाला मुळीच कष्ट न करता हालचाल करता येते. इतकेच नव्हे तर पंख नसले तरी तो इकडून तिकडे तरंगत जाऊ शकतो असे आपण वाचलेले आहेच; पण कोलंबियातील कीटकांना हे अर्थातच माहीत नव्हते. पतंग अगदी आळशी असतात. सुरुवातीचा धक्का ओसरला तरी ते जे कोठे तरी सांदीकोपऱ्यात जाऊन बसले ते त्यांनी फारशी हालचालच केली नाही. माशीने प्रथम जरासे चालून पाहिले. चालण्याला मुळीच कष्ट पडत नाहीत हे तिला कळले. तसेच उडण्याची–पंख हलवून–गरज नाही. कारण बसलेली वस्तूच मागे ढकलली की कष्ट न करता तरंगता येते हेही माशीच्या लक्षात आले; पण मधमाश्यांची गोष्टच वेगळी ! त्यांनी लगेच उद्योगाला, उडायला सुरुवात केली; खूप पंख हलवूनही त्या पुढे-मागे कोठेच जाऊ शकत नव्हत्या, हे त्यांच्या लक्षात आलेच नाही आणि १२ पैकी ११ मधमाश्या थोड्याच वेळात श्रमातिरेकाने मरून पडल्या ! ☐

( 'न्यूसायंटिस्ट' वरून )


**SPECIAL TRAVEL PROGRAMME TO VISIT**

**2 BIGGEST INTERNATIONAL TRADE FAIRS** — **ENGLAND & PARIS**

**PAKEX'83** — 25 - 29 APRIL — ENGLAND

**T.P.G '83** — 20 - 28 APRIL — PARIS

**PRINTING • PACKAGING • CONVERTING • PAPER • GRAPHIC ARTS**
**MACHINERY • MATERIALS • TECHNOLOGY**

Also Visit: England, Germany, France, Switzerland, Holland & Belgium & Russia

**CHOICE OF 2 TOURS**

| | | | |
|---|---|---|---|
| REGULAR TOUR | 20 DAYS | Rs. 17,200 | 18 April '83 |
| EXECUTIVE TOUR | 10 DAYS | Rs. 13,000 | 20 April '83 |

For Registration and completing your travel formalities contact

**SITA WORLD TRAVEL (I) PVT. LTD.**

**BOMBAY** - 8-Atlanta, Nariman Point, Bombay 400 021. Tel: 240666, 240681, 240869, 225977. Miss. Vijaya Sastry.
**NEW DELHI** - F-12, Connaught Place, New-Delhi 110 001 Tel: 43103, 40568, 45485, 45961. Mr. R. M. Nagar.
**MADRAS** - 26, Commander-In-Chief Road, Madras-600 105. Tel 88861, 83638: Mrs. Soumya Raghavan.
**CALCUTTA** - 'Mansarowar' 2nd Floor, 3B Camat Street, CALCUTTA-700 016 Tel 247224, 249769. Mr. S. Ghosh Chaudhari

OFFICES ALL OVER INDIA

BANGALORE, HYDERABAD, AGRA, COCHIN, KANPUR, JAIPUR, VARANASI, SRINAGAR
PUNE, AHMEDABAD, BARODA, COIMBATORE, HUBLI

OFFICIAL PROMOTERS
OM PRAKASH: Box Board Industries, 396, Savarkar Marg, Bombay- 25. PHONE: 4229281
VASANT K. VIKAMSEY: Vasant Process, 17, Lalwani Ind. Estate, Bombay- 31. PHONE; 8828337

WHILE APPLYING PLEASE REFER THE PARTICULAR DATE OF THE MANOOS ISSUE.

# राम कोणाचा कोण ?

पृष्ठ ४ वरून

बाबासाहेब आंबेडकर म्हणावयाचे की, रामायण व महाभारत हे राजकीय ग्रंथ आहेत. दोन बलाढ्य संस्कृतीचा तो संघर्ष आहे.

'आज आमच्यातही एक विचारधारा येते आहे. ती म्हणजे आम्हीसुद्धा पूर्वी क्षत्रिय होतो. आमचे राज्य होते. आमचे राजे होते, ह्या प्रकारची. मला अशा प्रकारच्या अहंकारात रस नाही. आम्ही पूर्वी राजे होतो ह्याबद्दल अभिमान नाही. आपण सगळे Deyss होऊ या !'

विजय तेंडुलकरांचे त्या दिवशी भाषण झाले नाही. English मध्ये ज्याला Loud-thinking म्हणतात तसे thinking झाले.

'मी रामायण वाचले नाही; पण त्यातल्या भाकडकथा वाचल्या आहेत.' आता ह्यात हसण्यासारखे काय होते ? पण लोक हसले. तेंडुलकर सांगत होते, 'तरी मी यायला तयार झालो, कारण प्रा. कांबळेयांचे हे पुस्तक मी वाचले आहे. त्यात विद्वत्तेचा आव नाही. तसा त्याला आव आणावयाचा असता तर त्याने ४००–४५० पानाचा ग्रंथ लिहिला असता. हे पुस्तक ७०–७५ पानाचे आहे. त्यात सनसनाटी असे काही नाही. कारण त्याला सनसनाटी म्हणून काही लिहावयाचे नव्हतेच ! तो विद्यार्थी आहे, चांगला विद्यार्थी आहे.'

'पण मी ह्यापुढे जाऊन विचार करतो. परवा मी 'गांधी' पाहिला. तो बघून गांधींचं सगळं लिखाण वाचून काढावं असं माझ्या मनात आलं. विचार आला की गांधी हा 'माणूस' म्हणून कसा होता ?

'बुद्धिवादी म्हणवणारे पण अंधश्रद्धावान होतात. माणसाचा देव फार लवकर तयार होतो. मार्क्स हा असाच नवा देव तयार झाला आहे. मार्क्स म्हणाला ते त्रिकालाबाधित सत्य आहे असे मानणारे लोक आहेत. जशी रामाबद्दल विचार करावयाची वेळ आली आहे तशीच मार्क्सबद्दल व आंबेडकरांबद्दलही विचार करण्याची वेळ आली आहे !'

'माणसाला श्रद्धास्थानांची खरंच गरज असते का ? आपल्या पंतप्रधान जेथे–जेथे जातात, तेथे–तेथे तेथल्या देवस्थानांना भेटी देतात. पूर्वी वाटावयाचे की, हा मत मिळवण्याकरता केलेला एक खेळ आहे; पण आता तसे वाटत नाही. देवळात जाऊन त्या तासन तास पूजा–अर्चा करतात. कशासाठी? त्या जागृत गणपतीच्या देवळासमोर शेकडो लोकांची रांग असते. ती का ? कोण असतात ते लोक ?'

'ह्याचे कारण जगणे असुरक्षित झाले आहे, जीवनात अगतिकता आली आहे.'

'ह्या पुस्तकावर टीका होईल. वेगवेगळ्या कारणांकरता वेगवेगळे पवित्रे घेतले जातील. पुस्तक जप्त व्हावे म्हणून चळवळी होतील व कदाचित जप्त होईलही ! हे दलितांच्या शक्तीच्या मान्यतेचे चित्र आहे. आता दलित सगळ्या समाजाचे पुढारी होतील ही भीती आहे.'

'आता दलितसमाजाचे डोळे उघडे झाले आहेत ते आता झाकले जाऊ नयेत. कांबळे आता पँथरचा इतिहास लिहिणार म्हणतो तोही असाच डोळे उघडे ठेवून लिहिला गेला पाहिजे !'

'रामायणाचा पगडा आपल्या प्रांतात काहीच नाही. तो पहावयाचा असेल तर उत्तरप्रदेश, बिहारकडे पहावयास पाहिजे.'

हे श्यामला तात्काळ पटले. त्याच्या आयुष्याची २०–२५ वर्षं उत्तरभारतात गेली होती. गया, बनारस, काशी, गंगोत्री वगैरे प्रदेश त्याने पाहिला होता. अलाहाबादच्या कुंभमेळ्याला आलेल्या लाखो भाविकांची गर्दी त्याने पाहिली होती.

काय शक्ती ह्या लाखो लोकांना खेचून आणत असेल ? नाही रहाण्याची सोय, नाही खाण्याची प्रवास तर जनावरांचा बरा असे म्हणण्याची वेळ यावी असा. ही काही सगळी मध्यमवर्गीय नाहीत. ब्राह्मण नाहीत. त्यांचे प्रभू रामचंद्रात काही आर्थिक हितसंबंध गुंतलेले नाहीत. मग त्यांची प्रेरणा काय काय असेल ?

रामाबाबत व रामायणाबद्दल आपले म्हणणे मांडायचा प्रा. अरुण कांबळेंना अधिकार आहे. तसा अधिकार पूर्वी पुष्कळांनी गाजवला आहे हे त्यांच्या पुस्तकात आधार दिले आहेत त्यावरून सिद्ध व्हावे कांबळेयांना कोणी विरोधही करू नये; पण मग ह्या लाखो भोळ्या–भाबड्या भाविकांच्या भावनांचा काही विचार होणार आहे का ? त्यांच्यापर्यंत प्रा. कांबळे यांचे विचार जाणार आहेत का व कसे ?

का त्यांचे रामायणावरचे विचार फक्त मराठी मध्यमवर्गापुरतेच आहेत ?

आढावांचे समारोपाचे भाषण चालले होते. श्यामच्या मनात विचार येत होते. सभा संपली. श्याम तडातडी निघाला.

खाली रस्त्यावर आला. समोर मृतवत पडलेली कोहिनूर मिलची गिरण होती. रस्त्यावर असलेल्या सिनेमागृहात 'मुगले आझम' लागला होता. तिकिटांकरता मोठीच्या मोठी रांग होती. पुढे पाव–भजी–भेळ वगैरेच्या हातगाड्या होत्या.

श्याम आता मोठ्या रस्त्यावर आला. त्याच्या मागे–पुढे सभेला आलेली तरुण मंडळी होती मोठ्या रस्त्यावर बसेस, ट्रक्स्‌–मोटारींची मोठी रांग होती. श्याम ती रांग जाईपर्यंत थांबला तशी ती दलित मंडळीपण थांबली.

'आपल्यासारख्या वयस्क ब्राह्मणांचा व ह्या दलित–तरुणाचा आता एकच प्रश्न आहे, तो म्हणजे हा रस्ता लवकरात लवकर ओलांडावयाचा कसा ?' □


वैराण मुलुखाचे
सुजलाम्‌ सुफलाम्‌ भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०

## रंगभूमी

२

# ती पाहताच बाला

## एक रंगतदार फार्स

'रंगधारा' या नाट्यसंस्थेतर्फे राजा पारगावकर लिखित आणि रवींद्र दिवेकर दिग्दर्शित 'ती पाहताच बाला' हा फार्स नुकताच रंगभूमीवर आला.

बेबी ( नयना आपटे ) आणि पप्पू ( विजय साळवी ) या दोघांनी बँकेवर दरोडा घालून लांबवलेले पाच लाख रुपये बॅगांच्या अदलाबदलीमुळे बच्चू देशमुख ( किशोर प्रधान ) नावाच्या तरुणाच्या हाती पडतात. त्यानंतर बच्चू आणि त्याचा बावळट दोस्त विनय ( लवेश पितळे ) यांची ते पाच लाख हडप करण्यासाठी चाललेली धडपड, त्यांच्या हातून ते पैसे मिळविण्यासाठी बेबी आणि पप्पूची चाललेली तडफड आणि या पाच लाखांच्या चोरीचा शोध घेण्याच्या इरादाने या सगळ्यांच्याच मागे हात धुऊन लागलेला इन्स्पेक्टर डी. डी. तुंगारे ऊर्फ डी. डी. टी. ( रवींद्र दिवेकर ) या साऱ्यांनी मिळून रंगवलेला एक धमाल प्रकार आपल्यापुढे घडत आणि उलगडत जातो.

फार्स या प्रकाराची नस लेखक राजा पारगावकर यांना बऱ्याच प्रमाणात कळली आहे. त्यामुळे एकात एक गुंतणाऱ्या आणि हे गुंतणे सोडवतानाच नवीन जन्मणाऱ्या अनेक गमतीदार घटना त्यांनी या फार्समध्ये घेतल्या आहेत. काही घटनांवर पुनरुक्तीचा किंवा उचलेगिरीचा आरोप करता येईल; पण त्या गमतीदार आहेत हे नाकारता येणार नाही. एक गोष्ट मात्र आवर्जून नमूद करावीशी वाटते. फार्स या प्रकारात घटनांची गुंतवळ जितक्या फटकन सोडवता येईल, तितकी फार्सची रंगत वाढते, खुलते. तिसऱ्या अंकात कथेतील सगळा घोळ निस्तरताना पारगावकरांना हा पसरटपणा टाळता आला नाही; त्यामुळे फार्सचा शेवट प्रेक्षकांच्या नजरेच्या टप्प्यात तर आला आहे; पण रंगमंचावर घडत तर नाही अशी काहीशी चमत्कारिक अवस्था होते.

बारीक – सारीक गोष्टींमधून विनोदाचा वापर करून पारगावकरांनी बहुतेक प्रसंग रंगवले आहेत. उदाहरणार्थ–इन्स्पेक्टरचे पिस्तुल ताब्यात घेतल्यानंतर ते सगळ्यांवर रोखून पप्पू सगळ्यांना धमकावतो, 'कोणी जागचे हलू नका, नाही तर या पिस्तुलानं एकेकाच्या थोबाडीत मारीन !' लेखक पारगावकरांप्रमाणेच रवींद्र दिवेकरांसारखा फार्समधील अनुभवीआणि दर्दी दिग्दर्शक या फार्सला भेटला. पात्रांच्या हालचालींपासून प्रत्येक प्रसंगातील फार्सिकल प्रवाह दिवेकरांनी सतत वाहता ठेवला. सर्व पुरुषपात्रांनीही दिवेकरांना मस्त साथ दिली आहे. विशेषत: किशोर प्रधानचा बच्चू हा अपेक्षित वयापेक्षा बराच मोठा वाटत होता. एवढा एकमेव भाग सोडल्यास किशोर प्रधान हा जन्मत: एखादा फार्स घेऊनच आला असावा, इतके धमाल काम करतो. शशिकांत निकते, लवेश पितळे, रवींद्र दिवेकर, विजय साळवी इत्यादी साऱ्यांनीच बहुतेक प्रसंग प्रेक्षकांची भरपूर दाद घेण्याइतके चांगले रंगवले. अपवाद फक्त स्त्रीकलाकारांचा. नयना आपटे आणि बच्चूची बहीण रज्जू झालेल्या नवतारका चारुलताने मात्र या फार्सचा पतंग शक्य तेव्हा खाली आणायचा प्रयत्न चालवला होता. रंगमंचावरील विनोदांना नको तेव्हा प्रेक्षकांबरोबर स्वत:ही हसणे इतपत चारुलताने स्वत:चे नवतारकापण जपले होते.

बऱ्याच दिवसांनी एक बरा रंगतदार मराठी फार्स पाहिल्याचे समाधान 'ती पाहताच बाला' ने मिळाले.

– डॉ. सदानंद बोरसे

# उघडले स्वर्गाचे दार

## बाळ कोल्हटकरांनी ट्रॅक बदलला

'दुरितांचे तिमिर जावो, वाहतो ही दूर्वांची जुडी, 'देणाऱ्याचे हात हजार' इत्यादी, कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकांमुळे बाळ कोल्हटकरांना तमाम नाट्यप्रेमी जनता चांगल्या प्रकारे ओळखते.

बाळ कोल्हटकरांच्या या नव्या नाटकाच्या शुभारंभाचा प्रयोग मुंबईत खा. यशवंतराव चव्हाणांच्या उपस्थितीत झाला. त्या वेळी खा. यशवंतराव चव्हाण म्हणाले, असे महर्षी आज आमच्या पाठीशी असावयास हवे होते. त्यावर मार्मिकमध्ये एका झकास व्यंगचित्रात यशवंतराव कॉंग्रेस (आय)च्या दारात बसल्याचे दृश्य बाळासाहेबांनी रेखाटले होते व वर म्हटले होते, 'उघडले स्वर्गाचे दार' असो. हा गमतीचा भाग आम्हाला जाताजाता आठवला.

पुण्यातील या शुभारंभाच्या प्रयोगाच्या वेळी, या नाटकाबाबत बोलताना बाळ कोल्हटकर म्हणाले, 'विश्वामित्राचे कॅरेक्टर फार दिवसांपासून माझ्या मनात घर करून होते. त्यानंतर विश्वामित्राच्या जीवनावर आधारित जितेंद्रिय नावाची कादंबरी माझ्या वाचनात आली आणि त्यातून ह्या नाटकाचा जन्म झाला.

'उघडले स्वर्गाचे दार' या नाटकाच्या निमित्ताने बाळ कोल्हटकर कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकाकडून वेगळ्या साच्यातील वेगळ्या कथावस्तूवर बेतलेल्या नाटकांकडे वळले. त्यांचे हे वेगळेपण आजच्या रंगभूमीवरील नाटकांकडे पहाता निश्चित स्वागतार्ह आहे यात वाद नाही.

ब्रह्मर्षी वसिष्ठ आणि महर्षी विश्वामित्र या दोन पौराणिक व्यक्तिरेखांतील संघर्षाबरोबरच आजचे ज्ञान-विज्ञान यांच्यातील संघर्षाचा झगडा रेखाटण्यात कोल्हटकर यशस्वी झाले आहेत.

विज्ञानाच्या जोरावर चाललेली जागतिक राजकारणातील महाभयंकर शस्त्रास्त्रस्पर्धा आणि त्यांचे मानवजातीवर होणारे भयावह

दुष्परिणाम– पण त्याच विज्ञानाचा उपयोग जर विधायक कामासाठी केला तर या जगात पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होईल, हेही या नाटकाच्या निमित्ताने कोल्हटकर सागतात.

आज जगामध्ये जे प्रगत विज्ञान, शस्त्रअस्त्रे अस्तित्वात आहेत ती आम्हा भारतीयांना नवीन नाही. आज जे नवनवीन उपग्रह संशोधनासाठी अंतराळात पाठविले जातात त्याच्या ज्ञानाचे विज्ञानाचे आपण कौतुक करतो; पण विज्ञानाच्या जोरावर अस्त्रावर आमच्या विश्वामित्राने निर्माण केलेला चंद्र हाही उपग्रहच आहे. हे विज्ञान मूळ आमचं आहे. हाही पदर या नाटकात कोल्हटकर उलगडून दाखवितात.

शस्त्रबळावर सारी पृथ्वी पादाक्रांत करून स्वर्गाचे दिशेने वाटचाल करणारा, क्षत्रियश्रेष्ठ विश्वामित्र, ब्रह्मर्षी वसिष्ठाच्या आश्रमात येतात. आपल्या ज्ञानाच्या जोरावर वसिष्ठानी, आपल्या आश्रमात निर्माण केलेल्या स्वर्गाचं दर्शन विश्वामित्राला घडल्यानंतर वसिष्ठ आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे या जाणीवेने विश्वामित्र व्यथित होतो. शस्त्रसामर्थ्यावर स्वतःच्या पराक्रमावर आपण ते जिंकू अशी उर्मट भाषाही तो वसिष्ठांना ऐकवून आव्हान देतो. या सगळ्याचं मूळ ' कामधेनु नंदिनी ' आहे हे लक्षात आल्यावर नंदिनीविषयी अभिलाषा मनात बाळगून, विश्वामित्र तिचे हरण करू पहातात; पण कामधेनुकन्या नंदिनीच्या किमयेने निर्माण झालेले सैन्य विश्वामित्राचा पराभव करते.

या घटनेने विश्वामित्र पार बदलून जातात. आपण केवळ ब्रह्मर्षी नाही म्हणून आपल्याला नंदिनी मिळू शकत नाही या जाणिवेने, सूडाने पेटून उठून वैराग्य पत्करून ते तपाला बसतात.

विश्वामित्राच्या घोर तपश्चर्येने, त्याना सरस्वती प्रसन्न होते व त्यांच्या मुखातून गायत्रीमंत्र बाहेर पडतो. विश्वामित्र महर्षी बनतात; पण ब्रह्मर्षी होऊ शकत नाहीत. ब्रह्मर्षीपद मिळविण्यासाठी विश्वामित्र पुन्हा घोर तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न करून घेतात व त्यांच्याकडून सर्व शस्त्र अस्त्र विज्ञान मिळवितात. या शस्त्र व विज्ञानाच्या जोरावर स्वर्ग जिंकण्याची इच्छा बाळगतात. जोपर्यंत वसिष्ठ जिवंत आहे तोपर्यंत देवाच्या गुरूचे ब्रह्मर्षिपद आपल्याला मिळू शकत नाही, या जाणिवेने व्यथित झालेले व सूडाने पेटून उठलेले विश्वामित्र वसिष्ठाच्या रोखाने ब्रह्मास्त्र सोडण्याचा निश्चय करतात. त्याला प्रत्युत्तर म्हणून ब्रह्मर्षी वसिष्ठ, ब्रह्मदंडाचा वापर करण्याचे ठरवितात. या संघर्षाच्या प्रसंगी ब्रह्मदेव विश्वामित्रास तू पराभूत आहेस तुझ्या या ब्रह्मास्त्राचा उपयोग होणार नाही असे स्पष्ट सांगतात.

विश्वामित्र परत तपश्चर्येला बसतात. त्यांची उग्र तपश्चर्या भंग करण्यासाठी मेनका येते. ते हताश होतात. त्यांची तपश्चर्या भंग पावते. कामधेनुकन्या नंदिनी या ना त्या निमित्ताने सतत विश्वामित्राभोवती पिंगा घालत असते. मेनकेच्या तपोभंगाच्या वेळी अखिल विश्वावर प्रेम करण्याचा सल्ला ती विश्वामित्राना देते.

आपण ब्रह्मर्षी होऊ शकत नाही या एका जाणिवेसाठीच निराश झालेले विश्वामित्र, ब्रह्मर्षी वसिष्ठाच्या डोक्यात एक मोठा पाषाण घालून त्यांचा घात करण्याचा विचार करतात, पण विश्वामित्राबद्दल आतरिक प्रेम असलेले वसिष्ठ अप्रत्यक्षणे त्याच्या ज्ञानाचे, पराक्रमाचे कौतुक करताना पाहिल्यावर, पश्चात्तापदग्ध विश्वामित्र वसिष्ठाच्या पायी लीन होतात आणि अखिल मानवजातीवर प्रेम करणारे विश्वमित्र बनतात. इथे वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यातील संघर्ष संपतो.

या नाटकाच्या निमित्ताने बाळ कोल्हटकरांच्या प्रतिभेला बहर आल्याचं निश्चितपणे जाणवतय. मूळ कथावस्तू रंगमंचाच्या मर्यादाच्या चौकटीत चपखलपणे, बसविताना कोल्हटकर कुठे कमी पडले असं वाटत नाही.

वसिष्ठ आणि विश्वामित्र याच्यातील विचारांच्या जोडीला त्यानी ज्ञान आणि विज्ञान या दोन उपपात्राची योजना केलीय. त्यापैकी–ज्ञान हे पात्र वसिष्ठांचं प्रतिनिधित्व करतं तर विज्ञान विश्वामित्राचं रूप घेऊन वावरतं; पण या संघर्षात – विज्ञान आणि ज्ञानाचा जो एकमेकात कायापालट होतो तोही, अत्यंत सुदर आकर्षक रूपात कोल्हटकरानी माडलाय. या सर्वांच्या जोडीला उल्लेख करायला पाहिजे तो नंदिनीच्या पात्राचा. नाटकाच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत ही नदिनी काव्याच्या (लिरिक) रूपातच बोलते. जळी स्थळी, काष्ठी, सर्व लोकी मना – मनातून पिंगा घालणाऱ्या या अल्लड कामधेनूच्या कन्येचं नंदिनीचं, हे रूप पाहताना आपल्याला थक्क व्हावयाला होतं.

विश्वामित्राची अनेक रूपं – जगज्जेता विश्वामित्र ते महर्षी ब्रह्मर्षी विश्वामित्र या सर्व छटा रमेश भाटकराने अतिशय जिद्दीने उभ्या केल्यात, तर ज्ञानी ब्रह्मर्षी वसिष्ठाची संयत भूमिका सदाशिव कान्हेरे यांनी आपल्या अभिनयाने जिवंत केली. वसिष्ठाचा विनम्रभाव, ज्ञानाने जोपासलेली विचाराची परिपक्व मानसिक अवस्था, विवेक या सर्व स्वभावछटाचा संगम आपल्या शब्दातून, शारीरिक हालचालीतून, अभिनयातून व्यक्त करताना ते कुठेही कमी पडले नाहीत. अर्चना जोगळेकरांच्या नंदिनीने तर नाटकात जान आणली. सर्व लोकी, विहार करणारी अल्लड नंदिनी, लीलया उभी केली. या सर्वांच्या जोडीला, दिलीप कोल्हटकरांचे दिग्दर्शन आणि अनंत अमेबलांचे पार्श्वसंगीत याचाही उल्लेख करणे क्रमप्राप्तच आहे.

फार दिवसांनी एक चांगलं नाटक पहाण्याचं समाधान या नाटकाच्या निमित्ताने रसिकाना मिळणार आहे.

–चारुदत्त बागुल


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य वहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# ‘चाहूल’च्या निमित्ताने

## त्यांचा विश्वास भाबडा की खरा ?

रजिया पटेल या मुस्लिम तरुणीचे नाव अलिकडेच गाजले, ते जळगावला तिने दाखवलेल्या बहादुरीने मुस्लिम स्त्रियानी चित्रपट पहाण्यावर मुस्लिम पुनरुत्थानवाल्यांनी बंदी घातली. कारण ? चित्रपट बघून स्त्रियांची नीतिमत्ता बिघडते म्हणून. या आदेशाकडे दुर्लक्ष करून एका तरुण जोडप्याने चित्रपटाला जाण्याचे धारिष्टय केले. पण त्याबद्दल त्यांना शारीरिक दंड सोसावा लागला. आणि हे सगळं माहीत असूनही रजिया पटेलनं आवाज उठवला. चित्रपट पहावा की नाही हा प्रश्न महत्त्वाचा नसून, चित्रपट पहाण्यासारख्या तुलनेनं निरुपद्रवी करमणुकीपासून, मुस्लिम स्त्रियांना दूर ठेवण्याचा निर्णय एकतर्फीच हट्टाग्रहाने घेण्यात आला होता, तो योग्य होता का ? रजियानं या आदेशाला गुडाळून ठेवून चित्रपटाला सामूहिक रीतीनं जाण्याचा निर्णय जाहीर केला. जळगावमधल्या दोनशे मुस्लीम स्त्रिया तिच्या बरोबर चित्रपटाला जायला तयार झाल्या. अर्थातच हा निर्णय अगोदरच जाहीर केला गेल्यामुळे, त्यांना हरतऱ्हेच्या धमक्या दिल्या गेल्या. बऱ्याच बायकांचा धीर सुटला तरी पण चाळीस स्त्रिया रजिया बरोबर उघडपणाने चित्रपटाला जाऊन आल्या. हा राजियाचा आणि पर्यायाने आधुनिक दृष्टीकोण ठेवणाऱ्या मुस्लिमाचा फार मोठा विजय होता.

हल्ली चित्रपटांना जाणं ही एवढी मामुली गोष्ट झाली आहे की त्यासाठी हा एवढा गोंधळ का ? त्याबद्दल समाजातून वाळीत टाकलं जाण्याची धास्ती असते ? त्यासाठी शारीरिक दंड सोसावा लागतो ? त्यासाठी लढा द्यावा लागतो ?– हे सगळं समजणं सर्वसाधारण माणसाला फार कठीण जातं त्याची कारणंच त्याला आकलन होत नाहीत फारसं खोलवर जाऊन त्याची चर्चा करण्याचं धारिष्टयही दिसत नाही.

हे धारिष्टय रजियानं दाखवलं. ही रजिया अशी घडली कशी ते पहाणं उद्‌बोधक ठरेल. जानेवारी १९८० पासून जळगावचा तो ऐतिहासिक प्रसंग या दरम्यानच्या काळात रजियाने श्री. यदुनाथ थत्ते यांना काही पत्रं लिहिली. ती १६–१७ पत्रं ‘साधना प्रकाशनाने’ प्रकाशित केली आहेत त्या पुस्तकाचं नाव आहे ‘चाहूल’ या पुस्तकाची पृष्ठसंख्या फक्त ४८ आहे. त्यापैकी रजियाची पत्रे फक्त ३७–३८ पानंच भरतील. पण ही छोटी छोटी पत्रं निव्वळ पत्र नाहीत, तर असीम व्याकुळपणा अदम्य आत्मविश्वास, अन्यायाबद्दलच्या पराकोटीच्या संतापाची धग आणि बंडखोरपणा यांचं एक तेजस्वी मिश्रणच आहे.

जळगावजवळच्या एका खेडेगावातल्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबातल्या एका शाळामास्तराची ही मुलगी. सर्वसाधारणपणे अशा कुटुंबातल्या मुलीच्या वाटयाला आलेले सुखदुःखांचे भोग रजियाच्याही वाटयाला येतात. पण रजिया एका मुस्लिम समाजातल्या मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबातली मुलगी. तेव्हा तिच्या वाटयाला काही विशेष कर्मभोग आलेच. मॅट्रिक झाल्यावर शिक्षण बंद. तिच्या वडिलाची तिला पुढे शिकवायची ऐपत आहे की नाही या प्रश्नाला इथे काहीही महत्त्व नाही. ती मुस्लिम आहे हे एकच कारण पुरेसं आहे. याच वेळी रजियाला पहिली ठेच लागते. वडिलांचा पेशा शिक्षकाचा आणि शिवाय समाजवादी विचारसरणीशी बांधिलकी मानणारे. त्यांना रजियाच्या जिवाची तडफड समजू शकते. पण मुस्लिमसमाजाचं दडपण आणि कौटुंबिक तणावांमुळे खेडेगावातल्या रहिम गुरुजीना गप्प बसावे लागते.

रजियानं एके ठिकाणी लिहिलंय, आमची मुस्लीम स्त्रियांची स्थिती पाहून वाटू लागतं आपल्याला काहीच करता येणार नाही ? आपण का अशाच संपणार आहोत ? काही करावसं वाटलं की प्रकर्षानं जाणीव होते, आपल्या असहाय्यतेची. धिटेपणाची आम्ही इतक्या अंधारात आहोत की प्रकाशाचे किरण आमच्यापर्यंत पोचत नाहीत, काही करू म्हटलं तर आमच्या समाजात स्त्रियांना स्वतःच्या भावना इच्छा, मनं नसतात असं ठरलेलं. एकही गोष्ट आपल्या इच्छेनुसार करण्याची आम्हाला मुभा नसते. एखादीनं केलाच बंडखोरपणा तर ते बंड दडपण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न ठरलेले आणि वर समाजातल्या लोकांच्या जळजळीत नजरा ! (पृष्ठ–१३)

संपूर्ण स्त्रीजातीलाच ह्या तऱ्हेचा कोडलेपणा, गुदमरलेपणा सहन करावा लागतो. परंतु मुस्लिम स्त्रियांची स्थिती त्याहूनही वाईट. कारण त्याला धर्माचं अधिष्ठान आहे त्याविरुद्ध तक्रार करायचीच नाही रजियाचं शिक्षण तर बंद झालंच. पण या अस्वस्थ मुलीला स्वस्थ बसवेना. तिनं अवतीभोवतीच्या निरक्षर पोरींना जमवून त्यांना ग, म, भ, न शिकवायला सुरुवात केली. तेव्हा तिच्या घरच्या लोकांनी तिला प्रेमाचा सल्ला दिला, ‘बाई ग काम नसलं तर पांघरूण घेऊन झोप. रिकामे चाळे कशाला करतेस ? (पृष्ठ १५) तरी पण तिचे हे चाळे कमी होत नाहीत. यदुनाथकाकांना पत्रं लिहून ही आपली अस्वस्थता कळवते, (ते पत्र साधनेत प्रसिद्ध झाल्यावर केवढं वादळ उठतं ! शिबिराला जाते. घरच्यांशी वाद घालते. आईला ती एकदा म्हणते ज्या वेळी मुहंमद पैगंबरांनी त्या वेळच्या समाजात बदल करायचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनाही लोकांनी दगड आणि शिव्याशाप दिलेत पैगंबरांनी केली का त्याची पर्वा ? मग तुम्ही लोकांच्या बोलण्याला एवढे का भिता ? त्यांना लोकांनी हट्टी, माथेफिरू म्हटलं, पण त्यांनी ते सहन केलं. तुम्ही पैगंबरांवर श्रद्धा ठेवता, पण त्यांनी विधवेशी विवाह केला होता, त्यांनी अनिष्ट रूढी, प्रथा दूर करण्यासाठी प्रयत्न केला होता, हे सोयीस्करपणे का विसरता ? (पृष्ठ २३)

### वो स्वतंत्रता हमे नही !

रजियाची ही वाक्यं अत्यंत मर्मभेदी आहेत. पैगंबरांनी तत्कालीन अनिष्ट रूढी,

प्रथा याच्याविरुद्ध बंडखोरी केली. तत्कालीन बेजबाबदार आणि विस्कळित समाजाला एका समान सूत्रात गोवून, विशिष्ट वळण लावून त्याला मार्गी लावले. या गोष्टीला आता तेराशे वर्षं झाली. आज जर कोणी इतक्या जुन्या इस्लामचा नव्या संदर्भात विचार करू लागला तर त्याची धडगत रहात नाही! 'माझ्यानंतर कोणीही प्रेषित होणार नाही. मी सागितलेले कायदे हे परमेश्वराचे शब्द असल्यामुळे ते अंतिम आहेत. त्यात बदल होणार नाही!' अस एकदा महंमदाने सागून ठेवल्यामुळे, साचलेल्या पाण्यावर शेवाळ वाढावं तशी या समाजाची स्थिती झाली.

त्याबाबतीत रजिया म्हणते, 'इस जीवन मे चुनने की स्वतंत्रता हमे है नही। सब विकल्प हमपर लादे और थोपे गये हैं, हम वह कर नही सकते जो करना चाहते है। हमारा निर्णय कितनाही योग्य क्यों न हो। हमारी यह हालत दरअसल पिंजडे मे बद उस पंछी की तरह है जिसे बाग मे किसी पेड की डालपर लटकाकर छोड दिया गया हो, ताकि वह खुद को आजाद समझने की खुशफहमी पाल सके!' (पृष्ठ ३५)

पैगंबराच्या जीवनाचे दाखले देणारी रजिया अश्वत्थाम्याच्या भळाळत्या जखमेचे आणि सूतपुत्राच्या व्यथेचेही दाखले देतेय. कारण अश्वत्थाम्याची सतत भगभगणारी जखम आणि सूतपुत्राच्या व्यथेचं दु ख तिला अनुभवाने कळून चुकलंय. म्हणून ती शेवटी परमेश्वराकडे दुःख मागतेय.. टीचभर हृदयाचे, ओंजळभर प्रीतीचे दु ख तिला नकोय. तिला दु ख हवंय ते हिमनगास वाकवून पुण्यमयी भागीरथीसारखं धावत येईल आणि कोटयवधी सगरसुतांना सजीवन देईल, असलं प्रचड दु ख, परमेश्वराच्या करुणामय हास्यासारखं दु ख ती मागतेय. (पृष्ठ ४२)

पुस्तकाच्या दुकानात पुस्तकं चाळताचाळता हाती आलेलं हे इटुकलं पुस्तक उभ्याउभ्याच वाचून संपवलं आणि त्यानं मला झपाटून टाकलं. या पुस्तकावर मुस्लिम समाजातील कोणकोणत्या थरातील लोकाच्या काय काय प्रतिक्रिया झाल्या ते काही मला कळलेल नाही. (खरं म्हणजे पुस्तक उर्दूमध्ये प्रकाशित व्हायला हवं) मला मात्र वेगवेगळ्या मुलिस्म देशातल्या असंख्य स्त्रिया आठवल्या. त्यांची दुःखंही अशीच आहेत, हीच आहेत. कदाचित याहीपेक्षा तीव्र! कारण भारतामध्ये निधर्मी लोकशाही असल्यामुळे रजियाला शासनाकडून तरी काहीही त्रास व्हायचा नाही; पण इतर मुस्लिम देशांतून त्याचीही खात्री देता येत नाही.

गेल्या ५–७ वर्षांमध्ये यू. नो. युनेस्को, फोर्डफौंडेशन आणि अमेरिकेतील धनाढ्य विद्यापीठे, इतर मातबर सस्था यानी लाखो रुपये खर्च करून मुस्लिमदेशांत हिंडून तिथल्या स्त्रियांशी प्रत्यक्ष बोलून अनेक अहवाल, निबंध, पुस्तकं प्रसिद्ध केली आहेत. या साहित्यावरून आपल्याला जगातल्या सगळ्या मुस्लिमदेशांतील आणि गैर मुस्लिमदेशातील मुस्लिमसमाजाच्या स्त्रियाची रहाणी, त्याचे मनोव्यापार, त्यांच्या आशा–आकाक्षा कळतात. त्यातून निष्कर्ष निघतो की, या देशातील मुस्लिम स्त्रियांना समाजाने कसलेही अधिकार दिलेले नाहीत. पुरुषप्रधान समाजाची खुशमस्करी करायची, कुटुबाची जबाबदारी उचलण्यासाठी अतोनात कष्ट करायचे, त्याशिवाय कष्ट करून पैसा मिळवून आर्थिक जबाबदारीही पार पाडायची आणि इतक करूनही तिला कसलेही अधिकार, हक्क मिळत नाहीत. स्त्री म्हणून हेटाळणीच पदरात पडते. अर्थात काही देशानी कमी–जास्त प्रमाणात स्त्रियांच्या संदर्भात नवे कायदे केले; पण त्याचा प्रत्यक्ष फायदा क्वचितच कुणाला होतो. शिवाय 'कायदे करता काय? मग घ्या सगळं कोर्टात जाऊन!' ही वृत्ती समाजात आढळते. अशिक्षित, अर्धशिक्षित, खेडेगावातून रहाणाऱ्या बहुसंख्य स्त्रियाना त्या कायद्याबद्दल माहिती नसते, की ते कसे राबवून घ्यायचे हेही कळत नाही. म्हणून स्त्रिया म्हणतात, 'आम्हाला कायदे नकोत. त्यानी काही फरक पडत नाही. उलट ते आम्हाला जाचकच होतात. त्यापेक्षा आम्हाला फक्त शिकू द्या. वेगवेगळ्या तऱ्हेच शिक्षण आम्हाला मिळू दे. त्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढेल आणि आम्ही आमच्या मुलांना, मुलीना वेगवेगळ्या तऱ्हेनं शिकवून तयार करू शकू!' किती साधी मागणी आहे ही स्त्रियाची!

तर काही स्त्रियाचं म्हणणं आहे की, कायदे झाल्याशिवाय आम्हाला आमचे हक्कअधिकार मिळायचे नाहीत. नवे कायदे कसे राबवून घ्यायचे हे आज तरी बहुसंख्य स्त्रियांना कळत नसलं तरी उद्या कळेल.

### काटे उलटेच फिरणार?

या देशातील स्त्रियाचे उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. ज्या स्त्रिया सुशिक्षित आहेत, त्याच्यामध्येही नेतेपणाची जबाबदारी, कर्तव्ये स्वीकारण्याची क्षमता अभावानेच आढळते. काही मूठभर बायकाना ती जाण आहे; पण त्याच्यामध्ये गोंधळलेपणा आहे. बंडखोरपणा करणं त्याना परवडत नाही. कारण सामाजिक रीतिरिवाज, रूढी याच्या विरुद्ध जाण्याची हिम्मत त्याना होत नाही. अशा स्त्रिया मग आतरराष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेतात, सरकारी कमिटयांवर नेमल्या जातात आणि स्त्रियाची स्थिती सुधारेल असे कायदे करावेत की नाहीत? केले तर प्रस्थापिताना कमीत कमी दुखवून कसे करता येतील? याबद्दल चर्चा केल्या जातात. खेडेगावात रहाणाऱ्या अर्धशिक्षित, अशिक्षित स्त्रियाना वाटत, याचा आम्हाला काय उपयोग? कायदे करून मानवी वागणुकीचे प्रश्न सुटतील का? तुमचे ते कायदे रहतात राजधानीच्या शहरापुरते आम्ही खेडेगावात रहातो, राबतो, पुरुषी वर्चस्वाखाली, सामाजिक रूढीखाली दबून जात असतो. ते कायदे आमच्यापर्यंत पोचतच नाहीत!

अफगाणिस्तानात युनिसेफतर्फे तिथल्या खेडेगावातून 'इंटिग्रेशन ऑफ वुमेन इन डेव्हलपमेंट प्रोसेस अॅन्ड इटस् इम्पॅक्ट ऑन द वेलबिइंग ऑफ चिल्ड्रेन' असं लाबलचक नाव असलेला छोटासा अहवाल २–३ वर्षीपूर्वी तयार होत होता तेव्हा त्याच्या कार्यकर्त्यांशी, अफगाण स्त्रियाशी बोलण्याची संधी मिळाली होती. त्या बायका म्हणत, 'तुम्ही आम्हाला लहान मुलांच्या दुधाच्या बाटल्या कशा उकळून घ्याव्या, मुलाना आणि अगावर दूध पिणाऱ्या आयाना समतोल, सकस आहार कोणता, कसा द्यावा, मुलाचे कपडे कसे स्वच्छ ठेवावेत, लस टोचण, औषधं, दात येणं . वगैरे वगैरे सागता; पण आम्हाला तर इथे अंगभर वस्त्र, डोक्यावर छप्पर आणि पोटभर अन्न कसे मिळेल याची काळजी सतत लागून राहिलेली असते. (नवरा कधी घटस्फोट देईल याची सतत काळजी!) तेव्हा या गोष्टी शिकवण्यापेक्षा नवऱ्याला कसलाही संशय न येता मुल कशी होऊ द्यायची नाहीत ते शिकवा. स्वतःच्या पायांवर कस उभं रहायचं ते शिकवा!'

इराणमध्ये शहाच्या कारकीर्दीत आधुनिकतेचं वारं वाहू लागलं; पण ही आधुनिकता म्हणजे एखाद्या कुरूप बाईला भडक रंगरंगोटी करून सुंदर बनवण्याचा प्रकार होता. शहाने स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला, वैद्यकीय मदत देऊ केली, वारसाहक्क, इस्टेटीचे अधिकार यासंबंधात स्त्रियांच्या बाजूने कायदेकानू केले; पण त्यामुळे प्रत्यक्षात फायदा फारसा झाला नाही,की त्याबाबतीतल्या जाणिवाही वाढल्या नाहीत. फक्त शहाच्या परिवारातल्या, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या, श्रीमंत लोकांच्या बायका–मुली अमेरिकन जीन्स घालू लागल्या, क्लब्जला जाऊ लागल्या, सिगरेटी ओढू लागल्या. त्यामुळे तर इराणी जनमानसात स्त्रियाबद्दल प्रतिष्ठेची भावना वाढण्याऐवजी काळवंडलीच. म्हणूनच खोमेनीने जेव्हा स्त्रियांना संपूर्णपणे बुरख्यात परत पाठवले, तेव्हा बहुसंख्य स्त्रियानासुद्धा त्याचे सुरुवातीला तरी फारसे वाईट वाटले नाही. ज्या दिवशी खोमेनी फ्रान्सहून तेहरानला आला त्याच दिवशी गीगोश नावाची अत्यंत ख्यातनाम, लोकांची लाडकी गायिका रातोरात आपली लाखो रुपयांची संपत्ती सोडून, इराण सोडून गेली! कारण तेहरानला येण्यापूर्वीच खोमेनीने जाहीर केले होते की, त्याच्या इस्लामी राजवटीमध्ये नाचगाणी, कसल्याही तऱ्हेचं मनोरंजन आणि उजळ माथ्यानं पुरुषांच्या बरोबरीने वागणाऱ्या स्त्रियांना स्थान नाही!

सौदीअरेबियाचे उदाहरण मात्र उजवे आहे. तिथे कुराणाच्या आज्ञा, कायदे तंतोतत पाळले जातात. त्यानुसार स्त्रियांना वारसाहक्क इस्टेटीचे अधिकार मिळाले आणि तेलाचा पैसा भरमसाठ वाढल्यावर अरबी स्त्रियांनाही त्या पैशामध्ये वाव मिळाला आणि मुख्य म्हणजे त्या पैशाची गुंतवणूक, विनियोग कसा करायचा हे ठरवण्याचं स्वातंत्र्यही मिळालं हे विशेष. म्हणूनच आज तिथे स्त्रियांसाठी, स्त्रियांकरता, स्त्रियांनी चालविलेल्या बॅंका आहेत. अर्थातच ही सोय तळागाळापर्यंत पोचलेली नाही. तरी पण त्या दिशेनं वाटचाल सुरू झाली आहे हे निश्चित.

पाकिस्तानात इतर इस्लामी कायदेकानू आले. त्याबरोबरच स्त्रियांचे शिक्षण, मनोरंजन, खेळ, आर्थिक स्वावलंबन, नागरी अधिकार, हक्क यांवर निर्बंध आले. व्यभिचाराच्या आरोपाबद्दल एका बाईला फटके मारून तुरुंगात टाकण्यात आलं!

हे सगळे अनुभव बघितले की, रजियाचे शब्द आठवतात, 'हमे चुननेकी स्वतत्रता नही है...' 'आम्ही इतक्या अंधारात आहोत की प्रकाशाचे किरण आमच्यापर्यंत पोचतच नाहीत. काही करू म्हटलं तर आमच्या समाजात स्त्रियांना स्वतःच्या भावना, इच्छा मनं नसतात असं ठरलेलं!'.

तुर्कस्थान फक्त याला अपवाद होता. चाळीस–पन्नास वर्षांपूर्वी तुर्कस्तानच्या कमलपाशाने मुस्लिम स्त्रियांना बुरख्याच्या अंधारातूनच फक्त काढलं नाही तर उजेडाच्या खुल्या, मोकळ्या हवेत त्याना शारीरिक व्यायाम करायला लावून निरोगी बनवलं. मुलाच्या बरोबरीनं आधुनिक शिक्षणाची दारं उघडून त्याना जगाच्या ज्ञानाची भाडारं खुली केली. माणूस म्हणून जगण्याचा त्याचा हक्क मान्य केला; पण आता खोमेनीच्या उदयानंतर तुर्कस्तानमध्येही घड्याळाचे काटे उलटे फिरायला लागल्याची चिन्हं दिसू लागली आहेत.

## ते हिंदुस्थानातच होईल

व्यक्ती किंवा समाज जेव्हा आत्यंतिक दारिद्र्यात खितपत असतो तिथे बुद्धिमांद्य आलेल असत अशा वेळी स्वातंत्र्य, समता वगैरे गोष्टी पोकळ असतात. प्रश्न असतो तो फक्त पोटाची खळगी कशी भरायची ह्याचा; पण ह्या प्रश्न एकदा समाधानकारकपणे सुटला की, मग स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या गोष्टीचा विचार करायलाच हवा. तशी अपेक्षा ठेवणं रास्तच ठरते. म्हणूनच इंधन तेलासाठी जगातल्या–पैशाचा ओघ जेव्हा मध्यपूर्वेकडे सुरू झाला, तेव्हा असं वाटल होतं की, तुर्कस्तानचा कित्ता हे देश गिरवतील आणि मध्ययुगात असलेला हा प्रदेश आधुनिक युगात प्रवेश करेल; पण दुर्दैवानं तसं काही झालं नाही. तसा नेटाचा प्रयत्नही झाला नाही. फरक एवढाच पडला की, पूर्वी उंट, गाढव, खेचरावरून प्रवास करणारे लोक आता लांबलचक गाड्यांतून, जेट विमानातून प्रवास करू लागले. पूर्वी जाड्याभरड्या कापडाचा बुरखा घालणाऱ्या बायका आता पॉलिएस्टरच्या कापडाचे बुरखे घालू लागल्या. मूळ वृत्तीमध्ये फरक पडला नाही.

याचं कारण, राजकीय, सामाजिक आहे की धार्मिक?

समाजपरिवर्तनाची ऊर्मीच इथल्या समाजात, राज्यकर्त्यांत नाही की, हा समाज धार्मिक चौकट मोडू शकत नाही? थोडासा विचार केला की, आपल्या लक्षात येतं की, सत्ताधाऱ्यांना सोयीचे आहे म्हणून ही धार्मिक चौकट मोडली जात नाही. म्हणजेच मूळ कारण राजकीयच आहे, धार्मिक नाही. राजसत्ता आणि धर्मसत्ता ज्यांच्या हातात एकवटलेली असते, ते संगनमत करून सर्वसामान्यांना लुबाडतात. हा तर ऐतिहासिक सिद्धांतच आहे; पण वेळोवेळी त्यांच्याशी टक्कर घेऊन–समाजाचे जीवन सुसह्य करण्यासाठी झगडणारे महात्मे इतर धर्मांत झाले, होत आहेत; पण मुस्लिमामध्ये मात्र असा महात्मा, असा समाजसेवक अभावानेच का आढळतो? एखादा राजा राममोहन रॉय, फुले, आगरकर मुस्लीमांमध्ये का निर्माण होत नाही? हमीद दलवाईची परंपरा खंडित होणार का?

हे असं का होतं, याचा खोलवर जाऊन विचार करायला हवा आहे त्यांची मीमांसा व्हायला हवी. भारतामध्ये तर मुस्लिमसमाजासंबंधीचे गुन्हेगारी कायदे, नागरी कायदे, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती या संबधात सर्वसाधारणपणे लोक उदासीन तरी आहेत किंवा मनात पूर्वग्रह धरूनच बोलतात. त्याचं कारण म्हणजे त्याबाबतीत ढवळाढवळ तर जाऊच दे; पण कसल्या सूचना करणंही नामंजूर आहे, एकदम नामजूर आहे. इतर मुस्लिम राष्ट्रातूनही ही स्थिती थोड्याफार फरकाने अशीच आहे. परंतु इथल्या अल्पसंख्याकाना राजकारणाभुळं त्याला फार वेगळाच रंग चढतो. तुर्कस्तान, अल्बानिया आणि सोव्हिएट रशियाच्या अंमलाखालचे मध्य आशियातले मुस्लिम देश यानी मात्र कसलीही पर्वा न करता मुस्लीम कायद्यात सुधारणा करून ते नागरी कायदे केले आणि तिथल्या मुस्लीम समाजाला इतर मानवी समाजाबरोबर आणले.

मानवी समूहाचा एक हिस्सा जर तटस्थ, दूरस्थ, फटकून राहिला तर त्यामुळे इतर मानवी जीवनप्रवाहालाही खीळ पडते. इस्लामी पुनरुत्थानाची चळवळ सुरू झाल्यावर हिंदू पुनरुज्जीवन चालू झाले. युरोपमध्ये

आता ख्रिश्चन पुनरुत्थानाची भाषा बोलली जाऊ लागली आहे. 'हिंदू कोड बिल' आणल्या गेलेल्या या हिंदू समाजातल्याच काही लोकांनी अलीकडेच दिल्लीजवळपास कोणी मुलगी सती गेली (का 'दिली' गेली ?) म्हणून तिचा केवढा गौरव केला ! आम्ही विकासासाठी एकमेकांशी चुरस करणार आहोत की मागासलेपणासाठी ?


जेव्हा राजकीय, सामाजिक तत्त्वज्ञान, नेतृत्व डोळ्यांसमोर नसते तेव्हा या अशा धार्मिकतेची पकड समाजावर बसते, कर्मकांड आणि असहिष्णुता यांच्या चौकटीत समाज पक्का बसवला जातो, समाजातील वेगवेगळे घटक वेगवेगळ्या पायऱ्यांवर उभे केले जातात. स्त्रियांची पायरी सर्वांत खालची. तेव्हा त्यांच्या बाबतीतल्या जाणिवा, कायदेकानू, जबाबदाऱ्या यांना सर्वांत कमी महत्त्व. त्याबाबतीत काही करण्याची घाई, ऊर्मी वरच्या पायऱ्यांवर उभे राहिलेल्याना का वाटावी ?

इथे मला एका अफगाण मुलीची आठवण येते आहे. भारतातल्या स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, स्त्रियांचा विकास, त्यांची प्रतिष्ठा या विषयांवर तिच्याशी बोलताना ती फटकन मला म्हणाली, 'तुम्हा भारतीय स्त्रियांना खायला केक मिळाला आहे आणि त्यावर आयसिंग का नाही, म्हणून तुमची कुरकुर चालू आहे; पण आम्हाला माणूस म्हणून आमचे मूलभूत हक्कसुद्धा मिळत नाहीत, त्याचं काय ?'

ही मुलगी लहानपणापासून कविता करायची. सुरुवातीला फुलं, हिमवर्षाव, आई अशा विषयांवर तिनं कविता केल्या तेव्हा तिचं, घरीदारी कौतुक झालं; पण जराशा मोठेपणी तिनं एक प्रेमकविता केली. (इंग्रजी कादंबरीचं फारशी भाषांतर वाचून तिला स्फूर्ती आली होती.) तर तिच्यावर एवढा गहजब झाला की, तिनं बिचारीनं कविता करणंच काय; पण वाचणंही सोडून दिलं! हे सांगून ती पुढं म्हणाली, 'आमचा समाज आम्हाला सहानुभूती देत नाही. आमच्या राज्यकर्त्यांच्या खिजगणतीतच आम्ही नाही. त्यामुळे मुस्लिम देशांमध्ये आमच्यासाठी काहीही व्हायचं नाही, ते होईल तुमच्या हिंदुस्थानात ! कारण हिंदुस्थानातल्या किती तरी–मुस्लिम स्त्रिया केव्हापासूनच कविता करताहेत (!) स्वतंत्रपणानं नोकऱ्या करताहेत, शिकत आहेत, समाजकारण, राजकारणात भाग घेत आहेत आणि एवढं सगळंक रूनही त्यांना समाजात केवढा तरी मानसन्मान मिळतोय. आपली स्वतःची दुःखं त्या ओरडून सांगू शकत आहेत. आज नाही उद्या त्याच स्त्रिया काही तरी करतील !'

त्या मुलीचा हा विश्वास भाबडा आहे की खरा ते काळच ठरवेल !

– प्रतिभा रानडे




# गांधी : तरीही रिकामपण राहतंच !

सतीश जकातदार

अमिताभ बच्चनच्या या अवाढव्य देशात आजच्या घडीला आमच्या तरुण पिढीला दिसतोय उध्वस्त जीवन जगणारा अफाट जनसमुदाय. बंद उद्योग, बेकारी आणि बेशिस्ती, बेजबाबदार राजकारणी आणि त्यामुळेच लोकशाहीवरचा लोकांचा उडत चाललेला विश्वास आम्ही पाहतोय. जातीय दंगे, राजकीय हिंसाचार आणि प्रांतीय संकुचित दृष्टीचा उदोउदो चौफेर ऐकू येतोय !

खून, मारामाऱ्या, गुंडगिरी, हिंसाचार व क्रौर्य यांचा सुळसुळाट असलेल्या गुन्हेगारी दुनियेतच आम्ही जगतोय. त्यातूनच अस्थिरता, असुरक्षितता यांनी आम्हाला पुरतं घेरलंय. बंद दरवाजाच्या 'अविश्वासाच्या भोकातूनच' समाजाकडे पाहण्याची आमची वृत्ती बळावत आहे.

आजच्या धकाधकीच्या, धावपळीच्या समाजजीवनात, वासना, विकृती, द्वेष, लोभ, स्पर्धा, मत्सर, लाचारी आणि स्वार्थ या प्रवृत्तींना उधाण आलंय आणि त्याचमुळं निष्फळ साहसांना आणि स्पर्धेला व त्यातील क्षणभंगुर यशाला सलाम करण्याची ताकदच आम्ही गमावली आहे आणि म्हणूनच तत्कालीन, ठिसूळ जयापजायतल्या वैफल्यभावनेने आम्हाला ग्रासलं आहे.

आणि अशा मोक्याच्या, नाजूक क्षणी आमच्यातील दबलेल्या निषेधाला, पराभवानं खचलेल्या आमच्यातील सुप्त असंतोषाला जागे करण्याचे काम 'अमिताभ' करतोय संतप्त युवकाच्या रूपानं. निबर. दणकट अशा त्याच्या उसळत्या दर्शनानं आम्ही प्रभावित्त होत आहोत, मग त्याचा अन्यायाला सामोरा जाण्याचा मार्ग कोणता का असेना. तात्पुरत्या तीन तासांकरता एक गरगरती नशा आम्हाला त्याच्या सहवासात मिळतीय !


आणि याच काळात, त्याच अमिताभमय रुपेरी पडद्यावर आम्ही आज 'गांधी' पाहतोय. होय रिचर्ड ॲटनबरांचा 'गांधी !'

स्वातंत्र्योत्तर काळात काहीशा उशीरा जन्मलेल्या आमच्या पिढीचे गांधींशी नातं आहे ते 'टेक्स्टबुका' पुरतंच. तेही काहीसं लाटलेलं. गांधींनी आयुष्यभर ज्या स्वप्नांना जिवापाड जोपासलं त्याची होळी आम्ही पहातोय !

'हाडामासाच्या' गांधींचे निर्वाण होऊन आज ३०–३२ वर्षे लोटली आहेत. या काळात 'गांधीवादा' ची सोल मोनॉपली सांगणाऱ्या कॉंग्रेस सरकारने त्यांच्या 'रामराज्य' या कल्पनेचा पार विचका केलेला आम्ही पाहतोय, तर ज्यांनी 'गांधीवधाचे' समर्थन केले तेच 'गांधीवादा' चा बुरखा पांघरून आमच्याकडे मते मागत आहेत !

### ॲटनबरांचा 'नायक'

स्वातंत्र्य–संघर्षात, जीवनसंग्रामात माणसाची कुळी लावणाऱ्याने जगावे कसे व मरावे कसे याची मोलाची शिकवण देणारा



'तो' निर्मळ, अधिक उन्नत व उदात्त आहे.

केवळ भाषणांपुरता, कृतीपुरता किंवा लौकिकापुरताच लोकोत्तर नव्हे तर साध्यासाध्या दैनंदिन गोष्टीत, आविर्भावात व अगदी श्वासोच्छ्वासात लोकोत्तर वाटणारा हाडामासाचा कुणी एक गांधी नावाचा माणूस या भूमीत वावरला यावर भावी पिढीनंच काय आमच्याही पिढीनं अविश्वास दाखवावा अशी परिस्थिती असताना ॲटनबरा आम्हाला तो विश्वास ठेवण्यास भाग पाडत आहेत. थोडक्यात ॲटनबरांनी आम्हाला अगदी डुलकी घेताना पकडले आहे!

ॲटनबराचा 'नायक' तेजतर्रार, संतप्त व अन्यायाशी सामना करणाऱ्या अमिताभपेक्षा सर्वस्वी वेगळा आहे. तो निर्मळ, अधिक उन्नत व उदात्त आहे. तो निखळ माणुसकीचे, सत्यनिष्ठेचे, स्वातंत्र्यप्रेमाचे व उदात्ततेचे संस्कार करणारा आहे.

विसाव्या शतकातच सरत्या काळापूर्वी आमच्याच वाड-वडिलांमध्ये मर्दपणाचे धुमारे पेटले होते आणि त्यांची निर्भयता स्वातंत्र्यासाठी ओलीस ठेवणारे, त्यांच्यात आत्मविश्वास जागा करणारे 'गांधी' नावाचे एक व्यक्तिमत्त्व होते याची आठवणही एक 'फिरंगी'च आम्हाला वीस वर्षांच्या तपश्चर्येनंतर करून देतो आहे.

निर्भयता, धैर्य आणि त्याग यांचं प्रतीक म्हणून हा 'नायक' संपूर्ण चित्रपटभर पसरलेला दिसतो. स्वातंत्र्यासाठी, आत्मगौरवासाठी उत्स्फूर्तपणे आम्हाला उठविण्याचे सामर्थ्य या नायकात आहे. अहिंसेने, आत्मक्लेशाने, सशस्त्र, सुसज्ज सत्ताधाऱ्यालाही आपण नमवू शकतो हा आत्मविश्वास लोकांमध्ये निर्माण करण्याची जादू या व्यक्तिमत्त्वात आहे.

चित्रपटातील सर्वांत थरारून टाकणारा, हेलावून सोडणारा प्रसंग म्हणजे 'धरसाणा' येथील मिठाच्या सत्याग्रहाचा! सुमारे शे-दीडशे स्वातंत्र्यसैनिक चार-चारच्या जथ्याने 'धरसाणा सॉल्ट मिल'च्या दरवाजापाशी जातात आणि निष्ठुर पोलिसांच्या दंडुक्याचा मार मुकाट्याने खातात! जखमी झालेल्या चौघांना इतर महिला-कार्यकर्त्या बाजूला नेऊन त्यांची शुश्रूषा करतात आणि पुन्हा निर्दयी लाठ्यांच्या दिशेने आणखी चारजण तितक्याच संयमाने आगेकूच करतात......पुन्हा पुन्हा हेच घडते. आत्मक्लेशाने हे अनोखे तंत्र आपल्या मेंदूला झिणझिण्या आणते.

आणि मग प्रश्न पडतो याच निर्भय माणसांचा वारसा घेऊन आजची पिढी जन्माला आली ना?

याच प्रसंगाशी चित्रपटाचा पहिला भाग निगडित आहे. काळ्या लोकांना दुय्यम नागरिकत्व देणाऱ्या वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेत तरुण गांधी प्रथमच हे अमोघ अस्त्र उपसतात!

वकिलीच्या व्यवसायाखातर आलेले गांधी गोऱ्या कातडीकडून मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीविरुद्ध तेथे छोटसं आंदोलन उभारतात. जॉन रस्किन आणि टॉलस्टॉयच्या विचारांनी प्रेरित झालेल्या गांधींची सत्यशोधनाची प्रक्रिया सुरू होते आणि त्यात ते यशस्वी होतात. चित्रपटातील हा भाग उत्कृष्ट जमून गेला आहे.

या ठिकाणी ब्रिटिशांमध्ये भारतीयांबद्दल असलेल्या तिरस्काराचं दर्शन जसे घडते

तसे 'गाधी'मध्ये माणूस या शक्तीवर असलेला विश्वास पाहायला मिळतो. आपल्या हसऱ्या, चमकत्या डोळ्यांनी माणसे आणि माणसांपलीकडचेही बरेच काही सातत्याने, बारकाईने पाहात, हेरीत, शोधीत हा माणूस माणसाविषयी प्रेमाने आणि विश्वासाने तुडुंब भरलेला आहे हे जाणवते.

## मेलोड्रॅमॅटिक ?

आणि म्हणूनच दररोज पाच रुपयात विकत मिळणाऱ्या 'अमिताभ'पेक्षा हे *व्यक्तिमत्त्व अधिक खोलवर आपल्याला* भावते.

अमिताभचा धाडसीपणा, त्याचं साहस, त्याच्या एकटधावर झालेल्या अन्यायाचा बदला असतो. अगदी व्यक्तिगत पातळीवर, वैयक्तिक अशा सूडभावनेने तो पेटलेला असतो. मग त्यासाठी तो गुन्हाही करतो, स्मगलर बनतो. वैशिष्टय इतकेच की, तो स्वत.पेक्षा अधिक वरचढ गुन्हेगाराशी एकाकीपणे सामना करतो.

समाजाने लाथाडलेला गरीब मुलगा म्हणून तो जन्माला आलेला असतो. आपल्या कुटुंबाची वाताहात उघड्या डोळ्यांनी पाहून, ती साठवून तो परिस्थितीशी सामना देतो. परिस्थितीच्या रेट्यात पंक्चर न होता एक हरवलेला बेवारशी मुलगा स्वतःच्या जिवावर उभारी घेतो, हाच अमिताभच्या चित्रपटाचा धागा असतो; पण हा धागा समकालीन राजकीय वास्तवाशी जोडलेला नसतो.

अॅटनबरांचा 'नायक' हा केवळ निर्भय नेता नसतो तर शाश्वत सत्याचा आग्रह धरणारा आणि तेच ध्येय उराशी बाळगणाऱ्या समुदायाचा नायक असतो किंवा तो समुदाय त्याच्या निमित्ताने त्या ध्येयापोटी एकत्र येत असतो. त्याचं नेतृत्व लोकांना जगण्याची नैतिकता स्पष्ट करत त्या बिनचेहऱ्याच्या माणसांना व्यक्तिमत्त्व बहाल करते. ही नैतिकता अॅटनबरांच्या नायकाला व्यापकत्व प्राप्त करून देते म्हणूनच तो पलायनवादी फॉर्म्युला चित्रपटातील 'स्मगलर हिरो' पेक्षा सर्वस्वी वेगळा वाटतो. माणसे व माणसापलीकडे काही तरी झरझर चपळपणे पाहणारा, शोधणारा, हेरणारा, हुडकून काढणारा आणि खुशीने फुलविणारा तो 'महामानव' वाटतो.

अॅटनबरांच्या चित्रपटात असाच एक हृदयस्पर्शी प्रसंग आहे. दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर या मातीतली माणसे समजून घेण्यासाठी गांधी भारतभर दौरा करतात. या दौऱ्यात अॅटनबरा गांधीच्या जीवनावर ठसा *उमटविणाऱ्या जनजीवनाचे धावते दर्शन* अत्यंत बारकाव्यानिशी घडवितात.

या दौऱ्यातच एका ठिकाणी गाधी नदीकाठी बसलेले असतात. तेथे काही महिला धुणं धूत असतात. त्यातीलच एक फाटक्या चिरगुटात आपलं शील झाकणारी स्त्री आपलं उरलं-सुरलं नेसणं धूत असते. गांधी टक लावून तिच्याकडे पाहतात. तीही जराशी विचकूनच आपला देह झाकण्याचा प्रयत्न करते. गाधी आपल्याकडची चादर हलकेच तिच्या दिशेने त्या प्रवाहात सोडून देतात आणि तीही भाकरीच्या तुकड्याप्रमाणे तिच्यावर तुटून पडते. चित्रपटात अॅटनबरांचा नायक प्रथमच भारताचे दारिद्य अशा भीषण स्वरूपात पाहतो. गांधीमधील करुणेचा ओलावा अॅटनबरांनी या काल्पनिक प्रसंगातून सुरेख हेरलाय.

'फॉर्म्युला' चित्रपटात किंवा आजच्या वास्तव जीवनातही बरेच जण किंवा आपला 'स्मगलर कम हिरो' व्यक्तिगत स्वार्थासाठीच किंवा आपल्या मर्यादित कुटुंबाच्या उत्कर्षासाठी तटतटत असतो; पण माणसांची कुळी लावणाऱ्या गाधीचे कुटुंब म्हणजे आई आणि पोलीस-इन्सपेक्टर बनलेला भाऊ इतपतच मर्यादित नसते. सारा देशच त्यांचे कुटुंब असते !

आणि म्हणूनच या कुटुंबाला परकीय अंमलापासून स्वतंत्र करण्यासाठी ते झटतात. कुटुंबातील निष्पाप माणसाचं जेव्हा जालियनवाला बागेत निष्ठुर हत्याकांड केले जाते तेव्हा हा नायक ब्रिटिशांना 'तुम्ही जा, नाही तर तुम्हाला जावे लागेल !' असा इशारा देतो. या कुटुंबातील अंतर्गत संघर्ष थांबविण्यास मात्र हा नायक अयशस्वी ठरतो, पराभूत होतो. गाधीचे अगदी निकटचे सहकारी फाळणी स्वीकारतात. इथे चित्रपटातील जिना अगदी खलनायक वाटतात. 'दोन तुकडे नाही तर यादवी युद्ध' असाच पर्याय उरतो. गांधीच्या कुटुंबाची वाताहात सुरू होते.

*कलकत्त्यात जातीय दंगे सुरू होतात.* लोकांना आवाहन करण्यापलीकडे या नायकाच्या हातात काहीच नसते. अखेरीस आमरण उपोषणाचा मार्ग गाधी पत्करतात. तरीही लुटालूट, खून, गुंडगिरी चालू होते. सरतेशेवटी गुंड शस्त्रास्त्रे ठेवून गाधीपुढे शरणागती पत्करतात! ... ( अगदी 'मेलो ड्रॅमॅटिक' प्रसंग अॅटनबरांनी उभा केला आहे. )

## तो महात्माच बनतो !

फाळणीने खचलेल्या या नायकाचा आधार तुटल्यासारखा वाटतो. अगदी आपल्यासारखाच हा नायक पराभूत ठरलेला असतो. समाजात फोफावलेल्या कु–प्रवृत्तीमुळे त्याचे मन तगमगत असते; पण निषेधापलीकडे कोणतेच हत्यार नसते ! अशातच त्याची हत्या होते.

अॅटनबरांचा नायक हा असा आहे. स्वातंत्र्यसंग्रामातील वेचक व निवडक घटनांच्या पार्श्वभूमीवर हा गांधी लांब ढागा टाकत प्रवास करतो. तो काहीसा तुटक असला तरी खगोलशास्त्रज्ञाचा सोशिकपणा व धीर असलेले अॅटनबरा ब्लॉटिंग पेपरच्या सराईतपणे गाधीच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू शोषून घेताना दिसतात. मग त्यासाठी अॅटनबरा बऱ्याच वेळा ऐतिहासिक वस्तुस्थिती विसरतात तर क्रमाने घडलेल्या घटनांच्या जंत्रीची उलटापालटही करतात.

गांधीमधील अतिशय कणखर अशी विशुद्ध सत्यसाधना, त्यांच्यातील करुणेचा ओलावा जसा अनेक प्रसंगांतून दिसतो तसाच त्यांच्यातील रसरशीत व खेळकर जिवंतपणाही दिसतो. गांधीमधील बावनकशी मनुष्यत्व दाखविण्यात अॅटनबरा शेवटपर्यंत तग धरू शकत नाहीत गाधीचा मोठेपणा निर्विवादपणे मान्य करूनही त्याच्यातील उणीवा अॅटनबराना दिसत नाहीत. कारण ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणाऱ्या या व्यक्तिमत्वाने ते भारावले आहेत गाधीवर अत्यंत जिव्हाळ्याने प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या ह्या असामीला आपण गाधीचं उदात्तीकरण करत असल्याचे भान रहात नाही. त्यांचा महात्मा बनतो. एक प्रेषित म्हणूनच गाधी शिल्लक राहतो

जालियनवालाबाग, दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, कलकत्त्यातील दंगली व गाधीची अंत्ययात्रा अशा विराट समूहदृश्याच्या पार्श्वभूमीवर अॅटनबरा, स्वातंत्र्यप्रेमाने भारावलेला तो काळ, त्यातील सर्व बारकाव्यानिशी उभा करतात. सफाईदार सकलन, कल्पक छायालेखन, गांधीच्या प्रकृतीशी साधर्म्य सांधणारं रवि-शकरचं संगीत यातून ' गाधी ' आमच्यातही देशप्रेमाचा ओलावा निर्माण करतो. अभिमानाने आमचाही ऊर भरून येतो !

## समकालीन वास्तव

अर्थात यातही अॅटनबरांची बुद्धिमत्ता दिसते ती संवादरचनेत ! जेम्स ब्रायलीची पटकथा सरळसरळ गांधीची भाषणे, त्याची वचनेच बोलते आणि त्याला न्याय देतो बेन किंग्जले हा गुणी नट. परिश्रमपूर्वक, रंगभूषेच्या कसबी वापराने हा नट गांधीचा चेहरा व लकबी घेऊन पडद्यावर येतो आणि आपल्या आतरिक सामर्थ्याने त्यात प्राण ओततो. सशासारखे फाकलेले कान नसले तरी निरागस, निष्पाप चेहरा घेऊन हा नट वावरतो, गाधीजीच्या जादुई हास्याने तो मोहित, खरं तर तो ' मेस्मराईज ' करतो.

अॅटनबरांचा ' गांधी ' मनाची पकड घेतो, तीन तास आठ मिनिटे खिळवून ठेवतो; पण तरीही रिकामपण राहतंच. त्यात अॅटनबरांची उणीव जशी आहे. तसच त्याच कारण आमच्या पिढीसमोर असलेल्या समकालीन वास्तवातही आहे.

' गाधीना देवपण बहाल करू नका ' हा नेहरूचा सल्ला अॅटनबरा स्वतःच गाधीच्या व्यक्तित्वामुळ भारावून जाऊन विसरतात. गाधीशिवाय चित्रपटातील कोणतीच व्यक्तिरेखा पूर्णांशाने उभी रहात नाही. तो हेतू नसला तरी कळसूत्री बाहुल्यांसारख्या इतर व्यक्तिरेखा गांधीभोवती फेर धरतात. अॅटनबरा गाधीचा जीवनपट उसवत जात नाहीत तर हळूहळू गांधीचं उदात्तीकरण झालेलं दिसत. स्वातंत्र्यसंग्रामाचं गाधीच्या व्यक्तित्वात वैयक्तीकरण पाहायला मिळतं. माणूस आणि खुरटी झुडपं हा फरक राहात नाही तर महात्मा आणि खुजी माणसं हा फरक उरतो !

१९४२–४८ हा गाधीच्या आयुष्यातील खडतर प्रवास इथं शिताफीन टाळलेला दिसतो. मग त्या ' गाळणी 'तून गाधीच्या सत्य गोष्टीला आख्यायिकेच स्वरूप प्राप्त होतं.

कदाचित हेच महात्म्यपण अॅटनबराना 'गांधी एक प्रेषित ' म्हणून प्रेक्षकापर्यंत पोचवायच असेल; पण चित्रपट पाहून आम्ही थिएटरबाहेर येतो तर आम्हाला दिसतात बडोदा–मुरादाबादच्या हिंदू–मुस्लिम दंगली, गुजरात–बिहारमधील हरिजनांवरील अत्याचार. सतत दोन–तीन वर्षे आसाममध्ये चालू असलेले असहकार–आंदोलन आणि त्यालाही न जुमानणारे स्वकीयांचे सरकार, जेलभरो आंदोलन, सत्याग्रह यांना लागणारे हिंसक वळण !

दिसतात ते यंत्राचे गुलाम आणि बेकाराचे तांडे. भ्रष्ट पाश्चिमात्य संस्कृतीचे उसने अंधानुकरण, नैतिकतेचा अधःपात, खेड्याचे विघटन आणि एकत्र कुटुबाची वाताहात आम्ही पाहतो. झोपडपट्ट्यांचा बकालपणा आणि महानगरातील कोरडा, निष्ठुर व्यवहार आम्हाला दिसतो.

स्वातंत्र्यचळवळीत आयुष्य झोकून देणाऱ्या वकिलाच्या पिढीऐवजी आम्हाला दिसतात भ्रष्टाचारी, पोरकट, खुजे बॅरिस्टर, प्रांतीय हेवेदावे, स्वतंत्र राज्याची मागणी करणारे प्रादेशिक पक्ष.

वर्षानुवर्षे चाललेले संप, शेतकरी आंदोलने–त्यांना निष्ठुरपणे दडपणारी दमनयंत्रणा आम्हाला या स्वतंत्र भारतात दिसते. दिसते ते गाधीचे उध्वस्त कुटुंब !

इतकच काय ज्या दक्षिण आफ्रिकेत गाधीनी वर्णद्वेषाविरुद्ध आदोलन केले तो देश त्याच भूमिकेवर अधिक ताठर झाल्याचे आम्ही पाहतो व्हिएतनामचे युद्ध आणि अणुयुद्धाचा धोका यातच आमची त्रेधा–तिरपिट उडते.

तो निर्भयपणा, धैर्य, ती बावनकशी सच्ची प्रामाणिक नैतिकता आम्हाला कुठेच आढळत नाही मग या मूल्यहीन समाजात आम्ही एकमेकाना, परस्पराना ओरबाडून घेण्यात मशगूल होतो.

एका गालावर थप्पड बसली तर दुसरा गाल पुढ करण्याची ताकदच आमच्यात नाही हा विचार ' थॉट फॉर टुडे ' इतका मिळमिळीत झालेला आम्ही पाहतो. त्याऐवजी रस्तोरस्ती, भितीवर ' ठोशास ठोसा ' लिहिलेले दिसते.

आणि म्हणूनच अॅटनबरांचा ' गांधी ' रुचतो, आवडतो; पण तो पटत नाही आणि पटला तरी तो पचत नाही ! पचावा अशी परिस्थिती नाही आणि हा ' गांधी ' पचला आणि तो 'शोले' पेक्षाही विक्रमी यश तिकिटखिडकीवर मिळवू शकला, अख्या तरुणपिढीला झपाटू शकला तर वेगळंच काही घडेल; प[illegible] हा कोता आशावाद ठरेल ! कारण महात्म[illegible] गाधीनीच म्हटलंय, ' Let no one sa[illegible] that he is follower of Gandhi. It [illegible] enough that I should be my ow[illegible] follower. I know what an inadeq[illegible] ate follower I am of myself, for [illegible] cannot live up to the convictions [illegible] stand for.'